सारस्वत चंपू :

लेखक
श्री रामकृष्ण अनंत शेणवी काकोडकर

श्री रामकृष्ण अनंत शेणवी काकोडकर

सारस्वत चंपू :

लेखक
श्री रामकृष्ण अनंत शेणवी काकोडकर

कृती : सारस्वत चंपू
लेखक : श्री रामकृष्ण अनंत शेणवी काकोडकर
© शिला रामकृष्ण शेणवी खांडेपारकर

प्रकाशन : मयुरेश प्रकाशन
गोवर्धन एनक्लेव, १ला माळा,
पावर हाउस मार्ग
आके -मडगाव.

आवृती पहिली : आषाढ शुक्ल ४ थी, १९३३
दि. ०४.०७.२०११
मुद्रक : इप्रेशन्स
गोंधळी गल्ली, बेळगाव
फोन ०८३१ - २४२१२३२

सहयोग मूल्य : १५०/-

ISBN No. 81901163-3-9

अर्पणपत्रिका

मत्पूज्यप्रिय जननी सरस्वतीपादपंकजीं, नमन ।
करूनी सद्भावानें अर्पितसे काव्यरूप हें सुमन ॥

श्री रामकृष्ण अनंत शेणवी काकोडकर

प्रस्तापनेचे दोन शब्द :-

माझे आजोबा कै. रामकृष्ण शेणवी काकोडकर यांची ही नाट्यकृती कित्येक वर्षांनी वाचकासमोर येत आहे याचा मला अतीव आनंद होत आहे. त्यानी लिहिलेली पुस्तके आमच्या नजरेसमोर कधीच आली नाहीत. 'सारस्वत चंपू' हे नाटक त्यानी लिहिले होते असे बाबांच्या तोंडून कधी कधी ऐकायला मिळे. पुस्तकाची प्रत मात्र कधीच हाती लागली नव्हती. त्यामुळे त्यांचे साहित्यिक विश्व काळाच्या ओघात केव्हाच अदृश्य होऊन गेले.

हंस थिएटरर्सने जेव्हा या नाटकाचा प्रथम प्रयोग रंगमंचापर आणला तेव्हा नाटकातील पात्रानी आपल्या अप्रतीम अभिनयाने एकएक प्रसंग असा जीवंत केला की आम्ही सर्व आश्चर्यचकीत होऊन गेलो. त्या दिवशी साहित्यिक आजोबा नजरेसमोर उलगडत गेले.

नाटकाविषयी बोलायचे झाले तर संहिता अगदी उत्कृष्ट वाटली. पुस्तकांत मांडलेला विषय आणि त्या अनुषंगाने आलेली अनेक प्रसंगातील माहिती अगदी आधुनीक वाटली. या नाटकातील प्रसंग प्रत्यक्ष न घडता ते संपादाच्या माध्यमातून व्यक्त केले गेले आहेत. परंतु भाषेच्या ताकदीमुळे व पदांच्या गेयतेमुळे हे प्रसंग हुबेहुब डोळ्यासमोर तरळून जातात.

माझे आजोबा घाडीवाड्यासारख्या एका छोट्याशा गावात राहणारे, शिक्षणाचा प्रसार नव्हता. वाचनसंस्कृती पण नव्हती. तो काळ पोर्तुगीज राजवटीचा होता. अशा या प्रतीकूल परिस्थितीत त्यानी ते अवघड कार्य पूर्णत्वास कसे नेले असावे हा विचार मनात येऊन भुवया उंचावतात हे नक्की. इंग्रज पोर्तुगीज व मराठी साहित्याचा त्यानी केलेला अभ्यास तळटीपेत सापडतो. इतकी सुंदर साहित्यकृती दुर्लक्षीत राहिली ह्या बद्दल खंत वाटते. असो. आज अनेक वर्षानंतर का होईना माझे आजोबा आपली नातवंडे पंतवंडे व सगळ्या नातेवाईकासमोर आपली नव्याने ओळख घेऊन येत आहेत. आमची पिढी सुशिक्षित आहे. प्रतिभेचा आदर करणारी आहे. हे पुस्तक वाचून आपल्या आजोबाबद्दलच्या त्यांचा आदर नक्की दुणावेल यात तिळमात्र शंका नाही.

हे पुस्तक वाचून आजोबांची भेट व्हायला हवी होती. या इच्छेने रोमरोम आसुसला. त्या पुस्तकासाठी दोन शब्द लिहिण्याची संधी मला मिळाली हे माझे महाद्भाग्य.

- सौ. शालन गजानन शेणवी नाडकर्णी

श्रीमत्

सारस्वत चम्पूः

सर्ग १.

सरस्वतीवाससमा[1] : कुतो रतिः। सरस्वतीवाससमाः कुतो गुणाः॥
सरस्वती प्राप्य दिवंगता जनाः। सदा स्मरिष्यन्ति नदीं सरस्वती॥१॥
सरस्वती सर्व नदीषु पुण्या। सरस्वती लोकशुभावहा सदा ॥
सरस्वती प्राप्य जनाः सुदुष्कृतं । सदा न शोचन्ति परत्र चेहच ॥२॥

(महाभारत, शल्यपर्व, अ. ५४)

वत्सा ! या सरस्वतीवर वास करीत असतां, या स्थानाविषयीं मनांत जसें प्रेम उत्पन्न होतें, तसें ते इतरत्र कोठून होणार? सरस्वतीवासांत जे गुण आहेत, ते इतरत्र कोठून आढळणार ? फार काय सांगूं, सरस्वतीवर ज्यांना एकदां राहावयास सांपडलें आहे, ते लोक स्वर्गांत गेले तरी त्यांस एकसारखें सरस्वती नदीचें स्मरण झाल्याविना राहणार नाहीं. सरस्वती ही सर्व नद्यांत पुण्यकारक आहे, ती सदोदित लोकांचें कल्याण करीत असते. सरस्वतीची प्राप्ति झाल्यानंतर, लोकांस इहलोकीं अथवा परलोकीं, आपल्या अत्यंत भयंकर अशाहि पातकांबद्दल शोक करण्याचा प्रसंग येत नाहीं; ते सर्व येथेंच भस्म होतें.

गुरुमहाराज ! आपल्या आश्रमाने हीला बरेंच महत्व आलें आहे असें म्हणतात; आपलें हें गुरुकुल, मूर्तिमंत वेदांचें निवासस्थानच होऊन राहिलेलें आहे; पवित्र स्थान आणि एकांतवास, ही जोडी भारीच दुर्मिळ असते; पण एक विचारतों. या सरस्वतीला पुण्यस्थान म्हणण्याचें कारण काय?

कौडिण्य ! वत्साला अद्याप या नदीचें माहात्म्यच कळलें नाहीं.

गुरुमहाराज ! या सरस्वतीचें आदिवृत्त[2] कथन करण्याचा अनुग्रह व्हावा.

बाळांनो ! फार उत्तम; तुमची जिज्ञासा पूर्ण करण्यास मला भारीच आनंद वाटत असतो. ऐका एके समयीं -

पद (चाल - देवस्त्री मेनका अप्सरा)

जगन्नियंता चतुर्वेदमुख ब्रह्मदेव धाता ।
सर्वकामसमृध्द सुरंजित यज्ञ महा करितां ।
सुरवर मुनिजन उद्‌भुत झाले शुभकारक जगता।
या अवनीवरि पुष्कर क्षेत्रा स्थाना नच समता ।
वेदघोष किति प्रचंड चाले ओघ नभावरता।
गंधर्वांसह[३] करिति अप्सरा नृत्यगान ललिता ॥१॥

काय, गुरुमहाराज ! या स्थानाला आधीं पुष्कर क्षेत्र असें म्हणत असत?

हो. स्वस्थ ऐका, यज्ञ चालू आहे; तेव्हां सर्व ऋषींनी ब्रह्मदेवाला प्रश्न केला:- पितामह ! स्वर्गवासी[४] सर्व देवता येथे आहेत. आपण सर्व येथें तन्मय आहोंत, परंतु येथें आनंद उल्हास म्हणण्यासारखा प्रसन्न दिसत नाहीं, याचें कारण काय?

गुरुमहाराज ! स्वर्गस्थ इंद्रादि देव, बृहस्पति प्रमुख ऋषिवर जेथें उपस्थित आहेत. ब्रह्मदेव जेथें यज्ञकर्ता, तेथें आनंद, उत्साह नाहीं असें कसें होईल ?

वत्स ! प्रश्न खरा आहे. ब्रह्मदेवालाहि या ऋषींच्या प्रश्नाचा विस्मय वाटला, आणि म्हणाला, ऋषींहो ! हा यज्ञ बहुगुण आहे, सामान्य नाहीं, तेव्हां येथें कसची उणीव भासत आहे तें सांगा, तेव्हां ऋषि म्हणाले:-

अंजनीगीत

सर्व जगाला प्रमोद्‌दाती। जिचिया वचनें रंजति गिष्पती ।
आनंदाची मूर्तिमती ती । सरस्वती नाहा ॥१॥
ज्ञानजलाची निर्मल सरिता । आनंदामृत विश्वंभरिता ।
वाग्देवीविण विश्व, विधाता !। शून्य सकल गमतें ॥२॥
मग?

बाळानो ! इतक्यांत असा चमत्कार झाला :-

साकी

मूर्तिमंत ते वेद करिति त सरस्वतीच्या स्तवना ।
तन्मय झाले मुनिजन सारे ब्रह्मा तोषवि सुमना ॥
वाग्देवी प्रगटे। अवनी आनंदें लोटे ॥१॥

गुरुमहाराज ! वेदांनी कसें स्तवन केलें ?
ऐका, स्वल्पांतच सांगतों :-

आनो दिवो बृहतः पर्वतादा सरस्वती !
यजतामन्तु यज्ञम् ॥ - (ऋग्वेद मं. ६-४३)

आणि त्या वेळीं,

इयं शुष्मोभि सखा इवा रूजात्सानं ।
गिरीणा तविषेभिरूर्भिभ : ॥ - (ऋ. मं. ६-११)

वत्स ! अर्थ लावशील का?
गुरुमहाराज ! अर्थ असा होत असल्यास पहा -

साकी

पूज्य सरस्वती सुरलोकाहुनि सत्वर यज्ञीं येवो ।
महान गिरिवर उल्लंघुनियां जगता दर्शन देवो ।।१।।
वाग्देवी तैं पराक्रमानें कमलापरि गिरिशिखरें।
तुडवुनि सारीं यज्ञमंडपीं प्रगटे स्वरुपें प्रखरें ।।२।।

शाबास ! अगदीं यथार्थ, श्रुतीची[५] अर्थव्युत्पत्ति लावण्यास बृहस्पतीचीहि मति मंदगतीच होत असते.

गुरुमहाराज ! मग पुढें ?
ऐका. तेव्हां -

साकी

मुनिंच्या स्तवनें प्रसन्नवदना वाग्देवी वरदाती ।
तीर्थरूपानें[६] अखंड वसली मोक्षपुरी सुखदा ती।।
यज्ञ सांग झाला । ब्रह्मा आनंदे रमला ।।१।।

गुरुमहाराज!या सरस्वती नदीचा उगम ब्रह्म सरोवरापासून झाला आहे ना?
कौडिण्य ! ब्रह्मरूप सरोवरापासूनच सरस्वतीचा जन्म आहे.
वत्स ! सरस्वतीला ब्रह्मदेवाची मानसकन्या असें म्हणतात.

कौडिण्य ! ब्रह्म हेंच मानस, मानस म्हणजे मन, आणि त्यापासून उत्पन्न झाली ती वाणी अर्थात् सरस्वती.

वत्स ! तुझे हे गडबडी बोल मला कळत नाहींत. तुझें अध्ययन वेदांचें आणि माझें ते सार्धं पुराण.

बाळांनो ! कसचा वाद घेतां ? या सरस्वतीला सरिद्वरा म्हणतात; म्हणजे ही सर्व नद्यांत[७] श्रेष्ठ आहे. हीच्या जलांत अनंत तीर्थें असतात. पण बोला, आपला वाद विचार.

गुरुमहाराज ! हा वत्स उगीच वाद घालीत असतो. आम्ही म्हणतों सरस्वती ही ब्रह्मदेवाची कन्या, आणि हा म्हणतो ब्रह्मदेवाची माता, आणि काय म्हणतो.....

वत्स ! कसें काय तुझें म्हणणे?

तसें काहीं नाहीं, महाराज ! उपनिषदांत सरस्वतीचा स्तव आहे, त्यावरून म्हटलें.

कसा काय उपनिषदांचा स्तव ?

गुरुमहाराज !

वाङ् मे मनसि प्रतिष्ठिता ।मनो मे वाची प्रतिष्ठितम्।
आविरावीर्य एधी मे आविरोधी ।..... (कौषितकी उपनिषत्)

वत्स ! मग कसा काय अर्थ लावलास !

गुरुमहाराज ! अर्थ असा दिसतो. मनापासून वाणीची[८] प्रतिष्ठा, आणि सरस्वती ही स्वयंप्रकाशी ब्रह्म आहे.

हो, अगदीं यथार्थ, पण सरस्वतीला ब्रह्मदेवाची माता कशावरून म्हटलें?

गुरुमहाराज ! सरस्वतीला :

''यः ब्रह्माच्युतशंकर : प्रभृतिभि : देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्यापहा ।।''

शाबास ! पातंजल योगशास्त्रांत या सरस्वतीला सुषुम्ना असें म्हटलें आहे; गंगेला[९] इडा, यमुनेला पिंगला आणि ही सुषुम्ना, यांच्या संगमाला योगीजन त्रिवेणीसंगम मानतात.

गुरुमहाराज ! बरी आठवण झाली; योगशास्त्रावरचें[१०] आपलें व्याख्यान आणखी एकदां ऐकावें अशी अपेक्षा आहे. पहा -

पद (चाल - रामराय राज्याचा)

चैतन्याची चक्रवर्तिनी दिव्यप्रकाशी कुंडलिनी ।
सोहं शब्दें गर्जत कैसी मोक्षविजाची विमल खनी ॥१॥
उन्मनिंचे लावण्य कसें ते यौवन अभिनव तूर्येचें ।
रूप कसें त्या योगिजनाच्या आत्मप्रभावी भार्येचें ॥२॥
सुवर्णकमलीं निलाकाश त्या गुहेमाजी कसें वसे ।
सत्वरजतमापासुनि मायाचक्र चालतें तरी कसें॥३॥
संदेहाचे तम नाशुनियां योगशास्त्र तें मज पढवा ।
पदवंदन मी करितों भावें अनुग्रहाने मन वळवा ॥४॥

वत्स ! भारी सरस. अशी अपेक्षा असणें म्हणजे अर्धे ज्ञान संपादणे आहे; योगशास्त्रावरचीं केवळ व्याख्यानें ऐकून सिध्दि[११] प्राप्त होत नसते. योगसाधनास कडक नियम पाळावे लागतात.

कसले नियम ? गुरुमहाराज !
ऐका -

पद (चाल-नाहीं सुभद्रा, या वा)

योगी व्हावें ऐशी इच्छा जरि का होइ मनीं ।
रसनेची ती गोड लालसा टाकुनि द्यावि झणीं ॥१॥
निद्राभंगा व्यथित न व्हावें देहलालसा मुळिं न धरा ।
विषयवासना विषापरी ती चित्तापासुनि दूर करा ॥२॥
सुद्‌गुरुचरणीं अद्वयभजनें लक्ष लावुनी सदा बसे ।
अनुग्रहाला पात्र असे मग योगसिध्दिला उशिर नसे ॥३॥

इतकेंच ना, गुरुमहाराज ?

कौडिण्य ! वत्साला योग म्हणजे साधारणच वाटतो. बरं, तूं आधीं काय म्हणत होतास तें सांग.

तसें काहीं नाहीं महाराज. हा वत्स उगीच वाद घालीत असतो. प्रत्येक वेळीं वेदाचें सुक्त करतो आहे पुढें; पुराणांतील कथांना म्हणतो तो रूपकात्मक अर्थात् कल्पित. व्यासऋषीवरहि[१२] याची कोटी.

वत्स ! असें काय म्हणतोस ?

कौडिण्यच सांगेल, महाराज. कौडिण्य ! माझें काय म्हणणें तें गुरुमहाराजांना यथार्थ निवेदन कर.

यथार्थ नव्हे, यथाक्षर सांगतों. गुरुमहाराज! काल आम्ही सहज पार्वतीपरिणय काव्य वाचीत होतों, त्यांत महादेव शंकरानें मदनाला भस्म केला अशी कथा आहे.

मग वत्साचें काय म्हणणे ?

हा म्हणतो, शंकर म्हणजे भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न पुरुष, अर्थात् योगी, यानें भ्रुमध्यस्थानांतील अग्निचक्रानें विषयवासनारूप मदनाचा[१३] म्हणजे कामविकाराचा[१४] नाश केला. म्हणतां आम्ही काय म्हणावें? हिमालयाच्या पोटीं पार्वती जन्मास आली, ही कथाच खोटी तर.

छे ! छे ! कौडिण्य ! हिमालय नवमास गरोदर राहिला ही गोष्ट कोण खोटी म्हणणार ?

हें पहा, गुरुमहाराज ! प्रत्येक कथेवर याचा आक्षेप.

आणखी कोणत्या कथांवर याचा आक्षेप आहे? वत्स जरा महत्वाकांक्षी आहे.

गुरुमहाराज! शपथ, मला गर्वाचा[१५] अगदी लवलेश नाहीं.

वत्स ! महत्वाकांक्षेला गर्व म्हणत नाहींत. कौडिण्य ! सांग पाहूं पुढें. आपल्या वादविनोदांत मला आनंदच आहे.

गुरुमहाराज ! त्रिपुरासुराचा वध महादेव शंकराने केला, ही प्रचलित कथा; तीहि म्हणतो रूपकात्मक.

कौडिण्य ! कसचें रूपक म्हणतो? सरळ सांग, मलाहि पण त्यांत कांही बोध होऊं दे.

गुरुमहाराज ! हा वत्स कसें म्हणतो पहा--

साकी

सत्व-रज-तमा या त्रिगुणाला त्रिपुरासुर हे म्हणती ।
जीवात्मा हा देवेंद्रचि का देहा स्वर्गचि गणिती ॥१॥

हं हं. मग पुढें ?

ऐका, महाराज.

साकी

तमोग्रस्त त्या जीवरक्षणा धर्मरूप शिव[१६] आला ।
प्रणवधनुष्या चिदाभासशर लावुनि युध्दा सजला ॥१॥
काय मोठी कोटी ! बरं पुढें.
पहा --

साकी

चरमवृत्ति ब्रह्मास्त्र योजुनी त्रिगुण-त्रिपुर दैत्याला ।
धर्मशंभुने वधुनी निर्मल जीवात्मा सोडविला ॥

बरं बाबा, आणखी कोणत्या कथांवर याची कोटी ?

प्रत्येक कथेवर याची कोटी (स्वगत) गुरुमहाराज आपल्याशींच हसतात तें कां ?

कौडिण्य ! पुढें चालू दे.

गुरुमहाराज ! सर्व पौराणिक गोष्टींना हा म्हणतो, रूपकात्मक समुद्रमंथनावरहि याची कोटी.

काय ! समुद्रमंथनावरहि कोटी ? सांग पाहू. आम्हां वृध्दांना एकेक नवीनच गोष्टी ऐकाव्या लागतात. कौडिण्य ! लाजूं नकोस.

ऐका महाराज, हा म्हणतो ---

साकी

मन हा सागर[१७] शम ते सुरवर काम क्रोध दैत्यचि ते ।
अभ्यासचि हें मंथन मुक्ति अमृत[१८] जाणती ज्ञाते ॥
मायारूप तसें। मोहिनी जगता मोहितसे ॥१॥

वत्स ! कमाल आहे बाबा तुझी, कौडिण्य ! चालूं दे पुढे.

गुरुमहाराज हंसतात आणि हा वत्सहि आपल्याशींच हंसत आहे. माझाच मूर्खपणा असेल.

छे. छे, कौडिण्य ! मी तुझी थट्टा करीत नाही. बरं, पण एक सांग, तूं आधीं काय म्हणालास ? सरस्वतीबद्दल याचें काय म्हणणें?

गुरुमहाराज ! हा वत्स म्हणतो, सरस्वती ही ब्रह्मदेवाची माता, तीच कन्या, तीच पत्नी[१९] आणखी काय म्हणतो, ब्रह्मदेव सरस्वतीच्या मागें लागला !

कौडिण्य ! मीच असें म्हणतो का ? आपलें मत्स्यपुराण वाचून सांग पाहूं, त्यांत असे आहे की नाहीं ?

''अहो कष्टतरं चै तदंगजागमनं विभो ! कथं दोषमगमत्
कर्मणानेन पद्मभूः ॥ ''

वत्स ! तसे त्यात आहे खरें. पण आम्हीं तसें बोलू नयें. त्यांत सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची[२०] निंदा नाही का होत?

मग, कौडिण्य ! पुराण पाठ कसें करणार ?

बाळांनो ! कसचा वाद घेतां ? ऐका; देवाचीं कर्मे मनुष्याप्रमाणे इंद्रियांनी घडत नसतात, ती मानवबुद्धीच्या पलीकडचीं असतात. सरस्वती ही विधात्याची[२१] लाक्षणिक कन्या आहे. ब्रह्मदेव सरस्वतीशीं मोहित झाला या कथेत निराळाच अर्थ आहे.

हो, गुरुमहाराज ! मी म्हणतों ही कथा रूपकात्मक आहे.

बरं, ते असो, वत्स ! तुझा काय प्रश्न होता ?

गुरुमहाराज ! कौडिण्यानें मध्येंच आपलें पुराण पुढे केले. माझा प्रश्न योगशास्त्राबद्दल होता.

वत्स ! तुझें म्हणणें गुरुमहाराजांना आवडणार नाही; पुराणग्रंथांना कमी मानणे सुज्ञपणाचें लक्षण नाही.

कौडिण्य ! मी पुराणग्रंथांस बराच मान देतों, पण देवीभागवत काय सांगत आहे पहा :

स्त्री शूद्र : द्विजबंधूना न वेदश्रवणं मतं । तेषामेव
हितार्थाय पुराणानि कृतानि च ॥

म्हणजे, स्त्रिया, शूद्र आणि पतित ब्राह्मण यांस वेदांचा अधिकार नाहीं, त्याकरतां पुराणें रचलेलीं आहेत.

बाळांनो ! उगीच वाद घालूं नका, स्वस्थ ऐका. सर्व शास्त्रांत योगशास्त्र श्रेष्ठ आहे; योगसिध्दि झाली म्हणजे हा आपला वाद सहजच मिटणार आहे.

गुरुमहाराज ! योगशास्त्र पढविण्याचा अनुग्रह व्हावा हीच विनंति आहे. पण योगसिध्दी व्हावी कशी ?

वत्स ! आपल्याप्रमाणेंच योगशास्त्रावर रूपक सांगतो --

साकी

ॐकाराचें धनु :[२२] करोनी चित्त[२३] बाण[२४] लावावा ।
ब्रह्मरूप तें निशाण लावुनि निश्चल मन सोडावा ॥
मन हें ब्रह्मत्वीं मिळतें । योगीहृदया लखलखतें ॥१॥

गुरुमहाराज! याचा अर्थ आम्हांस भारी अगम्य आहे. योगशास्त्राचा अभ्यास करण्याची अपेक्षा आहे.

वत्स ! भारी उत्तम, योगसाधनाची जर आपणास इच्छा आहे, तर सांगतों, सर्वांआधीं चित्तनिग्रहाची तयारी केली पाहिजे. कारण --

पद (चाल-उरला भेद न ज्या कांही)

मन हें स्थीर न जरि होई । दुर्घट योग तयां पाहीं ।। ध्रु०॥
सागर प्राशवेल सगळा । मेरू[२५] फोडवेल वहिला ॥
अग्निहि भक्षूं अवलीला। स्वर्गा आणवेल क्षितिला ॥
परंतु बाळा चंचल मन हे जिंकवे न कांही ।
लोकीं सुज्ञ देति ग्वाही ॥१॥

गुरुमहाराज ! इंद्रियनिग्रह[२६] झाल्यावर मनाची मोठीशी प्राज्ञा नाही असे म्हणतात ना ?

वत्स ! हें सर्व स्वानुभवावांचून कळावयाचें नाहीं. असो. आतां पातंजल मुनीचा शिष्य कोत्स इकडे येणार आहे, त्याकडे त्या गुरुने रचलेलें योगशास्त्र असणार,

त्याचें आधीं अध्ययन करा, म्हणजे मग थोडक्यांतच कांहीं कूटें उकलून योगसिध्दीची तयारी करूं बरं, पण आपण आज कसला पाठ केला ?

हो, आज ऋग्वेदाचा पाठ होता,
कोणता स्तुतिपाठ होता?
आदित्यदेवतेचा, महाराज,
बरं, आधीं अदितिदेवाचा स्तुतिपाठ[२७] होऊं द्या.
बरं, महाराज,

देवेर्भि देवि अदिते अरिष्ट भर्मन आगहि।
अदिति : पातु अहंसः सदा वृधा ॥ (ऋग्वेद मंडल ८-१८)

वत्स ! अर्थ पाठ होऊं द्या अर्थाविचून सारें निरर्थक.

हो, ते खरं महाराज, पहा.

साकी

सर्वप्रिय ही देवी अदिति सुखदात्री जगताला ।
व्यत्यय आणूं शके न कोणी ईच्या वरदानाला ॥
पातकतमहरणी । जिची अत्यद्भुत करणी ॥१॥

भारी सरस, अर्थ म्हटला म्हणजे हेतुगर्भ असला पाहिजे. बरं, पुढें आदित्यदेवतेचा स्तुतिपाठ होऊं द्या.

पहा, महाराज --
''वयं ते वो वरूण : मित्र अर्यमन् स्याम इत् रथस्य रथ्यः''
बस्स, सरळ अर्थ होऊं द्या. अर्थी तात्पर्य सज्ञना.
ऐका, महाराज.

''हे वरूणा, हे मित्रा, हे अर्यमा, आम्ही तर तुमचेच आहों; तर आम्ही सध्दर्माचे प्रचारक होऊं असें करा.''
शाबास ! अगदीं वेदसूक्ताचें[२८] प्रतिबिंब.

पण, गुरुमहाराज ! ह्या ऋचेचा स्पष्टार्थ मला कळला नाही. केवळ शब्दार्थ कळून उपयोग काय?

वत्स ! असें काय म्हणतोस ? शब्दार्थतोच स्पष्टार्थ.

तसं नाही महाराज, आदित्य देवांना " आम्ही तुमचेच आहोत " असं कशावरून म्हटलें ? ते देव[२९] आणि आम्ही मानव[३०].

हं, हे काय तुला आतांच सापडलें ?
नाहीं महाराज, कालच्या पाठांतहि तसंच आहे.
मग, काल कां विचारलें नाहींस ? बोल कालचा पाठ.
हो, जरा घसरलों खरा, आतां पहा -

"यज्ञो हीलो वो अन्तरः आदित्या अस्तिमूलत ।
युष्मे इद्वो अपिस्मसि स जात्ये ॥"
सांग तर स्पष्ट अर्थ.

पहा महाराज -
"आदित्यांनो, तुमच्या मनामध्यें स्तुतियुक्त यज्ञ घांगलाच
भरतो, तर आम्हांवर कृपा करा, आम्ही तुमच्यापैकींच
आहोंत, तुमच्या कुलांतीलच आहोंत."
अगदी बरोबर, मग संशय काय तो बोल, ऐका -

साकी

ज्ञानरवीला संशयतम हा उपरागचि समजावा ।
गुरुचित्ताला राग नये कधिं प्रश्नें अर्थ वळावा ॥
मन हें स्वच्छ असों द्यावे । संशयकिल्मिष त्यागावें ॥१॥

गुरुमहाराज ! संशय एकच, "आम्ही आदित्यांपैकींच आहोत, आदित्य कुलांतीलच[३१] आहोंत" असें कसे म्हटले, आणि हें स्तवन केले कोणी ?

हेंच तें, आधीं आत्मनिरीक्षणच झालें पाहिजे, आम्ही कोण हें तुमच्या लक्षांत नाहीं. तर बोल पुढचा पाठ.

बरं महाराज, ऐका -
"येन वंसाम पृतनासु शर्धतस् तरन्तो अर्य आदिशः"(ऋ.मं. ८, ४९-१२)
पुरे, अर्थ सांग.

अर्थ असा दिसतो महाराज :--

''आम्ही संग्रामामध्ये शत्रुसैन्याची धूळधाण उडवून देऊं,
आणि आम्ही जे आर्यजन ते तुझ्या आज्ञा बरोबर पाळूं.''

वत्स ! आम्ही आर्यजन[३२] हें स्पष्ट आलें ना लक्षांत ?वेदांतील सूक्तें आर्य लोकांनीच रचलीं हें तुला समजले ना?

हो, मग आम्ही आदित्य-कुळांतीलच झालों तर.

वत्स ! आदित्याला अर्यमन्[३३] असे वेदसूक्तांत आहे ना? मग अर्यमाच्या वंशजांस आर्यम् ही सुज्ञ लोकांची संज्ञा सयुक्तिकच आहे. म्हणून

पद (चाल -विराट वदनापासुनि)

देव अर्यमा आदित्याचे वंशज त्यां आर्यचि म्हणती ।
स्वयंप्रभावे धन्य जाहले कीर्ती गाती सुर वरती ॥१॥

धर्मनीतिचें स्थान मनोहर आर्यावर्ताला वदती ।
श्रूतिस्मृतीचें आगर सुखकर अन्य न यासम त्रिजगती ॥२॥

हिमनग रत्नाकर रक्षिति जिस भारतभूमी मान-वती ।
स्वर्गसुखाला सोडुनि सुरवरआर्यभूमिला मानवती ॥३॥

गुरुमहाराज, आर्य लोकांचे वसतिस्थान हेंच तर आर्यावर्त ? आणि

वत्स ! काय संशय दिसतो तो स्पष्ट विचार.

तसं नाहीं महाराज ! आर्य लोक उत्तर ध्रुवाकडून[३४] आले, असें बरेंच वेदवेत्ते विद्वज्जनांचे सप्रमाण मत आहे.

म्हणजे ? उत्तर ध्रुवाकडून आले की उत्तर ध्रुवमंडळावरून आले? ध्रुवराजाचे वंशज झाल्यास सूर्यवंशीच झाले; उत्तानपाद राजाहि आर्यच. पण आपलें प्रमाण तें काय?

प्रमाण म्हणजे, ऋग्वेदांत उत्तर ध्रुवाकडील प्रदेशाची वर्णनिपर सूक्ते आहेत.

हा ! हा ! शाबास ! खासे वेदवेत्ते विद्वज्जन ! कौडिण्य! आपल्या पुराणग्रंथांत कोठकोठची वर्णने आहेत ?

पुराणांत कैलास, वैकुंठ, क्षीरसागर येथील वर्णनें आहेत, स्वर्गांतील नंदनवन, नव्हे पाताळांतील नागनागिणींची वर्णनिपर चरित्रें आहेत.

वत्स ! पुराणें ही आर्य लोकांनीच रचलीं आहेत ना ? तर आर्य लोक क्षीरसागरांतून आले, की पाताळांतून वरती चढले ?

पण, महाराज ! हीं वर्णनें कशीं निपजलीं ?

वत्स ! कवींची[३५] कल्पना पवनालाहि मागें टाकते, हें तुला नाहीं का ठाऊक? वेद हें महाकाव्यच आहे. कवीचें मन कधी स्वर्गांत तर क्षणांत पाताळांत; कधीं भूगर्भांत तर कधी ग्रहमंडळांत भ्रमण करीत असतें, हें आपले विद्वज्जन समजत नाहींत काय? बरं, तूं आणखी काय म्हणालास? मनांत संशय ठेवूं नये.

गुरुमहाराज ! वेदसुक्तें जर आर्य लोकांनी रचलीं तर वेदांस अपौरूषेय असे कसें म्हणतात ?

वत्स ! उत्तम प्रश्न, अपौरूषेय म्हणजे आकाशवाणीनें उत्पन्न झालें कीं काय? अपौरूष[३६] शब्दाचा अर्थ अलौकिक[३७] पौरूष असा नाही का होत ? महानुभाव आर्य ऋषि हे अलौकिक पुरुष, त्यांनी रचलेली स्तोत्रे ज्यांत ग्रथित आहेत ते वेद अपौरुषेयच म्हटले पाहिजेत. असो; बरेंच विषयांतर झाले; होऊ द्या आपला वेदपाठ.

बरं महाराज ! हा पहा इंद्रदेवतेचा स्तुतिपाठ.

''योध्दा असि कृत्वा शवसो तदंसना विश्वाजाताऽभिमज्मना ।
आत्वाऽयम् अर्कः ऊतयेव वर्तति यं गौतमा अजीजनन् ॥

(ऋग्वेद मं. ८,७७-४.)

वत्स ! ऐक; वेदांचें पठण करणें आणि अर्थ समजून घेणे हे ब्राह्मणाचे मुख्य कर्तव्य आहे.

''ब्राह्मणेन षडङ्गो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च ''
असें निरूक्तशास्त्रांत आहे.
गुरुमहाराज ! पहा,

''तूं खरोखर योध्दाच आहेस; आपल्या पराक्रमाने, उत्कट बळानें, अद्भुत कृतीने आणि आपल्या झळाळीनें हे सर्व वस्तुजात पराजित करून टाकले आहेस. हा स्तोत्रघोष[३८] गौतमांनी केला.''

(स्वगत) काय, हा इंद्रदेवतेचा स्तुतिपाठ? आणि गौतमांनी केला? कधी? अहल्येने मार्जारः म्हटल्यावर की याने त्वज्जारः म्हटल्यावर? वेदांतील इंद्र निराळा, पुराणांतील इंद्र निराळा आणि गौतममुनिहि निराळाच म्हटला पाहिजे.

वत्स! हा आपला कौडिण्य आपल्याशींच काय पुटपुटतो आहे? बरं, पुढे चालू दे, अर्थावर मात्र अलक्ष करूं नकोस.

वरं महाराज हा पहा सोमराजाचा स्तव.

''अयं कृत्नुर अग्रभीतो विश्वजित् उद्भित इत् सोमः'' (ऋ. मं. ८, ५८-१.)

पुरे, अर्थ होऊं द्या.

हें पहा, महाराज.

हा सोमराजा मोठा कार्यकर्ता, कोणाला आकळला न जाणारा, विश्वाला जिंकणारा, फलांकुर उत्पन्न करणारा, काव्यस्फुर्ति देणारा आहे आणि

''ऋषिर्विप्र काव्येन''

म्हणजे ''याच्या काव्याने विप्र हा ऋषि होतो.''

शाबास भले वेदोनारायण; वत्स ! आपला वेदोक्त इंद्र स्वर्गावरील का क्षीरसागरातील ? आणि हा सोमराज[३९], चंद्रमा[४०] का कैलासनाथ? आणि हा सोमराजाचा स्तव बृहस्पतीने केला का?

कौडिण्य ! वेदार्थाला दूषण देणे महादोषास्पद आहे गुरुमहाराज सन्निध आहेत.

वत्स ! झाला ना आजचा पाठ ?

झाला महाराज, पण -

हेच ते, वत्स ! तुला पाहिजे तो प्रश्न कर. शिक्षणांत लाजभीड अगदी उपयोगाची नाहीं.

महाराज ! वेदांत बहुधा स्तुतिपाठच आहे ते काय? परमेश्वराला स्तुतिच का प्रिय आहे?

हो, स्तुति ही सर्वांनाच प्रिय वाटत असते, पण स्तुति करावी ती परमेश्वराची, तो प्रभु स्तुतीस पात्र आहे.

गुरुमहाराज ! श्रेष्ठ लोकांना स्तुतीचा कंटाळा असतो, असे म्हणतात ना ?

हो, अगदी खरे आहे, पण बहुतेक लोकांच्या हृदयांत स्तवनप्रियता गुप्तपणे संचार करीत असते, तें असो. स्तुतीत[४१] सत्य, असत्य, सकाम, निष्काम असे भेद आहेत; बरं, उद्यां कसला पाठ आहे?

उपनिषदाचा, महाराज.

बरं, कौडिण्य ! अर्थसादृश्यावर पूर्ण लक्ष ठेव. पण सांग, वत्स ! सरस्वतीसंबंधाने झाले ना समाधान ?

हो, झालें महाराज, सरस्वती ही ब्रह्मदेवाची पत्नी, कन्या आणि माता.

काय, वत्स ! असे कसे होईल? सरस्वती ही वाणीची देवता, म्हणून तिला वाग्देवी म्हणतात. चौसष्ट कलांची स्वामिनी, चातुर्यार्थ - कलाकांमिनी अशी इची स्तुति करतात.

मला असें वाटतें, महाराज,

साकी

आदि अनादि प्रणवरूपिणी सरस्वती ही पाहे ।
पूर्णब्रह्म चित्स्वरूप विधाता सत्य स्वरूपां राहे ॥
माया-ब्रह्म-समागम हा । लोकीं दाविती खेळ महा ॥१॥

शाबास, पण तुझा काय प्रश्न होता वेदविषयावर ? कौडिण्य! बोल.

तसें काहीं नाहीं, महाराज, वेदांत म्हणतात परमेश्वराचे स्तवन केलेलें आहे, आणि हीं तर स्तोत्रें इंद्राचीं आणि चंद्राचीं. पुराणातील कथा वाचल्या म्हणजे अगदी विपरीताभास.

वत्स ! वेदांत काय इंद्राचीं आणि चंद्राचींच स्तोत्रें आहेत ?

वेदांत अदिति, आदित्य, इंद्र, चंद्र, अग्नि, अश्विनोदेव, पृथ्वी, उषा इत्यादिकांचीं स्तोत्रे आहेत, महाराज.

तर गुरुमहाराज ! परमेश्वराचें स्तवन तें कोठें राहिलें?

कौडिण्य ! इंद्र, चंद्र हीं कोणाचीं स्वरूपें[४२] मानतोस ? देह आणि अवयव ही काय निराळी असतात?

याचा अर्थ आम्हांस भारी अगम्य आहे, महाराज.

तसे काही नाही, थोडासा योगाभ्यास झाला म्हणजे अगदी सुलभ वाटेल, बरं, पण आपले सहाध्यायी कोठें दिसत नाहींत.

गुरुमहाराज ! ते आपल्या व्यायामवाटिकेत खेळत आहेत.

हं, पण हा तिकडे कोण?

हा आपला पतंजल मुनीचा पट्टशिष्य[४३] कोत्स.

काय, कोत्स ! क्षेमकुशल आहेस ना? आतांच तुझी आठवण झाली होती.

काय, माझ्यावर अनुग्रह ! गुरुमहाराजांना माझी आठवण होणे म्हणजे मी जगांत धन्यच समजलो पाहिजे.

बरं, आपले योगरत्नाकर पतंजल ऋषि सुखक्षेम आहेत ना? त्यांचा काय संदेश आहे ?

त्यांचा संदेश म्हणजे, महाशय दधीची मुनीचें[४४] कुशलवृत्तश्रवण आपल्या गुरुकुलाचें वृत्तनिवेदन आणि आम्हावर आज्ञा अनुग्रह.

भारी आनन्द वत्स ! संध्यासमय होत आला ना?

हो, काहींच कळलें नाहीं . हा पहा --

पद (चाल-कळवावी विनंति ०)

शांतकिरण तिमिरहरण जात अस्तमाना ।
प्राग्वधु ही नटुनिसजुनि खुलवि रंग नाना ॥धृ॥
संभ्रम हा दशदिशांस । चंद्रबिंब करि विकास ।
ब्राह्मणजन दिनकरास। करिति अर्घ्यदाना ॥१॥

---

१. सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदंतरम् - मनुस्मृति.
२. तच्च वृत्तं जातिरितिद्विधा । - काव्यादर्श.
अनेन विप्रो वृत्तेन वर्तयन् वेदशास्त्रवित् - मनुस्मृति.
३. सोमः शौचं ददावासां गंधर्वश्च शुभांगिरम । - याज्ञवल्क्यस्मृति
४. स्वर्गद्वारकपाटपाटनपटुर्धर्मोपि नोपार्जितः । - शृंगारशतक
५. विहाय भृंगा श्रुतिहारि निस्वना । - ऋतुसंहार
६. तीर्थोदकच वन्हिश्च वान्यतः शुध्दिमर्हतः ।
७. नदीमिवांतः सलिलां सरस्वतीम् । - रघुवंश

८. वाणीकाम भुजामजीगणदवाशांसिद्य वैयासिकीम् - मालतीमाधव
९. इमंमे गंगे यमुने सरस्वती शतद्रु स्तोमं सचता परूष्ण्याः । - ऋग्वेद
१०. यद्वेदाध्ययनं तथोपानिषदां सांख्यस्य योगस्यच - मालतीमाधव
११. अदूरवातनी सिध्दीं राजन् विगणयात्मन :। - रघुवंश
१२. वेदव्यास : रानव दशयो वेद वेदाक्षराणि । - व्यंकटाध्वर्य
१३. भर्तुराज्ञामादाय मुर्ध्ना मदनः प्रतस्थे । - कुमारसंभव
१४. जानामि त्वां प्रकृति पुरुषं कामरूपं मघोनः। - मेघदूत
१५. गोर्वागिगर्व न कादापि कुर्यात् । - रसगंगाधर
१६. जहासिनिद्रामशिवः शिवारूतैः। - किरातार्जुनीय,
१७. सरसामस्मिसागर : । - भगवग्दीला.
१८. देवासुरैरमृतमन्वुनिधिर्ममन्थे । किरातार्जुनीय.
अमृत स्वर्गस्थ देवतांचे मधुर पेय. - जायम् सेगिये.
१९. सरस्वती Wife of Brama (ब्रह्मदेवाची पत्नी) आणि आपले
लक्ष्मण रामचंद्र वैद्य, संस्कृत इंग्लिश कोशकार,
यांनीहि तसाच अर्थ केला आहे. - मोलस्वर्थ.
२०. तस्मिन्र् जज्ञे स्वयं ब्रह्मा सर्वलोकपितामहः। - मनुस्मृति.
२१. विधातृ सृष्टौ नहि दृष्टपूर्वा । - भामिनीविलास
२२. अनवरत धनुज्यास्फालन क्रूर पूर्वम् । - शाकुंतल.
२३. जनस्य धित्तं क्रियते समन्मथम्। - ऋतु संहार.
२४. विकचबाणदला वलयोऽधिकम् । - शिशुपालवध.
२५. अथ जयाय न मेरू महीभृत : । - किराताजुनीय.
२६. बलवान इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति । - मनुस्मृति ;
२७. भूतार्थव्याहृतिः साहि न स्तुतिः परमेष्टिन । - रघुवंश
२८. नेतुं वांछतियः स्खलान्पथिसतां सूक्तैः सुधास्यंदिभिः । - रघुवंश.
२९. देवाकर्णय येनयेन सहसा यद्यत् समासादितम् । - काव्यप्रकाश
३०. अन्यत्र रक्षो भवनोषितायाः परिग्रहान्मानव देवदेव्याः। - रघुवंश
३१. हृहसर्वस्वलिनः कुलपुत्रमहाद्रुमाः। - मृच्छकटिक
३२. कर्तव्यमाचरन कार्यम् कर्तव्यमनाचरन् ।
तिष्ठती प्रकृताचारे स वा आर्य इति स्मृत : । - महाभारत
३३. पितृणा अर्यमा चास्मि । - भगवग्दीता
३४. इति ध्रुवेच्छा मनुशासती सुताम् । - कुमारसंभव
३५. इदं कविभ्यः पूर्वेभ्यो नमो वाकं प्रशास्महे। - उत्तर रामचरित्र
३६. अपौरूष - Super - human. - मोलस्वर्थ.
ग्रंथो अपौरूषेयः पौरूषयोऽथवापि वा। - मालतीमाधव.

३७. अलौकिकत्वादमरः स्वकोषे नवानि नामानिसभुल्लिलेख : तर्कसंग्रह
३८. हैयंगवोनमादाय घोषवृध्दानुपस्थितान् । - रघुवंश
३९. यः संतापं शिथिलमकरोत्सोमनाथं विलोक्य । - विक्रमोर्वशीय
४०. पर्याप्त चंद्रेव शरन्नियामा । - कुमारसंभव
४१. भूतार्थव्याहृति; सहि न स्तुतिः परमेष्टिन :। - रघुवंश
४२. देवानामस्मि वासवः । - भगवद्गीता.
नक्षत्राणामहं शशी :। - भगवद्गीता.
४३. शिष्यस्तेहं शाधिन्मां त्वां प्रपन्नम् । - भगवद्गीता.
४४. पुण्यशब्दो मुनिरिति मुहुः केवलं राजपूर्व - शाकुंतल.

■■

सर्ग २ रा

विश्वाचें चक्र सारें धरूनि निजकरी चालवी गुप्तरूप ।
माया ज्याची अगाधा जगतिवरति दे अज्ञ लोकां हुरूप ॥
पृथ्वीसूर्याग्निरूपे प्रकट दिसवि जो स्वकृती ही निसर्गी।
देवो तत्शक्ति[१] लोकां अभिनव सुख ते सर्वदा मोक्षमार्गी[२] ॥१॥

अग, ए वैजयंती । वैजयंती । काय बाई कोठे ओदेखील देत नाही. इच्याबरोबर येणें हाच माझा आधीं मूर्खपणा[३] काय, किती वेळ मी इच्या शोधांत राहूं ? नाही. गेलीच वाटते स्वर्गावर अग ए वैजयंती !

देवी ! आले ग आले. (स्वगत) अलंबुषा देवीचा काय हा उतावळा स्वभाव जरा म्हणून विसावाच देत नाही.

ए वैजयंती ! कोठून तरी आले म्हणते, डोळ्यास तर दिसत नाही. वैजयंती मोठी चंचल बाई.

देवी ! आले ग आले. (स्वगत) उगीच नाहींत म्हणत दुसऱ्याच्या ताब्यांत कधीच राहूं नये म्हणून खरंच ते.

दिंडी

नरकवासाहुनि पारतंत्र्य खोटें ।
सत्य वदती ते बुध्दिमान मोठे ॥
सोडुनियां स्वातंत्र्य वसति लोकीं ।
मृताहुनि ते मृत बोलती विवेकी ॥१॥

आम्ही तर स्वर्गीच्या देवांगना; म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची कामना; या अलंबुषा देवीची वंचना कोण घेईल ?

आता ही वैजयंती आहे तरी कुठे ! ए वैजयंती ! कोठून तरी आले म्हणते, वायुमंडळांतून का मेघमंडळांतून[४] ? ए.....

(स्वगत) ही अलंबुषा मला समजते तरी कोण ? देवेंद्राच्या विनवणीनें मी इच्याबरोबर आले ते कां? मी माझे स्वातंत्र्य विवाहहोमांत का भस्म करुन आले? आमच्या अप्सरस शांतीत स्वातंत्र्याग्नि तर निःशंक पेट घेत असतो, हें नाहीं का इला ठाऊक ?

वैजयंती ! कुठं ग होतीस इतका वेळ? मी तुला किती ग शोधले ! हे सरस्वतीचे वाळवंट सारें हिंडून फिरून थकले. बरं, जरा ये बैस. उगीच इकडेतिकडे फिरून हैराण होऊ नकोस, हा मृत्युलोक आहे.

अलंबुषा देवी ! तुला सांगितलें होते ना, आर्यावर्ताच्या चित्रपटास जरा रंग भरावयाचा आहे; तो सारखा करते आणि येते म्हणून इतक्यांत किती ग फिरलीस? हा मृत्युलोक झाला म्हणून आम्हांस काय मृत्यूचें भय आहे ?

बरं, झाला का पट तयार? पाहूं या तरी आपले कौशल्य हा पहा आर्यावर्ताचा चित्रपट ; रंग जरा ओला आहे हं.

वैजयंती, खरीच चित्रलेखा ! बरं, सांग पाहूं, काय काय ते.

बरं तर; आधी उत्तर दिशेकडूनच येऊं. या आर्यावर्तांत, नव्हे साऱ्या पृथ्वीत अति उंच म्हणतात तो हा हिमालय[५] पर्वत.

हाच ग हिमालय[६] ? पार्वतीदेवीचा जनक. फार नामी रेखलास. महादेव शंकराने येथेंच ना तपश्चर्या केली ? स्थल तर उत्तमच शोधले. विकट कानन म्हणतात तें हेंच ना ?

हो, इथंच आपल्या मदनाची[७] आहुति पडली.

छे ! वैजयंती ! भलतेंच काय बोलतेस ? आम्हा स्त्रियांचा पंचप्राण तो पंचबाण[८] त्याच्या विपरीत बोलणे हे आम्हांला कसे शोभेल ?

अलंबुषादेवी ! बोलणे वाईट आणि करणे चांगलें. देवेंद्राच्या वसंतोत्सवांत, पार्वतीपरिणय नाटकांत, शंकराची भूमिका तूंच ना सजविली होतीस आणि मला मदनवेशांत तूंच ना भस्म केलेंस ? ते तुझे शंकरस्वरूपाचे डोळे आठवून आतांदेखील भय वाटत आहे ; त्या भव्य जटा, आणि ते खदिरांगारासारखे डोळे पाहून शचीदेवीदेखील भिऊन उठल्या.

पण, वैजयंती ! त्या नाटकांतील हिमालयाचा देखावा इतका साधला नाही.

अग, तो कल्पनेने काढला होता, आणि हा प्रत्यक्ष पाहून काढला. प्रत्यक्षांत आणि तर्कांत भारीच अंतर असते?. पण देवी ! मी एक विचारते; मदनराजाला शंकराने कशाकरतां ग भस्म केलें? त्याने असे कोणते पातक केले होते ? शंकरपार्वतीचा संसार थाटण्यास गेला आणि आपला संहार करून घेतला.

पण, वैजयंती ! यांत गौरीहराचे लग्न झाले की नाही ?

देवी ! त्यांचें लग्न झालें, पण रतीबाईच्या[९] सौभाग्यांत मात्र विघ्न आलें. मोठ्यांच्या मध्यस्थींत छोट्यांनी पडू नये म्हणतात ते खोटे नाही.

वैजयंती ! त्या दैविक गोष्टी आहेत; देवांच्या कार्याकरतां त्याच्या भक्तांनी प्राण खर्ची घालावे लागतात.

होय ग देवी! देवांच्या कार्यार्थ मदनाचें दहन आणि दैत्य करतात रतीचें संगोपन अग, अदितिदेवीला तरी रतीबाईची यादस्ती यावयास पाहिजे होती की नाही ?

असू दे ग त्या गत गोष्टी. सांग पाहूं. ही कसली ग पर्वताची ओळ?

देवी ! हेच ते हिमालयाचे भाग.

साकी

कांचनगंगा गौरीशंकर[१०] धवलगिरी हा पाहे ।
नंदादेवी नंगा पर्वत गगना [११] चुंबित राहे ॥
तरूवर हे भारी । अडविति सूर्याची स्वारी ॥१॥
भूमीभागावरती आहे उंच अर्ध योजन हा ।
सैरावैरा कसा धांवतो सरितागण हा पाहा ॥
आर्यावर्तालि । रक्षक गिरिवरहा पहिला ॥२॥

शाबास, मोठी बाई वैजयंती. हिमालय पर्वताची उंची देखील[१२] मोजलीस, आणि हे पुढे.....

हे पहा, देवी!

आर्या

मानस[१३] सरोवराच्या पुलिनी हे राजहंस की फिरते ।
कैलास पर्वताची छाया याच्यावरी सदा पडते ॥१॥
पाहे ही गंगोत्री, हा पाहें बदरिनाथ कैलास ।
यमुनाहि शोणभद्रा जेथें शंकर करी सुखे वास ॥२॥

बरी बाई, वैजयंती,तुझी चित्रकला, स्वर्गांत गेल्यावर, देवादिकांना हा चित्रपट[१४] पाहून दुसरा विषयच रूचणार नाही.

इतकेच नाही, देवी ! याला तेथे विद्युत्प्रकाश दिला पाहिजे.

तेहि करणार, वैजयंती । मग देवादिकांना आमचा विसरच पडणार.
बरं, पुढचे पाहूं.

हे पहा --

साकी

गोदावरि ही पाहे कृष्णा कावेरी शरयू ती ।
मही नर्मदा तापी पाहें पंच नदी जलयुती ॥१॥
सिंधु नदी ही कशी वाहते ब्रह्मसुता अघनाशी ।
तीर्थराज हा प्रयाग पाहे, गया, मोक्षदा काशी ॥२॥

वैजयंती ! ह्या पांढऱ्या आणि काळ्या जलाच्या नद्या कोणात्या ?

देवी ! श्वेतवर्णाची भागीरथी[१५] आणि श्यामवर्णाची यमुना, यांचा हा संगम, आणि तेथेच हा तीर्थराज प्रयाग.

वैजयंती !स्वरंच सांग, हे लहानसे पर्वत ग कोणते, आणि त्यांमधून वाहणारी ही सुंदरशी नदी कोणती ?

देवी ! मानस सरोवराजवळ असलेले हे नारायण पर्वत आणि वसु पर्वत, आणि त्यांमधून झुळझुळ वाहणारी ही आपली सरस्वती नदी. ही पहा इथं अलकनंदेस आनंदाने आलिंगन देत आहे. आणखी पहा, त्याजवळ ही मनोहर गणेशगुंफा आणि त्यांत पूजलेली गणपतीची मूर्ति.

शाबास, वैजयंती ! गणपतीची मूर्ति भारीच सुरेख रेखलीस, पार्वती देवी जर पाहिल तर चुंबनच घेईल....आणि सांग, वैजयंती ! हा येथे सोनेरी रंग काय म्हणून दिलास ?

देवी हे आपण तर्कानेच ताडल्यास खरें.

हं, येथे सोन्याच्या खाणी असतील, हेच ना? सांग तर? याला काय म्हणतात?
हे पहा,

गीत

मलयगिरी हा वसतो जेथें। कावेरी नदी वाहत तेथें ॥
महिषासुर-पुर[१६] भूभागातें । सुवर्णखनि असती ॥१॥

वैजयंती ! आणि इकडे असलेले हे हिमालयासारखे पर्वत ग कोणते? देवी ! हे पहा -

साकी

विंध्य आणि सह्याचल मोठे गिरिवर सुंदर जगतीं ।
तापनाशिनी तापी जेथें, करी नर्मदा वसती ॥
सिंधुस आलिंगन द्याया । जाती सर्पाकृति वाया ॥१॥

वैजयंती ! यापुढे कुसुंबी रंगाने रेखलेलें हें ग काय ?

देवी! सह्याद्रीच्याखालीं बसलेलें, हें आपलें गोमंतक[१७] याला रंग देण्यास मला बराच वेळ लागला.

हें गोमंतक ? पण वैजयंती ! आपलें म्हणजे ग कसें ?

देवी ! समुद्राच्या उदरांतील भूमि म्हणून हीस रत्नाकरात्मजा असें म्हणतात.

आम्हीही अप्सरा समुद्रोद्भवाच; मग ही आपली बहीणच झाली तर; वैजयंती ! सांग तर येथला भाग.

देवी ! पहा --

पद (चाल - उरला भेद न ज्या)

गिरिवर चंद्रनाथ पाहें । गौरीशंकर जिथ राहे ॥
गोमांचल हा स्थिर झाला । मांडवी स्नान देत त्याला ॥
संगम नदिची रमणियता । वर्णिती अघनाशनिचरिता ॥
कुशावतीची सरि नच कवणा । स्वच्छजला आहे ।
ऋषिवन सन्निध ज्या आहे ॥१॥

बरं पुढे ....

देवी ! ओझरतेंच काय पाहतेस ? हा पहा सह्याद्रीच्या पायथ्याशी दूधसागरचा धबधबा, जणूं काय शंकराच्या जटेंतून भागीरथीचाच ओघ.

भली बाई, वैजयंती. खूप शर्थ केलीस ! दूधसागराच्या जलावर संध्यारागाची[१८] लकेरीसुध्दा दाखवलीस. आपलेपणा असल्यावर असेंच घडतें.

देवी ! आपलेपणाच म्हणून नाही. साऱ्या आर्यावर्तात इतके सुंदर आणि रमणीय स्थल मला दिसलेंच नाहीं. उगीच नाहीं वेदांत वर्णन केलें आहे ते ?

काय ! गोमन्तकाचें वर्णन वेदांत ? अग, स्त्रियांनी वेद ऐकूं नयेत.

हो ! बृहस्पतीच्या शिष्यांकडून त्या ऋचा मी अगदी तोंडपाठ करून ठेवल्या आहेत. ह्या पहां ---

''आनो गोमन्तम् अश्विना सुवीरं सुरथं रयिम् । (ऋ.मं. ८,५-१०)
''सहिष्मा जरितृभ्य आवाजं गोमन्तम् इन्वति । (ऋ. मं. ९, २-२)

वैजयंती ! या ऋचांचा अर्थ काय असेल कोणास ठाऊक. वेदांचा अर्थ व्यास[१९] ऋषींसदेखील कळला नाहीं असें म्हणतात.

अग, पण आपल्या त्या व्यास ऋषीनींदेखील, गोमन्तक हें भारीच रूपवान् म्हणून वर्णन केले आहे. हे पहा --

'' गोमन्ता मंदका : संडा विदर्भा रूपवाहिका;'' महाभारत

वैजयंती ! भली बाई तुझी पाठशक्ती !

देवी ! पण तूं काय म्हणालीस ! स्त्रियांनी वेद श्रवण करूं नयेत कां? वेदांतदेखील भेद ? वेद मात्र स्त्रियांचे स्तवन करतात. स्त्रियांना रत्नाची[२०] उपमा देतात, त्यांस कवि रत्न म्हणतात.

वैजयंती ! कोणत्या ग स्त्रियांचें वेदांत स्तवन आहे? स्त्रियांना यंत्राची[२१] मात्र रचना शोभणार आहे. स्त्रिरत्ने !

देवी ! सारा ऋग्वेद, अदितिदेवी, उषादेवी, पृथ्वीदेवी यांच्याच स्तवनाने भरून गेला आहे.

हं, वैजयंती ! त्या स्त्रिया आणि त्यांच्या सरीच्या आम्ही बाया ! बरं, मग पुढे पाहूं या.

देवी ! हा पहा आर्य महासागर.

साकी

अपरपार हा सागर पाहे प्रभंजने स्त्रवळविला ।
लहरीसरसा घालिल वाटे उदरीं सह्यागिरीला ॥
धन्य आर्यभूमी । रक्षक रत्नाकर[२२] नामी ॥१॥

वैजयंती! तसेंच म्हणतात खरें -

हरिहरप्रियकर जाणुनि रक्षिति तत्श्वशुर आर्यधरणीला ॥
तीनहि भागीं सागर, हिमनग तो अचल उत्तरे गणिला ॥१॥

देवी ! आर्यभूमीस असेहि म्हणतात --

साकी

सागरवसना पर्वतकुचधर हरिहरप्रियकर रमणी ।
स्वातंत्र्यामृत-तटिनी जेथे वाहति अभिनव करणी ॥
आगर धर्मांचे । बोलति सुज्ञ जगीं साचे ॥१॥

वैजयंती ! तूं आधी काय म्हणालीस? गोमन्तकभूमि समुद्राची आत्मजा ती कशी ?

देवी ! तुला नाही का ठाऊक, परशुराम[२३] नामक बाह्मणाने, समुद्राच्या उदरांतून[२४] घेतलली भूमि, ती....?

हं, हं, आलें लक्षांत, वैजयंती ! सागरानें भार्गवरामाला दान दिलेली भूमि, ती.....?

देवी ! आहे तर तुला माहित ! सागरराजा मोठा उदार दाता, ब्राह्मणाला दान देता, अगदी द्विजांच्या शब्दाचीच प्रतीक्षा करीत होता !

वैजयंती ! काय ग बोलतेस, सागराने दान दिली ही गोष्ट खोटीच का?

देवी ! दानानें दिली का बाणांनी घेतली? पर्वताचे पर्वत पोटांत गडप करणारा सागर मोठाच उदार ! भक्तीचें दान कीं सक्तीचे आधान ? चार भाग पृथ्वी घशांत पडली तरी आशा[२५] अधिकच वाढते आहे; लोकांनी याचे पूजन करावें, हेमरत्ने अर्पावी, याने ती खुशाल पोटांत सांभाळावी; हेंच धर्मशास्त्र देवी ! खरें ना हें ? भार्गवरामाच्या धनुष्याचा झणत्कार झाला तेव्हांच दानाचा सत्कार उडाला. शराच्या संधानावांचून दानाचे अनुसंधान कधींच उठत नाही.

वैजयंती ! उगीच कां ग सत्याची हत्या करतेस ! सागराने लक्ष्मीसारखी रत्नें[२६] देवांस अर्पण केली ती का बाणासच भिऊन ?

देवी ! माझ्या तोंडून वदवून घेतेस का ? तूं जाणतेसच कीं, देव आणि दैत्य हे सावत्र बंधु, मत्सराचा बिंदू सोडून एकमन झाले, तेव्हांच सागराचे मंथन चालले; आणि रत्नाचे दानहि तेव्हांच घडले एरवी ब्रह्मदेवासारख्यांनी शतश: वंदन आणि चारहि मुखांनी स्तवन केले असते तरी एकाहि रत्नाचे दर्शन त्याच्या नयनांस झालें नसतें, हें खास समज.

ते असूं दे ग, वैजयंती. व्यक्ति तितक्या प्रकृति, उपकार करावा त्यांनी अपकार गणावा, हीच जगाची रीत पण मी एक सांगतें, सागरराजा हा आमचा जनक, त्याला दूषण देणे हे आम्हांस भूषण नाही.

देवी ! जनक असो किंवा रजक असो, सत्य बोलण्यास कोणाच्याच जनकाचें भय नाही.

पुरे ग, वैजयंती, एका शब्दावर अर्बुदांच्या कोटी, बरं, मी एक विचारते, तूं हिमालयाची उंची दाखवलीस पण समुद्राची खोली मात्र तुला मोजतां आली नाही.

देवी ! तूं हा चित्रपट विहंगमदृष्टीनेच पहात आहेस. सागराजवळ काय लिहिले आहे ते पहा .

बरं, वैजयंती ! तूच सांग वाचून.
पहा तर, देवी --

साकी

भास्करकर दशगुणित खोल हे आप आपगापतिचें ।
गणिता करितां कुंठित होईल सत्य चित्त वाचस्पतिचें ॥
अप्सरा सुधन्या । जगत्त्रयसुज्ञांना मान्या ॥१॥

वैजयंती ! उगीच का ग आम्हां अप्सराची प्रौढी गातेस ? आर्यावर्तांत आम्हांसारख्यांना अति निंद्य वेश्या म्हणतात.

देवी ! पण स्वर्गांत आम्हांस देवांचे किरण म्हणतात. मैत्रायणोपनिषदांत.

''वा अप्सरसो भानवीयाश्च मरिचयो:''

असे आहे म्हणून बृहस्पतीच्या तोंडून पुष्कळदां ऐकले आहे. आणखी काय म्हटलेस, आर्यावर्तांतील वेश्या[२७] अति निंद्य, तर देवाद्य जगद्वंद्य शंकर, आत्मसमाधीचा ब्रह्मानंद सोडून महानंदेच्या रंगमहालांत कशाला ग दंग झाले?

अग, ती भक्तीची भावना, परमेश्वराला भक्तीपुढे याति, कुल[२८] कांहीच दिसत नाही. सर्वांत परमेश्वराला भक्तीच प्रिय आहे. स्वर्ग गतीला[२९] भक्तीच फलदाती आहे, असे नाही का म्हणत?

देवी ! तसंच म्हणतात; प्रेमळ गायन हरिहरांना हरिणाप्रमाणे वश करीत असते. आणि याच गुणाने गायन-कलावती, कलानिधी चंद्रमापेक्षां उत्तमोत्तमा मानतात. देवांचे तीलतील घालून निर्माण केलेली तिलोत्तमा वेश्याच नव्हती का?

वैजयंती ! कांही आपले महत्व बोलावयाचेच; पण लोक काय बोलतात याकडे लक्ष दिलें पाहिजे आम्हां अप्सरांना स्वर्वेश्या म्हणतात.

देवी ! कुत्सित लोकांचें बोलणे तुच्छच मानले पाहिजे. सुजाण लोक आम्हां अप्सरांना स्वर्गाचें भूषण[१] मानतात.

ते असो, वैजयंती ! सांग बरं, आर्यावर्ताच्या चित्रपटास इकडून तिकडे, ऋषीसारखीं चित्रें कशाला काढलींत?

देवी ! हेंच आधी विचारावयाचे पहा --

साकी

शंभर कोशांवरती मजला एक एक ऋषि भेटे ।
सप्तऋषींना वंदन करूनी आले मी बहु नेटें ॥
आर्यावर्ताचें । मापन[३०] शुध्द हच साचें ॥१॥

मोठी बाई, वैजयंती ; बरं पण तुझा हा चित्रपट पाहून मला असें वाटते.

पद (चाल-मम सुत भरत)

हिमनग घेउनियां उशिला । आर्यावर्त सुखें निजला ॥१॥
सिंधुनद करितो अभिषेका । स्नाना गंगा दे उदका ॥२॥
मलयगिरी चंदनास लावी । काशी धर्मदीप दावी ॥३॥
आर्यलक्ष्मी संरक्षाया, निकट सिंधु वसला ।
भीति दावि महाकाला ॥४॥हिम०

देवी ! भारीच नामी उत्प्रेक्षा केलीस. देवी! हा पाहिलास ना, बदरीकेदार आणि या ऋषींच्या तपश्चर्या.

फार उत्तम रेखलेंस वैजयंती ! तुला आहे ना ठाऊक -

साकी

ऋषिवर मोठे निज यज्ञाचा हविर्भाग देवोनी ।
स्वर्गी करिती अमर सुरांना स्वयं तपा सेवोनी ॥
विबुध सुखी होतां । घन ते देती जल जगता ॥१॥

देवी ! हें पहा पुढें....अग, इतक्यांतच सचिंतशी काय म्हणून दिसलीस? आम्हां स्त्रियांचा स्वभावच तसा लहरी; क्षणांत आनंदाचे नंदनवन, तर क्षणात चिंतेचे नरकभवन, अलंबुषा देवी! ऋषींच्या चित्रांत काय ग भित्रा प्रकार दिसला?

वैजयंती ! तूं बाई, आर्यावर्ताच्या चित्रपटांत रंगून गेलीस, आणि मलाहि पण त्यातच गुंगून सोडलेस. आपले हेंच का कर्तव्य ?

देवी ! आणखी काय कर्तव्य ते सांग. जन्मांत न पाहिलेला, देवांगनांना अगम्य, असा आर्यावर्त सहजासहजी पाहाण्यास मिळाला; त्याची ती निसर्गरचना, सृष्टिदेवीचे कौतुक, पर्वतांची सर्पाकृति ओळ, त्यांवर घनदाट वृक्षांची किर्र झाडी, त्यांवर विविध पक्ष्यांची किर्र झुंडी; समुद्राचे आंदोलन, आणि त्याला प्रभंजनाचे मीलन, तसेंच गंगा नदीने त्याला सहस्र मुखांनी दिलेले चुंबन, हें सर्व पाहिले म्हणजे, स्वर्गाविरील नंदनवन तुच्छ वाटून भूक आणि तहान हीं कधींच भान सोडून पळतात. खरं की नाही, देवी ?

वैजयंती ! हेंच सौंदर्य पाहण्यास का आम्ही इकडे आलों ? स्वर्गापेक्षा जर आर्यावर्त सुंदर तर स्वर्गापेक्षां वरती नेऊन परमेश्वराने कां ठेवले नाही?

देवी ! तुझ्या मतें, वरचें श्रेष्ठ आणि खालचे कनिष्ट असेच ना ? तराजूचे खालचे पारडे जड की वरचें पारडें जड? डोळ्यापेक्षा केस श्रेष्ठच म्हणणार तर; तें असो. नि:पक्षपाताने सांगते. आर्यावर्तासारखें सौंदर्य, स्वर्गात नव्हे, वैकुंठकैलासांत देखील मिळणार नाही.

वैजयंती ! उगीच कां ग बरळतेस ? वैकुंठकैलासापेक्षा का क्षीरसागरापेक्षा आर्यावर्ता श्रेष्ठ ?

देवी ! श्रेष्ठकनिष्ठपणाचा प्रश्न नाही, सृष्टिसौंदर्याचा वाद आहे.आर्यावर्त हेहि स्वर्गाप्रमाणे देवनिर्मितच[३१] आहे. आर्यभूमीची स्तुति[३२] देव करतात ते आपले भगवान विष्णु महादेव-शंकर गर्भवासासारखे त्रास भोगूनहि आर्यावर्तात[३३] मनुष्यजन्म घेऊन कशाला येतात?

वैजयंतीचे, आपल्या मनाप्रमाणे देवांचे विचार महान महान देवांना भारीच लागली आहे सौदर्यांची आणि शोभेची लालसा, साधूंचे परित्राण,[२४] दुष्टांचे दमन, धर्माचे संस्थापन याकरतां आर्यावर्तात जनन घेतात, हे मात्र ऐकले नसेल; सर्व जाणतें म्हणतेस आणि मूळ तेच चुकतेस.

देवी ! मी मूळ तें चुकत नाहीं आणि सत्याला मुकत नाहीं. पण, आपण काय म्हटले? महान् देव, लहान मानवाचा वेष घेऊन काय करतात, साधूचे[२५] परित्राण का दुष्टांचे दमन? एका, दातृत्ववान् राजाला कपटानें फसवून, त्याच्या मस्तकावर पाय देऊन पाताळांत घालणे हे कोठल्या कोटीतले ? बळीराजा दुष्ट ना ? ती कथा आपण ऐकली नसेल ; असेल तर असे बोलणारच नव्हतीस. देवी ! काय सांगू त्या बळीराजाची पत्नी भोळी, नव्हे अगदीं खुळी. मी जर तिच्या जागीं असते तर त्या कपटपटु बटूच्या पायांचें मोज घेऊन मौजच केली असती, आणि त्याला खट्टूच करून मागल्या पायांनी परत लावले असते.

वैजयंती ! त्या बटूचे सामर्थ्य सामान्य नव्हतें; अदिति देवीचा कुमार आणि हरीचा अवतार.....

देवी ! आहे ग ठाऊक. अदितीच्या पुत्रांचे अनीतीचे वर्तन साऱ्या कीर्तनकारांस विदीत आहे. त्या कपटु बटूचें आणि त्या रणपटु भटूचे सामर्थ्य सर्वास ठाऊक आहे. देवी ! ब्राह्मणधर्म म्हणतात मुख्य अहिंसा, असा वेदांचा आधार, तर हा भगवंताचा अवतार[२६] म्हणून, धनुष्याला टणत्कार देऊन, क्षत्रिय बाळांचा संहार कशाला ग करतो आहे ?

वैजयंती ! उगीच काही बरळू नकोस. त्या अवतारी पुरूषांकडून भलतेच काहीं होणार नाही. त्यात ब्राह्मण हा, हा, देवी ! खासें बोललीस, ब्राह्मण म्हणजे शुध्द आचरण, क्षत्रिय राजांना मारून त्यांचे राज्य ब्राह्मणांस दान केले,आणि त्यांच्या विधवा राण्या? ! काय ग बोलतेस, देवी ? शास्त्रे रचणारे ब्राह्मण, आचरण करणारेहि ब्राह्मण; क्षत्रियांचा निर्वंश झाल्यास ब्राह्मणांस प्रार्थून वंश करून संतति उत्पन्न करून घ्यावी, हा महाशास्त्रार्थ ! पातकाचा लवलेश नाही ! ब्राह्मणा सेतु निर्भय: आणि हेम विप्र सदा शुचि:

वैजयंती काय बोलते ते तिलाच ठाऊक असणार नाही. देवांचे अंशभूत अवतार[२७] त्यावरहि शब्दांची तरवार, धर्मनीतीची पुरस्कर्ती श्रुति भक्तिभावाने ज्यांची स्तुति करते त्यांच्या विपरीत बोलणे, हे मंदमतीचेच लक्षण आहे.

देवीचें बोलणे मात्र भारी सरस;धर्माचें संस्थापन आणि अधर्माचे प्रोत्साहन. देवांचे अंश, महान् लैकिकवान् राजांचे वंश, तेच ना ते ? एका भावाला कपटाने मारून, त्याचे राज्य, पत्नी, पुत्र दुसऱ्या भावास देणे, येथे धर्मनीतीचे अचल ठाणेंच असणार ! एका अबलेचा विश्वासघात ! यासारखे अध:पात करणारे पातक दुसरे असणारच नाही.

वैजयंती ! धर्मनीतीचे सूक्ष्म गतिज्ञान, आम्हांसारख्या अल्पमतींना थोडेच कळते आहे; ज्यांच्या कृतीची कविजन कीर्ति[३८] गातात, ज्यांच्या भक्तीने मुक्ति प्राप्त होते, त्यांच्याविरूध्द बोलणे हे शुध्द अबुध्दीचे लक्षण, प्रमाणभूत आहे.

देवी ! कविजन म्हणजे भाट बंदिजन. कपटाची कृति, अनीतीची सक्ति, अधर्माची रति, आणि त्यांची करावी लोकांनी भक्ती आणि लाभणार काय, सायुज्याची मुक्ति; अपकीर्तीची ज्यांना भीतीच नाही त्याकडून सद्गति लाभणे हे वस्तुस्थितीला धरूनच असणार.

वैजयंती ! भारीच जीभ लांब केलीस. पण तूं एक सांग, देवेंद्राचे म्हणा किंवा कोणाचेहि म्हणा, पद किंवा राज्य हरण करण्याची इच्छा आणि प्रयत्न करणाऱ्यावर परमेश्वराने[३९] पाय देऊ नये, तर काय निमूट पहावे? परापहार करणाऱ्यांवर हरिहरांनी पादप्रहार करणे साधारच आहे. तसंच पहा, राजे लोक अत्याचार करू लागले म्हणजे भगवंताने ब्राह्मणरूपाने शस्त्र धारण करणे, हे का तूं अनीतींचे लक्षण मानतेस ? अतिताईचा अतिरेक झाला म्हणजे शास्त्र्यांनी शस्त्रें ध्यावीच लागतात. हेच धर्माचे तत्व.

देवी ! हेंच धर्मतत्व, आणि कपटकृत्य हे नीतीचे महत्व.

वैजयंती ! कपटकृत्य सत्याला बाधा करतें हें खरे, पण, शटेशु शाठ्यं, हेहि नीतीचे लक्षण आहे. अन्यायकार्य केल्यावर दुसऱ्याकडून सत्कार्य होणार कसे? एका अबलेचा विश्वासघात[४०]? अग आपल्या पतीचा प्राणघात करणाऱ्या महापातकी पत्नीवर विश्वाचाच आघात होत असतो. येथे स्त्रियांचा पक्षपात नाही.

देवी ! भारीच तरफदारी करतेस. आणि सांगूं ?

वैजयंती ! असो ग त्या असंगत गोष्टी. माझीच मति नाही. आधीं स्थितीवर.

बरं तर ; देवी ! सांग तुझी मनस्थिती.

वैजयंती ! आम्ही इकडे आलो, त्या कोणत्या कार्याला ? आम्हाला महेंद्राने पाठविल्या त्या अशा स्वच्छंद हिंडण्याफिरण्याकरितां नाही.

देवी ! आहे ग ठाऊक, देवेंद्राने आपल्या कार्याकरितां आर्यावर्तात पाठवल्या हं मला पूर्ण ठाऊक आहे. पण इकडेतिकडे फिरण्याची बंदी होतीहे मात्र मला कळले नव्हते. अग, आम्हां अप्सरांच्या---

पद (चाल-बायांनो या सोडोनी)

स्वातंत्र्यावरती कांही । देवांची अटकळ नाही ॥
स्वच्छन्द[४१] हिंडणे फिरणे । स्वेच्छेनें वस्तु वापरणे ॥
परपुरूषीं भाषण करणे । त्यांना नच वाइट कांही ॥१॥

नाही तर -

कोंडोनि ठेविती गेहीं । बोलाया सक्त मनाई ॥
परतंत्र विवाहित बाई । सौख्याचा लेश न पाही ॥२॥

वैजयंती ! गेलीच आपली दुसऱ्या विषयावर.

देवी ! जरासे लक्ष दे? मी इकडून तिकडे फिरून पाहिलें, या आर्यावर्तातील स्त्रिया म्हणजे अगदी अंधारकोठडीतील घोरट्या बायां अग, त्यांना वायु आणि सुर्य हेदेखील परपुरष, कोणत्या पातकाने त्यांना स्त्रीजन्मास घातले हें ब्रह्मदेवासच विचारलें पाहिजे. मला तर त्यांची आमच्या भगिनींची-भारीच कींव येत असते. देवी ! इकडे पहा तरी.

वैजयंती ! आर्य भगिनींची मोठीच कींव करणारी तूं.

देवी ! पहा तरी, अग त्यांच्या त्या मूर्ख नवऱ्यांना, त्यांच्याच शास्त्रांची वचने कळत नाहींत, ऐक, जरा लक्ष दे.

साकी

पूजन[४२] होते जेथ स्त्रियांचे रमति देवता तेथे ।
इष्ट मनोरथ सुफळायाला भार्यापूजन सुमतें ॥
लक्ष्मीवास गृहां व्हाया । इष्टचि स्त्रीपूजन[४३] कार्या ॥१॥

वैजयंतीने शास्त्रें तरी कधी पाठ केली ? स्त्रियांचें पूजन म्हणजे काय मखरांत बसवून धूप, दीप, आरत्या ओवाळणे आणि नैवेद्य, तांबूल, मंत्रपुष्प घालून नमस्कार करणे ? काय तरी जिव्हा शिणतच नाही.

देवी ! ते कसेंहि असो. येथील पुरुषांनी मात्र, स्त्रियांच्या पारतंत्र्य कार्यात पातकाच्या राशी करून ठेवल्या आहेत, आणि त्याचें प्रायश्चित्त पारतंत्र्य नरक-त्यांना इथेंच प्राप्त होणार आहे.

वैजयंती ! आर्यावर्तात स्त्रियांना किती मान[४४] मिळतो, हे सहज वरवर पाहणाऱ्यास कळणार नाही.

देवी ! पहा तरी मानापमानाचे अनुमान.

साकी

ठेविति अज्ञानाच्या पंको विद्या शिक्षण[४५] नाहीं ।
शास्त्रें रचुनि पतिव्रतांचा धर्म सांगती पाहीं ॥
पति हा देवचि पत्नीचा । मोक्षचि बंदिवास साचा ॥१॥

वैजयंती ! आर्यावर्तातील स्त्रियांनी फिर्याद मांडली का तुझ्याकडे ?

देवी ! हेंच तें ज्ञानावांचून मानापमान कळत नसतो. खरेंच सांगते, मला आतां इथे, या स्त्रियांच्या आमच्या भगिनींच्या उन्नतीकरतां एक अत्युत्तम शिक्षण शाळा स्थापन केली पाहिजे. आणि त्या आमच्या अज्ञान समजल्या जाणाऱ्या अबलांना ज्ञानदानाने स्वातंत्र्यमूर्तीची गोडी लावून पुरुष वर्गाच्या खोडी मोडून टाकल्या पाहिजेत. देवी ! उगीच सचिंतशी का ? चिंता[४६] अगदी चित्तांत बाळगू नये. मनाच्या उत्साहाने[४७] जनाची कार्यें अनायासें घडत असतात.

वैजयंती ! तूं स्वर्गातून येथें येऊन, येथल्या स्त्रियांची उन्नति करणार, की त्यांच्या धार्मिक दांपत्यप्रेमांत विष कालविणार ? आपल्यासारख्या स्वतंत्र अप्सरा बनवणार का त्यांना ?

देवी ! तसे नाही मी म्हणत, पण शिक्षणावांचून मनुष्यपणा तरी त्यांना कसा कळणार ?

वैजयंती ! राहूं दे ग त्या गोष्टी, आमचे कार्य आम्ही पाहूं.

देवी ! हेंच ते, आम्ही तुम्ही हा भेदभाव मनांत बाळगू नये. कितीही अज्ञान झाल्या तरी आम्हांसारख्या स्त्रियाच ना त्या? जात्यभिमान हा सर्वांत सन्मान्य आहे.

वैजयंती ! स्वर्ग कोठे, पृथ्वी कोठे, आम्ही कोण, त्या कोण, कसला ग जात्यभिमान, आणि कोण ग त्याना विद्यादान करणार ? ज्याचे त्यास पाहतांनाच जीव नकोसा होतो; मला वाटते, आम्हांपेक्षां सहस्र पटीने आर्यावर्तातील स्त्रिया सुखांत आहेत.

देवी ! सुखदुःखाचे अनुमान, ज्ञानावाचून कसें लागेल ? गाईना दाव्याने सुख, शुकास पिंजऱ्यांत सुख, हत्तीस शृंखलेत सुख आणि कीटकांना कर्दमातं सुख, सारीं सुखेच. पारतंत्र्यांत आणि सुख[४८]? मग दुःखाने विन्मुखच झाले पाहिजे.

बरं तर वैजयंती, स्वर्गात गेल्यावर देवांना सांगून त्या स्त्रियांची पारतंत्र्यांतून मुक्तता करूं.

हा, हा, देवी ! देव हे आपले पुरुषच ना? ते पुरूष जातीचे पूर्ण अभिमानी; त्याना स्त्रियांची कींव थोडीच येणार ! पशुपक्ष्याचेदेखील मन स्वजातीकडेच ओढा घेत असते. पुरुषांना त्रास पडले तर मात्र देव धावत येतात.

वैजयंती ! देव येतात का पृथ्वीवर ?बरेंच आहे तर.

देवी ! अज्ञानाचे पांघरूण घेतेस, का मला अज्ञान समजतेस ? आर्यावर्तातील लोकांना, राक्षसासारखे दुष्ट दुर्जन त्रास देऊं लागले म्हणजे आपले देव, कोणी वानराचा तर कोणी अस्वलाचा जन्म घेऊन त्यांस सहाय्य करीत असतात. हे तुला नाही का ठाऊक ? एका दैत्याला मारण्याकरता भगवान विष्णूने अर्धा देह सिंहाचा आणि अर्धा देह मनुष्याचा असादेखील अवतार घेतला. त्या भयंकर रूपाला पाहून लक्ष्मीदेवीने किंकाळीच फोडली असे म्हणतात. आणि एका राक्षसाला मारण्याकरतां महादेव शंकर वानरच होऊन उड्या मारूं लागला पार्वतीदेवीला त्याचे पुच्छ पाहून कौतुकच वाटणार होतें.

वैजयंती ! तसेच खरे, आर्यावर्तांतील स्त्रियांना कोणी राक्षस त्रास देऊ लागले तर तसाच अवतार घेऊन येऊं, बरं.

हा, हा, देवी ! आर्यावर्तातील स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यांपेक्षां आणखी त्रास देणारे राक्षस पाहिजेत ?

काय ग भारीच बरळतेस, वैजयंती ! तुझी जीभ तुझ्या स्वाधीन नाहींसे दिसते, महान् महान् देवांची थट्टा करतेस हें अगदीं अप्रशस्त, देवाच्या लीला देवांना माहीत, थोडेसे रूचते आणि अधिक ते ओकतें, बरें.

देवी ! मी काय अमृत[४९] बोलतें ? तूंच खरें सांग, देवेंद्राला आणि दीनेंद्राला, वानर होऊनच आर्यावर्तात खेळखंडोबा घालण्याची मोठी हौस होती ? आणि आपले पितामह ब्रह्मदेव अस्वल तर झालेच, तेंहि सोडा, पण त्यांनी, म्हातारपणीं एक वानरीच कां नवरी पसंत केली? ब्रह्मदेवाचा कुमर[५०] नळ वानर म्हणतांच मन चर्र होतें कीं नाही ? आपल्या त्या देवांना, नरांपेक्षा वानरांचें जनन[५१] मंगलकारक वाटते ना ?

वैजयंती ! भारीच बेताल सुटलीस. अग, देव अंतरसाक्षी आहेत. त्यांना हें तुझे बोलणे कळेल तर आमचे डुलणे येथेच संपेल.

देवी ! काय म्हणतेस, देव अंतरसाक्षी ? आणि महादेव सर्वसाक्षी, का भूतभविष्य जाणणारे तीन अक्षी ? पण आपल्या पुत्राचे शिरकमल एक राक्षस तोडून नेईल हे मात्र त्याच्या लक्षीं आले नाही. बिचाऱ्या हत्तीची हत्या करून बसला चुंबन[५२] देत. देवी ! उगीच कां काळजी करतेस ?

वैजयंती ! भली बाई सांपडलीस सोबतीण. अग, आम्ही स्त्रिया निसर्गत: अज्ञान, त्यांनी देवांना - नव्हे पुरूषांना मानच दिला पाहिजे. श्रेष्ठ लोक आम्हां स्त्रियांना कमी प्रतीच्या उगीच नाहींत मानीत.

काय, देवी ! आम्ही स्त्रिया अज्ञान अबला कोणी ठरवल्या ? पुरुषांनी ना ? पण मी स्पष्ट[५३] आणि सत्य सांगते, पुरुष म्हणजे अगदी मूर्ख आणि अविचारी, मनुष्यापेक्षां देव तर भारीच विचारशून्य, उगीच का पुरुष आणि भ्रमर एकाच कोटीतले म्हणतात? आणि काय सांगू देवी ! स्त्रिया जर अविवाहीत राहतील' तर पुरुषांपेक्षा श्रेष्ठ कृतीच्या ठरतील.

वैजयंती ! पुरूष आणि भ्रमर[५४] एका कोटीतले कसे ग ?

देवी ! पहा भ्रमरांची रीति--

पद (मम सुत भरत० या चालीवर)

चंपककलिकेला त्यजितीं । पंकजीं गुंजारव करिती ॥
तेथें नच होई तृप्ती । शोधित आम्रकळी फिरती ॥
वासहीन त्या कण्हेरिच्याही पुष्पावरि घिरटी ।
घालित दिवसरात्र शिणती ॥१॥

मग, पुरुषांची आणि त्यांची कशी ग जोडी करतेस ?

देवी ! पहा हे पुरुष कशा वर्तनाचे --

पद (चाल सदर)

अमृतसागर[५५] जरि मिळला । तृप्ति न होई चित्ताला ॥
कोठे शोधिति सरितांला । कूपीं प्रीति होइ त्याला ॥
गढुळ नासके तलाव शोधिति व्यथित देह सगळा ॥
तृष्णा सोडि न परि त्यांला ॥१॥

वैजयंती ! असतील असे कोणी पुरुष, पण मनुष्याप्रमाणे देवांना मानणे म्हणजे महापातक संपादणे, असें म्हणतात.

अग, देव ! देवांपेक्षा मनुष्य भारी उत्तम; अग, खरें पहा, मनुष्यांना देवाचें भय असते, पण हे निर्भय आणि निरंकुश. मनुष्यांनी पातक केले तर यमाचे बंधन आणि या महापातकी देवांचे पूजन, अर्चन.

पुरे ग, वैजयंती ! आपल्याच देवांचे आपण वंचन करणे, हे आम्हांस त्यांच्या प्रजाजनांस प्रशस्त नाहीं. आम्ही त्यांचे वंदनच करावयाचे.

हेंच ते देवी ! प्रजाजन काय की परिजन काय, सत्य बोलण्यास जर स्वतंत्रता नाही, तर स्वर्गवासापेक्षा नरकवास भारी उत्तम.आतां माझे हे सारे विचार स्पष्ट आणि शुध्द[५६] भाषेत, देवसभेत, प्रदर्शित करणार आहे. सत्य आणि स्वातंत्र्य या भाषणांत वाईट दिसून यमाने जरी मला तप्त लोह-स्तंभास बांधलें तरी कपटी, मूर्ख पुरुषांच्या आलिंगनापेक्षा आनंदात राहीन.मग ते देव असोत की मानव असोत.

''स्वातंत्र्ये निधनं श्रेय: । पारतंत्र्ये भयावह :॥

हेंच जगाचे जीवनतत्व आहे. केवळ उदरंभरण हे जीवाचे भूषण नाही. देवी ! काय सांगू, माझ्या मालकीच्या य:कश्चित् स्वतंत्र वस्तूपेक्षा मला परंतत्र सिंहासनहि आवडत नाही.

वैजयंती ! तुझें मस्तक जरा तप्त झाल्यासारखे दिसते. बोलण्याचा हेतु काय, मुद्दा काय, काहींच संगति लागत नाहीं; बरं ये जरा, त्या सरस्वती नदींत स्नान[५७] करून शांत होऊं.

देवी ! सरस्वतीच्या स्नानानेंच मला सत्य आणि स्वातंत्र्य यांची गोडी लागली आहे. सत्य, स्वतंत्रता आणि सरस्वती यानाच त्रिवेणीसंगम म्हणतात.

वैजयंती ! भारीच उच्छृंखल झालीस तूं देवांवरहि तोंडसुख घेतेस. देव आहेत म्हणून जग चालते आहे. पति[५८] हा पत्नीचा देव आहे, पतीच्या आज्ञेत राहण्यात जे भूषण आहे, ते भारी पुण्याईचे लक्षण आहे. धर्मपत्नीपद मिळण्यास पुष्कळ पुण्याई पाहिजे.

अलंबुषादेवी ! काय ग तूं जाणूनबुजून देवांची तरफदारी करतेस-देवाचा ढळढळीत अन्याय, अविचार आणि मूर्खपणा तुला दिसत नाही असे मी मानीत नाही. हांजीहांजीपणा हा पाजीपणा आहे. सत्याचा अपलाप करून देवांची प्रीति संपादन करण्याची तुझी इच्छा असली तर ती फार चुकीची आहे.

वैजयंती ! देवांनी इतके तुझें काय वाईट केले आहे ?

देवी ! माझे व्यक्तिवाचकच कां वाईट केलें पाहिजे? देव अन्याय करतात, अधर्म करतात आणि मनुष्य लोकांना वाईट कित्ता घालून देतात; आमच्या भगिनी वर्गावर होणार कहर आणि छळ[५९] न्याय्य मानतात.

छे, बाई, आमच्या भगिनी वर्गावर कसला ग छळ आणि कहर होतो? आर्य स्त्रिया आनंदात असतात आणि तुला ग काय त्याची चिंता ?

काय देवी ! आर्य स्त्रिया आनंदात असतात? अज्ञान-नरकांत रूजतात, पारतंत्र्य कर्दमांत रूळतात आणि काय आनंदसागरांत डुलतात? पण आर्य स्त्रियांची अभिमानी आर्यधरणी आपल्या कन्यांना पारतंत्र्य रौख्रांत पाहून स्वातंत्र्य-कुंकुम कसे लावते हेच आश्चर्य आहे.

वैजयंती ! तुझी स्थिती पाहून मला मोठी भीतीच वाटत आहे. देव, आपले अन्नदाते आहेत. त्यांच्याविरूध्द कधींच बोलू नये; त्याना मूर्ख अविचारी म्हणणें म्हणजे कडक शिक्षेस पात्र होणे.

देवी ! सत्याला[५०] कधीच भीति नाही, म्हणून पुनरेव सांगते, मनुष्यापेक्षा देव महा मूर्ख, कपटी आणि विचारशून्य[५१] इतकेच नाही, तर ते आपल्या दुष्कर्माचे फळ भोगूनहि शुध्दीवर येत नाहीत.

वैजयंतीचे मस्तक इतके कशाने बिघडले? वैजयंती ! जरा शांत हो ग. असे मस्तक भडकू देऊं नकोस. चल, त्या सरस्वती नदींत स्नान करून शांत होऊं. स्वर्गापेक्षा येथे जरा चंडकिरण संताप देत असतो.

देवी ! संताप देतो म्हणूनच त्याची आर्य लोक पूजा करतात.

बरं, ते असो. वैजयंती, पाहिलीस ना, तिकडे श्रीभगवान् विष्णूची मूर्ति आहे ती. जाऊंया आधीं, सरस्वती नदीत स्नान करून त्या देवास नमस्कार करूं, आणि त्या तुलसीवृंदावनास प्रदक्षिणा[५२] घालू.

हा, हा, देवी ! मी सारे बोलत्ये त्याचें सारतथ्य याच देवतेंत आणि त्या वृंदावनांत आहे.

वैजयंती ! सरळच बोलतेस ना? कोठे भगवान् नारायण, कोठे तुलसीवृंदावन आणि कोठे तुझे संभाषण ?

देवी ! माझे सारे विचार तूं लक्षांतच घेतले नसतील. त्याचे सारे बीज[५३] याच नारायणवृंदेच्या चरित्रात आहे.

वैजयंती ! कोठे भगवंताचे चरित्र, आणि कोठे तुझे बोलणे अपवित्र !

देवी ! जागी असून निद्रेचे सोंग घेतेस का ? पहा यांचे चरित्र-

पद (चाल - वसंती बघुनि०)

सुनिर्मल जालंधर-ललना । पतिव्रता जी सद्‌गुणखाणी सुकवि
देति माना ॥ तिजशीं कपटा आदरिले।
धर्मनीतिचे बिरूद सर्वही कां ग लया नेले ॥ परस्त्री भगिनीसम माना ।
लोकां सांगुनि अभिलाषिति हे नमिति लोक त्यांना ॥

देवी ! आणि सांग --

(पद चालू)

जगत्त्रयसुंदर लक्ष्मीला[५४] । सोडुनि कैसी दैत्यकामिनी
आवडली त्याला ॥१॥

वैजयंती ! तुझे फारच झाले गं. आपलें शहाणपण भारीच ओततेस.

देवी ! माझें मूर्खपण असो ; सत्य भाषण मूर्खत्वाचें लक्षण, असेच ना? पण आपल्या भगवंताचें शहाणपण, या कपटकार्यात[५५] आर्य लोकांनी वर्णावियाचेंच.

वैजयंती ! (स्वगत) हिच्या बोलण्यात तथ्य आहे खरें.

देवी ! तू खरेंच सांग, वृंदेच्या सौंदर्यास सीमाच नसली, किंवा भगवंताची इच्छा अनावरच झाली असली, तर इतके कपटाचरण करण्याचे कारण नव्हते.

वैजयंती ! भगवान् नारायणास शहाणपणा नाही ना?

देवी ! पहा, आपले भगवान्---

साकी

किरिट कुंडलें[५६] अलंकारमय गरुडारूढ होवोनी ।
गेला असतां वृन्दा होती तल्लिन नच का चरणी ? ॥
कपटा नाचरितां। होती प्राप्त दैत्यकांता ॥१॥

वैजयंती ! आपल्याप्रमाणे वृन्देला अप्सराच का समजते?तिचे पातिव्रत्य किती जाज्वल्य ! वृन्दा किती पुण्यवान् रूपवान्; तुला बोलतांना भानच उरत नसते.

देवी ! माझें बोलणे तुझ्या लक्षांतच येत नाहीं. अग, शहाणपणा कांही शिकवून येत नसतो. आणि अशा गुलाबी व्यवहारांत, गोडीगुलाबीनेच कार्यें होत असतात. कपट पाप करून शाप घेण्याचें आपल्या नारायणास कारण नव्हतें. अग, त्यांनी त्या वृन्देस आळवून वळवून वश केली असती, तर देवांची इतकी नालस्ती झाली नसती. पुरुषांना स्त्री वश होत नाही, तर पौरूष ते कसचें?

वैजयंती ! काय तुझे हे प्राकृत विचार! भगवंतांनी हे कृत्य कशाकरतां केले, हे तुला समजण्यास बरेंच दूर जाण्यास पाहिजे. त्रिलोकास[५७] त्रास देणारा जालंधर दैत्य, याचा नाश करण्याकरतां भगवंतास असें करणे प्राप्त झालें; वृन्देच्या

सौंदर्यास भुलून का भगवान् तिकडे गेले होते? जगद्रक्षणाकरतां अशीच कांही कृत्ये करावी लागतात.

देवी ! हेंच तें, जगाचें रक्षण, सत्कृत्याचें लक्षण, पण यांत देववर्याचें चातुर्याचें मात्र कार्य झालें नाहीं. वृन्देला वश करून तिजकडूनच जर जालंधरवधाची युक्ति[५८] साधवली असती, तर त्या श्रेष्ठ व्यक्तीच्या गुणाची नालस्ती न होतां भगवंताची कीर्ति[५९] अजरामर झाली असती. देवी, तुला नाही का ठाऊक, आर्यावर्तातील एका वानराने असे शहाणपणाचे कार्य केल्याचा पुराणांत पुरावा आहे. आणि त्याची पूजा करतात ते पुण्यवान् वानराच्या युक्तीपुढे नरांची बुध्दिशक्ती कांहीच उपयोगाची नाही हे वस्तुस्थितीला धरूनच आहे.

वैजयंती ! किती ग बेताल सुटलीस तू, तुला कितीदां सांगितलें, देवांचे दोष काढणे, नव्हे ऐकणेदेखील पाप म्हणून.

देवी ! अनुचित कार्य करणे पुण्यकर्म, बोलणे अधर्म, संतत चातुर्मासांत लक्ष्मीदेवीला विरहताप[७०] पडतात म्हणून संताप वाटतो, देवांची दृष्टि सृष्टिहून भ्रष्ट मतीची असे ऐकले, म्हणजे मन कष्टी नाही का होत? लक्ष्मीदेवीने केले पाप, आणि आतां करते पश्चात्ताप.

वैजयंती ! लक्ष्मीदेवीने कसचे ग पाप केले, आणि पश्चात्ताप कसचा ग करते आहे ? माझ्याच कर्माचे पातक, आणखी काय ?

देवी ! तूं इतकी शहाणी असून, कोणाला ग अज्ञानाची कहाणी सांगतेस? तूच पहा, ज्या लक्ष्मीदेवीने देव, दानव मानवांस दूषणे देऊन, सारासार विचारी, अव्यभिचारी[७१] म्हणून ज्या श्रीहरीस, नवकमलांची माळ कोमल हस्ताने अर्पण केली, त्यानेच तुळशीला माळ घातलेली पाहून, रमादेवीचे गुलाबी गाल लाल झाल्यास नवल ते काय?

वैजयंती ! मी जातेच तर आता स्वर्गावर, तुझे क्षुद्र विचार देवेंद्रास अभद्रच वाटणार; लोककल्याणार्थ, जगद्रक्षणार्थ अशीं कांहीं कृत्ये करावी लागतात, देवांना आणि मानव स्त्रियांशी पापवासना?

देवी ! अशा मानभावीपणाने तुझा मान अधिकच वाढणार, देवेंद्रास हें बोलणे अभद्रच वाटणार; भगवंताची करणी लोककल्याणार्थ, आणि देवेंद्राची करणी त्रिलोकहितार्थ; त्यास सौंदर्याची लालसा नाही, पापाची वासना नाही, सारें पुण्यकर्म; देवांकडून अधर्म कधींच व्हावयाचा नाही, असेंच ना?

वैजयंती ! देवेंद्रावरहि उपसली का तरवार? चांगला विचार-

देवी ! खरेंच मनापासून सांग, कशी ग--

पद (चाल-उरला भेद न ज्या कांही)

शचीहुनि गौतममुनि-जाया । होती सुंदर का जगिं या ॥
रंभा ऊर्वशि यांहुनियां । अहल्या वाटे सुरराया ॥
मुनीची उग्र तपोमुद्रा । ठाउक नव्हती देवेंद्रा ॥
कामेच्छेला[७२] बळी देउनी होमिति निज काया । शेवटी जन्म होय वायां ॥

वैजयंती ! अहल्येचे चित्रच जर तू पाहशील तर -

हा, हा, देवी ! भारीच आरत्या ओवाळीन त्रिलोकसुंदरीच्या सरीस कोणीच मिळणार नाही. अरण्यांत वास, गोमयाचा सुवास, वल्कलांची पीतांबरे आणि त्याच्या गांठी तर कंठाशी, खासा पेहराव; इगुदी फळांचे तेल अंगास चोळले म्हणजे अनंगाने गुंगूनच जावयाचे. पतिव्रता तर तरवारीची धार, बोलण्याला हुशार, मोठी लीलालावण्यवती म्हणूनच शिळा होऊन पडली. देवेंद्राचा मूर्खपणा म्हटल्यास आपली मुद्रा वळणार.

काय करावयाचें होतें म्हणतेस ग, वैजयंती ! भगवंतास म्हणते शहाणपणा नाही; देवेंद्र मूर्ख; संगतीचा दोष[७३] आला माझ्या नशिबात; देवेंद्राने काय किरीटकुंडले घालून यावयाचें होते?

देवी ! इतकेंहि नको होतें. एखादें विमान पाठवून तिला जर स्वर्गावर नेले असतें, तर

साकी

नंदनवनिंचे राजविलासी[७४] भोग भोगितां तिजला ।
घोर वनींच्या पशुंची ऋषिंची यादस्ती तरि मतिला ॥
होती काय कधी? । सागर चुंबित शुध्द नदी ॥१॥

देवी ! बोलणें असत्य असल्यास खोडून टाक. कपटाचें पातक महाघातक. खुशीचा व्यवहार, मोकळा बाजार, असे उगीच नाही म्हणत.

वैजयंतीचें तोंड कोण बंद करील? अग, यांतील इंगिते निराळीच असतात. हें देवेंद्रास कळल्यास परिणाम वाईटच होणार, देवांस सर्व श्रुत असते. सत्य असलें तरी पथ्य दिसलें पाहिजे.

खरंच ग, देवेंद्रास सहस्र नयन आहेत; तेणेंकरून त्यांना सर्व दृश्य आहेच; दोषाचें दूषण, भूषणच झालें तर.

वैजयंती ! मी जाऊं का स्वर्गावर? देवांची लीला देवांना माहीत, सामान्य लोकांत त्यांची का गणना करतेस? त्यांच्या कृत्याचा अर्थ निराळाच असतो; त्यांच्या कोपाने तुझी जीभ भस्म होईल.

देवी ! माझीच जीभ भस्म होईल का जगाचीही जीभ भस्म होईल ? विहिरीचे तोंड बंद करवेल, पण समुद्राला मात्र बांध घालवणार नाही. पापकृत्ये आकाशांत बोलतात. सोमराजाचा कलंक आंधळ्यांसहि डोळस करतो की नाही? नको नको म्हणते तरी जिव्हा सत्यास सोडीत नाही. आपल्या चंद्राने गुरुतल्पगामित्व स्वीकारलें तें पापवासनेने अगदीच नाही. जगाच्या कल्याणार्थ ! देवांनी पापकृत्ये केलीं नसतीं तर पृथ्वी कधींच समुद्रात बुडून गेली असती.

वैजयंती ! आपले बृहस्पति असेंच का बोलतात?

देवी ! बृहस्पतीच्या मुखांत वेदांची सूक्ते. त्यांत काय सांगू, इंद्र आणि चंद्र यांचीच स्तोत्रें.

वैजयंती ! आलें ना ध्यानांत, मोठ्यांचीं दूषणे भूषणे मानतात. आपल्या सोमराजाचे लांछन, लक्ष्मीकारक[७५] समजतात, म्हणून आम्ही लहान जनांनी महाजनांचे[७६] वर्णनच करावयाचे.

देवी ! तेहि खरंच ग वर्णन. सहस्रनयन, कलंकितवदन, असें कविजन वर्णन करतात, आणि हे आपल्याशींच डुलतात. राजयक्ष्मा[७७] सोमराजाला मानवला; धन्वंतरीसारख्या वैद्यराजांना असाध्य दिसला; असेच ना लोक बोलत? आणि काय सांगू देवी! तारादेवी गुरुपत्नी; केवळ माता आणि तिच्याशीहि पापवासना ! आणि काय ती रूपाने चटकचांदणी, का अभिनव तारूण्याची कोंदणी? अशी लोकांची बोलणी ऐकली म्हणजे कानाच्या वळणी उठतात. व्यभिचारासारखा दुराचार दुसरा असणार नाही.

वैजयंती ! या कथेचे बीज आम्हांसारख्यांना नाहीं ग समजत; उगीच जीभ शिणवूं नकोस. वैजयंती, भारीच प्राकृत आहेस.

काय देवी ! मी प्राकृत आणि देव सुसंस्कृत देवी ! कडक आणि बेधडक सांगते, मी जरा जिव्हेस वीज देईन तर त्या महान महान देवांच्या देवत्वाचें वीजच नाहीसें करीन. बोलून दाखवूं का अनसूयेचा पाळणा? एका साध्वी स्त्रियेशीं नग्न होऊन अन्न वाढ म्हणणाऱ्यांशीं, धर्मनीतीने लग्नच लावावयाचे. त्रिलोकाचे धणी आणि अधर्माची करणी.

वैजयंती ! कोठें ग मजल मारलीस तू ? मी जरा शांत ऐकतें. तितकें तुझें अधिकच वाढतें. या दैविक कथांतील रहस्ये रूपकात्मक[७८] असतात. आर्य विदुषी गार्गी हिने देवमहिला परिषदेंत दिलेलें व्याख्यान त्वां ऐकले नसेल. अत्रि म्हणजे अ-त्रि अर्थात् त्रिगुणरहित[७९] परमात्मा अनसूया म्हणजे आदिमाया; इच्छाशी, सत्व, रज, तम यांचा संगम, मला तरी तितकें ज्ञान कोठें आहे? गणपतीच्या शुंडेचें तिने असे ॐ कारात्मक रूपक केलें, की देवस्त्रिया अगदीं भांबावून गेल्या. आतां तुला तिजकडे घेऊन जातें, ती तुला सारखा अर्थ करून सांगेल. चंद्र कोण, तारा कोण, अहल्या म्हणजे काय, इंद्राचे स्वरूप काय, मला तर तिच्याजवळ बराच वेळ घालवला पाहिजे.

हा, हा, देवी ! भारीच मान्य, आर्य विदुषी गार्गी ना? तिला तर वेदांचा पूर्ण अधिकार. मी तिला एकाच गुणाकरतां भारीच मान देते. गार्गीला गुणनिका[८०] उगीच नाहीं म्हणत.

वैजयंती ! कसला ग एकच गुण ? मोटीच बाई गुणपरीक्षक.

देवी ! गार्गीने म्हणतात आपलें सत्य आणि स्वातंत्र्य विवाहहोमांत भस्म करून टाकिले नाहीं. देवी ! मनापासून कंठरवाने सांगते, विवाहाची जिनें वज्रगाठ बांधली, तिची गाठ घेण्यास माझ्या काळजाची गाठ कंटाळत असते.

भले विचारतरंग, वैजयंती ! लग्न करूच नये, साऱ्या अप्सराच व्हाव्या ना? डुकरासदेखील आपले जिणे सुखकारक वाटतें असें म्हणतात.

देवी ! माझें सत्य मत ऐकूनच घेत नाहींस; अग, पूर्ण अनुभवाने सांगते; हे आपलें लग्नाचें विघ्न जगांतून नाहीसे होईल तर यमाचे काम निम्म्याहून कमी प्रमाणावर येईल देवीचें चित्त चिंतेने भारीच भारून टाकले.

देवी ! सांग तरी, तुझें कोणतें कार्य ?

वैजयंती ! तुझेंच सारे व्याख्यान बोलून पुरे कर, दोन कानांत दोनशे शब्द कसे मावतील?

नाहीं ग, नाहीं, देवी ! सांग तुझें कोणतें कार्य अडलें आहे तें.देवेंद्राला आणि आर्यावर्तात कार्य ?

वैजयंती ! सत्य आणि शांत रीतीने सांगतें. अग, या वनात दधीची नावाचा एक महान तपोनिधि[८१] ऋषी आहे.

हा, हा, देवी! ऋषींच्या गोष्टी ऐकाव्या तपस्विनी[८२] बायांनी, आम्हांला ग त्यांच्या दाढयांशी आणि जटांशी काय कर्तव्य आहे ? मला तर पावलोपावली दगडासारखे ऋषि अडखळतात. वृक्षांचे अंकुर आणि हे जटासुर ओळखण्यास भारीच अडचण पडते. मेले रानावनात जिकडेतिकडे पडलेले असतात, कित्येकावर राऊळांसारखी वारूळेच मांडलेली दिसतात; अग, त्यांच्या त्या पाषाणदेहाला सर्पाचादेखील दंश बाधत नाही; अगदी मांसाचे वृक्ष, वाघ[८३] पहात नाहींत आणि सर्प चावत नाहींत.

वैजयंती ! शांत ऐकतें म्हणतेस तें हेंच ना? त्या ऋषीचें सामर्थ्य तुला माहित नाहींसे दिसतें, त्या ऋषीच्या तपोबळाला देवदेखील भीत असतात. उगीच कांही बोलूं नकोस, ऋषीच्या शापाने भस्म होऊन जाशील.

काय, देवी ! ऋषीच्या शापाने[८४] कोण भस्म होतात, मनुष्य ना ? राक्षसांच्या भयाने होमकाष्ठे घेऊन पळणारे ऋषी, भगवंतास कितीदां ग अवतार घेण्यास लावतात? लक्ष्मीदेवीला, सुखशांत आदिनारायणाचे पाय म्हणून चुरण्यास देतच नाहीत; म्हणून तर ती त्यांच्यावर सदोदित बोटें मोडीत असते. ऋषि म्हणजे ब्राह्मणच ते; मोठे खट्याळ. ब्राह्मणाचें कल्याण कोणच मागणार नाहीं.

वैजयंती ! तूं अद्याप ऋषीचें खरें रूप पाहिलेंच नसेल; ब्राह्मण आहेत म्हणूनच जग चालतें आहे. सर्वश्रुत म्हणते आणि अद्‌भुत अपूर्व बोलते.

देवी ! मी ऋषींचें खरें रूप पाहिलें नाहीं खरें, पण ऊर्वशीताईच्या मागून लागलेल्या कुत्र्यांचें मात्र सुस्वरूप साऱ्या अप्सरांनी पाहिलें आहे. कोण ग ते देवी? ब्रह्मर्षि का राजर्षि[८५]? केवढा प्रताप,

''ब्रह्मदेवास दटावून क्षणमात्रें । प्रतिसृष्टि केली विश्वामित्रे ''

देवी, तेच ना ते? आपल्या एका अप्सरेने अर्ध्या दृष्टीने भ्रष्ट करून सोडले ! आम्हां अप्सरांची सर सरस्वतीलाहि येणार नाहीं.

वैजयंती ! माझे कान कंटाळले, पण तुझे दांत शिणले नाहींत; जिव्हेला अगदीं स्वैर[८६] सोडलीस. आपलेंच गुणवर्णन[८७] आपणच करावें हें नीच कृत्य म्हणतात; आणि आधिक दोष असले म्हणजे अधिकच श्रेष्ठत्व दाखवावें असाहि नीच मनुष्याचा स्वभावगुण असतो.

देवी ! सत्याला लत्ताप्रहारच तर योग्य ना ?

ते असो, वैजयंती ! बराच वेळ झाला. सूर्यनारायण अस्ताला गेला हें देखील कळले नाही. आतां जरा सरस्वती नदीत स्नान करून थोडासा फराळ करू.

फार, सरस पण देवी ! फराळाशीं आणि स्नानाशीं कोणता संबंध ? आहारांत आणि व्यवहारांत पूर्ण स्वातंत्र्य ठेवले पाहिजे. लाज, भीड तर अगदीं उपयोगाची नाही.

''आहारे व्यवहारेच त्यक्त लज्जः सुखी भवेत् ''

वैजयंती ! पाहिलेस का?

पद (चाल हा सकळ देह०)

रजनिनाथ नभ प्रकाश सुखवि लोक सारा ।
नक्षत्रें[८८] शुभविलास करिति जगि पसारा ॥
चंडकिरणतापाने । झाल जे व्यथित मने ।
सुखवाया निद्रेने । सुटत मंद वारा ॥१॥

---

१. शक्तनिपुणता लोके शास्त्रकाव्याद्यवेक्षणात् - काव्यप्रकाश.
२. लब्धमोक्षास्तदादेशाद्यथेष्ट गतयोऽभवन् । - रघुवंश
३. तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः । - भर्तृहरि
४. मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथा वृत्तिचेतः । मेघदूत.

५. अस्तुत्तरस्यां दिशिदेवतात्मा । हिमालयो नाम नगाधिराज : ॥
पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य । स्थितः पृथिव्या इव मानदंडः ॥ - कालिदास,

६. केन गुणेन भवानीतात हिमानी मिमां वहसि । - भामिनीविलास.

७. सुतंत्रिगीतं मदनस्य दीपनम् - ऋतुसंहार

८. अयच कुसुमायुधप्रियसुदृढ क्षणैः पंचषैर्भविष्यति - विक्रमोवर्शीय

९. रतिर्मनोनुकूलेऽर्थे मनसः प्रवणायितम् । - साहित्यदर्पण

१०. प्रजासु पश्चात्पथितं तदाख्यया । जगाम गौरी शिखरं शिखण्डिमत् ॥
- कुमारसभंव

११. फाल्गुने गगने फेनेण त्वमिच्छंति वर्वरा । - पंचतंत्र

१२. (गौरीशंकर १९८९० हात आणि कांचनगंगा १९३०७ हात)

१३. हंसपंक्तिरपि नाथ संप्रति, प्रस्थिता वियति मानसं प्रति । - मेघदूत

१४. चित्रस्थानपि रोदयंति शतधा कुर्वंति भित्तोरपि । - काव्यप्रकाश

१५. भागीरथीतीर तपोवनानि । - रघुवंश

१६. म्हैसूर प्रांत

१७. अन्येनात्राक्रांते म्लेच्छाटविकश्वजीवि गोमन्तान् । - बृध्दहिता अ. ९.

१८. संध्याश्च लेखेव मुहूर्तरागाः । - मृच्छकटिक

१९. वेदांचा अर्थ व्यासासी । न लागला परियेशी ॥ - श्री गुरुचरित्र.

२०. स्त्रीरत्नेषु ममोर्वशी प्रियतमा यूथे तवेयं वशा । - विक्रमोर्वशीय

२१. स्त्रीयंत्रं केन लोके विषममृतमयं प्राणिनाशाय सृष्टम्। - विक्रमोर्वशीय

२२. अयं वारामेको निलय इति रत्नाकर इति । - काव्यप्रकाश.

२३. तर्जितः परशुधारया मम । - रघुवंश.

२४. वेताढ्यापारयोः संधो समुद्रस्योदरे स्थिती । - सह्याद्रिखंड.

२५. आशा बलवती राजान् । - वेणीसंहार.

२६. अर्चिस्तुंगा नभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान् । - मेघदूत.

२७. दृष्टवायासां नयनसुभगं वंगवारांगनानाम् । - श्रृंगारतिलक.

२८. स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परांगतिम् । - भगवद्गीता.

३०. हिंदुस्थानची दक्षिणोत्तर लांबी २००० मैल आणि रूंदी १९०० मैल.
मध्यमान ७०० कोस. - रामचंद्र जनार्दन गोखले इ.अ. (भूवर्णन)

३१. मनुस्मृति २-१७.

३२. गायन्ति देवा किल गीतकानि । धन्यास्तु ते भारतभूमिभागे ।। स्वर्गापवर्गास्पद मार्गभूते । भवान्ति भूपः पुरुषा सुरस्वात् ।। - विष्णुपुराण

३३. आसमुद्रा तुवै पूर्वादासमुद्राच पश्चिमात् । तयो रेवान्तरंगियोः
आर्यावर्त विदुर्बुध : ।। - मनुस्मृति
आर्यावर्त : पुण्यभूमि मध्ये विंध्य हिमालये : । - अमरकोश.

३४. परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।। - भगवद्गीता.

३५. आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् । - शाकुंतल.

३६. नवावतारं कमलादिवोत्पलं । - रघुवंश

३७. धर्मार्थकाममोक्षाणामवतार इवांगवान् । - रघुवंश

३८. वंशस्य कर्तारमनंतकीर्तिम् । - रघुवंश

३९. जगतः पितरौ वंदे पार्वती परमेश्वरौ । - रघुवंश

४०. विश्वासोपगमादभिन्नगतयः शब्दं सहंते मृगः । - शाकुंतल.

४१. स्वच्छदोच्छलदच्छच्छकच्छकुहरच्छातेतरांवुच्छटा । - काव्यप्रकाश.

४२. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते तत्र देवताम् । - मनुस्मृति

४३. स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमोहि प्रियेषु ।। - मेघदूत

४४. मुग्धे मानमपा करोषि नमनागद्यापिरोषेणते । - भामिनीविलास.

४५. स्त्रीणामशिक्षित पटुत्वममानुषीषु । - शाकुंतल.

४६. ध्यानं चिंताहितानाप्ते : शून्यताश्वासतापकृत् । - काव्यप्रकाश.

४७. कार्यारंभेषु संरभः स्थेयानुत्साहमुच्यते । - साहित्यदर्पण.

४८. सुखे वा दुःखे वा क्वनु खलु तदैक्यं हृदययोः । - उत्तररामचरित्र.

४९. प्रियंच नानृत ब्रूयात् । - मनुस्मृति.

५०. ब्रह्मदेवाचा पुत्र नळ तयाची । मार्ग करण्याला शक्ति नसे साची ।। - उत्तररामचरित्र

५१. सुर म्हणति वानराणामपि न नराणां सुमंगलं जननं ।। - मोरोपंत

५२. घुंबुनि शंभु म्हणे वा तुजसम आम्नाय बोलका नाही । - मोरोपंत

५३. पात्रीकृतात्मा गुरुसेवनेन स्पष्टाकृतिः पत्ररथेंद्र केतो : । - रघुवंश

५४. तिरश्चकारक्षमराभिलीनयो : सुजातयोः पंकजकोशयोः श्रियम् । - रघुवंश

५५. देवासुरैरमृतमम्बुनिधिर्ममन्थे । - किरातार्जुनीय.

५६. सतैराक्रमयामास शुध्दांत शुध्दकर्मभि :। - कुमारसंभव

५७. धर्मार्त न तथा सुशीतल जलैः स्नानेन मुक्तावलीः । - हितोपदेश.

५८. तमलभंत पतिं पतिदेवताः शिखरिणामिव सागरमापगाः । - रघुवंश

'' विशील : कामवृत्तो वा गुणै वा परिवर्जितः। उपचर्यः स्त्रिया साध्व्या सतत देववत्पति : ॥ - मनुस्मृति अ. ५

५९. प्रत्यर्प्य पूजामुपदाशलेन । - रघुवंश

६०. सत्यपूतं वदेद्वाक्यं । - मनुस्मृति

६१. विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्। - रघुवंश

६२. प्रदक्षिणीकृत्य हुतं हुताशम् । - रघुवंश

६३. अंतर्गूढ क्षितिरिव नभो वीजमुष्टि दधाना । - रघुवंश

६४. तयामेने मनस्वित्या लक्ष्म्याच वसुधाधिपः । - रघुवंश

६५. केनाप्यनर्थरूचिना कपटं प्रयुक्तम् । - शांतिशतक.

६६. कुंडली कुल कुंडलेन पातालं - रसगंगाधर

६७. तएवहि त्रयो लोकास्तएव त्रय आश्रमः। - मनुस्मृति

६८. असाक्षिक हते चिन्हेयुक्तिमिश्चागमेनच । - याज्ञवल्क्यस्मृति

६९. वंशस्य कर्तारमनंत कीर्तिम् । - रघुवंश

७०. कः सन्नध्दे विरहविधुरां त्वव्युपेक्षेत जायाम् । - मेघदूत.

७१. एवं विमृश्याव्यभिचारी सद्गुणैर्वरं ॥ निजैकाश्रयतया गुणाश्रयम् ॥
वद्रे वरं सर्वगुणैरपेक्षितं रमा मुकुन्दं निरपेक्षमीप्सितम् ॥ - भागवत ८ स्कन्ध श्लो. २३

७२. कामार्ताहि प्रकृति कृपणाश्चेतनाचेतनेषु ॥ - मेघदूत.

७३. दोषाऽपि नूनमहिमांशु रसौ किलेति । - शिशुपालवध.

७४. असामाप्य विलासमेखलां, किमिदं किन्नरकंठि सुप्यते । - रघुवंश.

७५. मलिनमपिहिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीतनोति । - शाकुंतल.

७६. महाजनस्य संपर्कः कस्य नोन्नतिकारकः । - कुमारसंभव.

७७. राजयक्ष्मेव रोगाणां समूहस्य महीभृताम् । - शिशुपालवध.

७८. दृश्यं तत्राभिनेयं तद्रुपारोपातु रूपकम् । - साहित्यदर्पण.

७९. व्रताय मौजी त्रिगुणां बभारयाम् । - कुमारसंभव.

८०. विशेष विदुषः शास्त्रं यत्तवोद्ग्राह्यते पुरः ।हेतुः परिचयेस्थेर्ये वक्तुर्गुण- निकैवसा ।
- शिशुपालवध

८१. तपोधनं वेत्सि न मामुपस्थितम् । - शाकुंतल

८२. नवप्रसूतिर्वरटा तपस्विनी। - नैषधचरित्र

८३. चित्त शुध्द तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र न भक्षिती सर्प तया ।। - तुकाराम

८४. निर्वीर्य गुरुशापभाषितबशात् किं मे तवेयायुधम् । - वेणीसंहार.

८५. एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः । - भगवद्गीता.

८६. स्वैर शेषे गज इति किलव्याहृतं सत्यवाचा । - वेणीसंहार.

८७. वाचाळा नाचावें सत्स्तवनी न स्ववर्णनी ओठें । - मोरोपंत कर्णपर्व.

८८. नक्षत्रताराग्रह संकुलापि - रघुवंश

■■

सर्ग ३ रा

आर्या

ज्याची शक्ति अगाधा कीर्तिसुधाप्राशनीं सदा शिव दे ।
तारो जगा सदाशिव भक्तजनीं सर्वदा सदाशि वदे ॥१॥

हा, हा, कितीतरी आनंद--

पद (चाल - तृणपर्णाहि०)

शांतिसुखाचें स्थान मनोहर श्रुतिस्मृतीचें आगर तें ।
धर्मनीतिचें मंदिर सुंदर वैराग्यामृत[1] ये वरतें ॥
सरस्वतीचें आरामस्थल विषयवासना[2] ये न मना ।
दधीचि मुनिंचे तपोतेजबल लावी स्वर्गा यद्भमना ॥
यज्ञयागविधि सुधीजनाच्या आनंदचि दे चित्ताला।
कामकोप हे सोडूनि असती तुच्छ मानुनी वित्ताला ॥१॥

काय तरी या पुण्यस्थलाचा प्रभाव। दधीचि मुनींचें आश्रमस्थान कधी पाहीन ही उत्कंठा भारीच लागली होती, काय हें गुरुकुल, मला तर --

पद (चाल - उरला भेद न०)

गुरुकुल पाहुनियां नयनी । झाला तोष बहु स्वमनीं ॥
शिष्य हे वेदाध्ययनातें । सुखानें करिति शांत चित्तें ॥
गुरु[3] हा जनक तयां वाटे । पाहुनि सदय कंठ दाटे ॥
पुत्राहुनिही दयापात्र करि सतत दीनरजनी ।
ज्याला सौख्य न नृपसदनी ॥१॥

धन्य, धन्य ! या आश्रमांतील वृक्ष, धन्य, दगड धन्य, हे पहा पशु तरी किती धन्य ! याना भीति, चिंता, शंका कशी असते हें तर स्वप्नांत देखील ठाऊक नाहीं.

पद (चाल - सदर)

गाई चाटिति व्याघ्राला । सिंहिण खेळवि गजबाला ॥
वृक हे हरिणी[4]सह क्रिडती । सर्पा नकुल देत शांति ॥
मांजर उंदिर खेळाला । पाहुनि हालवे न डोळा ॥

द्वेष-राग हे दग्ध जाहले मित्रभाव जडला ।
लोका ठाव न वैराला ॥२॥
शाबास, काय हे तरूगण, आणि या लता -

साकी

फलपुष्पांही आलंकृत या वृक्षवल्लरी दिसती ।
मयूर वायस आनंदाने स्वानंदामृति रमती ॥
वंधुभाव विमला । सद्‌गुण स्वातंत्र्यी रमला ॥२॥

काय हे ! या वृक्षावर मनुष्याप्रमाणे बोलतात ते कोण? हे, हे पहा, राघू आणि मैना, काय ! कर्म श्रेष्ठ की ज्ञान श्रेष्ठ यावर वाद करीत आहेत ! बरें, विचारूं तर यांना. काय ग मैनाबाई ! तूं कर्म कसें श्रेष्ठ म्हणतेस ?

कोण हा भट्टोबा ! या ब्राह्मणांना सभ्यता म्हणून कळतच नाहीं. ब्राह्मणवर्य ! तुला काय समजले ? कर्माचे मर्म विश्वकर्म्यालाहि अगम्यच आहे.

बरं तर, राघूदादा ! तूं ज्ञान तरी कसें श्रेष्ठ म्हणतोस ?

हा कोणी गावढळसा दिसतो. विप्रोत्तम ! ज्ञानवान् म्हणून ब्राह्मण[५] श्रेष्ठ

राघू ! उगीच बडबड करूं नकोस ब्रह्म म्हणजे ज्ञान, कर्माच्या स्वाधीन आहे.

''ब्रह्मकर्मसमाधिन; ''

मैने ! अज्ञानपणाने केलेल्या कर्माचें फळ फळत नाहीं का?

साकी

नकळत लागे अग्नि तरी का देहा त्रास न होती ।
अज्ञ जनाचें अमृतप्राशन व्यर्थ होय का जगतीं ॥
कर्मांचे फळ ते । सौख्यीं दु:खीं फळ फळतें ॥१॥

बाई मैने ! बाबा राघू ! तुम्ही उगीच वाद घालूं नका. ज्ञान हा पुरूष आणि कर्म हें स्त्री, असे म्हणतात. हीं उभयतां एकत्रच असलीं पाहिजेत.

काय भट्टोबा ! स्त्रियांना अज्ञान म्हणतोस?

साकी

ज्ञानजलाची तटिनि[६] स्वयंभू[७] सरस्वती स्त्री आहे ।
उपासनेचे कर्म करोनी पुरुष सेविती पाहे ॥
बुध्दी शुध्द नारी । देह हा पुरुष कर्मकारी ॥१॥

ब्राह्मणवर्य ! ही मैना भारी चंचल आणि असभ्य; दुसऱ्याला मान देण्यात धन्यता आहे, हे हिला अगदीं कळत नाहीं.

हो, पण राघू ! अज्ञानपणाने मान न दिल्यास, अपमान होत नाहीं. पक्षिणी म्हणजे स्त्रियाच, त्या चंचलत्वात[८] प्रसिध्दच आहेत.

अहो, भटजी ! भट म्हटल्यास अपमान झालासा वाटतो, तर म्हणतें, हे विप्रोत्तम ! आम्ही पक्षिणीच का चंचल ? तर --

पद (चाल-मम सुत भरत०)

लक्ष्मी चंचल हे म्हणती । तिज कां सर्व लोक पुजिती ॥
जियेची व्हावयास प्राप्ती । पातकराशी जगिं घडती ॥
कोणी मानिती निजपत्नी । ठेविति कोंडुनि कुणि यत्नीं ॥
सेवा[८] हेवा करिती कोणी देवांना पुजिती । कोणी तपती एकांती ॥१॥

बरं बाई, मैने ! तुम्ही पक्षिणी आणि देवी लक्ष्मी या एकाच पंक्तीच्या तर.

ब्राह्मणवर्य ! तुम्ही वर्णगुरु आहांत, नैसर्गिक ज्ञानवंत म्हणवतां, तर आम्हां पक्षिणीपेक्षां लक्ष्मी कशी श्रेष्ठ म्हणतां? आम्ही चंचल झालों तरी आपल्याच जातीच्या पक्ष्यांशी स्नेहसंबंध ठेवीत असतों, आणि लक्ष्मी ही

पद (चाल - मम सुरु भरत०)

चांडाळाला वश होते । विप्रां पायीं तुडवीते ॥
कधि ही क्षत्रिय पति म्हणते । वैश्यां वेश्यांशी रमते ॥
मूर्खाचि मानव तो इजला । स्पर्शूं देइ न सुज्ञाला ॥
सरस्वतीशी वैर मांडुनी, तभ्दक्तां छळिते । लोकीं अनीतिपथ रचिते ॥१॥

आणि पहा, आम्ही पक्षिणी एकाद्या पिंजऱ्यांत घातल्यास पळून जात नाहींत, आणि अगदी आपली लक्ष्मी वज्रपंजरांत नव्हे सात बंकाच्या कोठडीत कोंडून

ठेवली तरी कोणास न कळत पळून जात असते की नाहीं? आणि सांगा, आपले मनहि[९] चंचळच कीं नाहीं, बरें.

शाबास बाई मैने ! चंचल मनाशीं आपलें काय कर्तव्य आहे?

विप्रोत्तम ! आपण असे कसे म्हणतां ? मोक्षाला आणि बंधनाला मनच कारण आहे.

''मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:'' हें आपलेंच ना ? आणि पहा, सर्वांत मनाचाच वेग मोठा असतो की नाही?

राघूदादा ! आपण इतके ज्ञान कोणत्या गुरूंकडून शिकलां ?

विप्रोत्तम ! आपण ब्राह्मण, वर्णदृष्ट्या ज्ञानी, तर ही अज्ञानाची पांघुरणी काय म्हणून घेतां ? निसर्गासारख्या गुरु[१०] स्वर्गांतदेखील मिळणार नाही. गुरुत्वाची दृष्टी सारी सृष्टींतच भरली आहे. पहा तर --

पद (चाल - सार्थचि ते वदती)

तरूगण हा सगळा । गुरुवर आहे अखिल जगाला ॥
निर्लोभत्वें फल दानाला । देउनि करि तो तृप्त जनाला ॥
मारी तारी या उभयांला । छाया द्याया उशिर न त्याला ॥१॥

आणखी ---

परोपकारा[११] निज तनु झिजवी । लोकहितार्थी देहा चिरवी ॥
सुवासगंधें जग हें भरवी । शत्रू[१२] मित्र हा भेद न ज्याला ॥२॥

राघू ! हा पुरुष जातीचा पक्षपात नाहीं का होत? खरोखर जगाचे गुरुत्व आम्हां स्त्रियांकडेसच आहे. ह्या पहा, लता आणि वल्लरी --

साकी

परम सुवासिक कुसुमें निपजुनिलोकशिरीं ठेवाया।
निष्कामत्वें परोपकारां इच्छा तनु शिणवाया ॥
सुत्रा[१३] देवशिरीं । पुष्पें नेती निर्वैरी ॥१॥

मैने ! परोपकार शिकवणारे गुरु तर खरोखर पर्वतच आहेत --

दिंडी

लोहशस्त्रें जरि पीडिती तयांला ।
देति रत्नें निष्काम कांचनाला ॥
अग्निज्वालें जरि देह तापवीला ।
धान्य फळतें अर्पिती अधिक त्याला ॥१॥

राघू ! नद्यांसारखा गुरुत्वगुण कोणामध्येच असणार नाहीं.

गीत

व्याघ्र गाइ हा भेद न ज्यांला । जीवनदात्या अखिल जगाला ॥
बंधन घेउनि निज तोयाला । लोकां सुखवीती ॥१॥
ऊर्ध्व[१४] मूळ हे ज्यांचें असुनी । शाखा येती सागरजिवनीं ॥
परब्रह्माचे सद्रुप सुजनी । इष्टचि वंदाया ॥२॥
निज उदकाने तरू वाढविती । त्यांच्या नौका नच बुडविती ॥
मत्स्य-कच्छ-मकरांसहि देती । निज उदरीं ठावा ॥३॥

मैनाबाई ! यथार्थ वर्णन केलेस राघूदादा ! तुम्ही म्हणतां तें अगदीं बरोबर आहे.

साकी

निष्कामत्वे परोपकारा झिजविती निज देहाला ।
उपदेशचि हा उक्त दाविती निज कृतिने जगताला ॥
समता[१५] सर्व भुतों । धन्यचि ते गुरु या जगतीं ॥१॥

आम्ही सचेतन मनुष्यांनी, अचेतन वृक्ष, पर्वत, नद्या, लता[१६] यांकडूनच गुरुत्व संपादन केलें पाहिजे. बरं तर, आपला निरोप घेतो.

विप्रोत्तम ! आम्हा अज्ञान पक्ष्यांना, आपला आशीर्वाद योग्य होत नाहीं का?

फार उत्तम वेदसंहितेनेच आपणास आशीर्वाद[१७] देतों.

''देवाभागं यथा पूर्वे संजानानामुपासते ।
''संगच्छध्वं संगदध्वं सं वो मनांसि जानताम्।। ऋग्वेद मं. १०-१९१.

पक्षी हो ! तुम्ही एकचित्ताने, एकमतानें आनंदात रहा, हाच माझा तुम्हांस आशीर्वाद आहे.

ब्राह्मणवर्य ! आपला आशीर्वाद आम्हांस शिरसावंद्य आहे. पण तो अर्थ आपण स्वकृतीने जगास दाखवला पाहिजे; आपल्या आचरणाने इतर जन वळण घेऊन आपले चरण धुऊन पाणी प्राशन करतील. आपण सुवर्णगुरु, गुणहीनासहि वरती उचलून घेईल. विप्रोत्तम ! वाणी[१८] आणि करणी यांचा सावत्र संबंध आहे असें म्हणतात.

राघूदादा ! भारी सरस, मैनाबाई ! येतो बरं का.

ब्राह्मणवर्य ! आपल्या आशीर्वादाने आम्ही पुनीत झालों; पण आमची अज्ञान पक्ष्यांची नि:पक्षपाती विनंति आहे; आपण ब्रह्मज्ञानी ब्राह्मण, सरस्वतीचे पति आहांत, आपण एक मति, ऐक्य कृति, शुध्द रीति वर्तन कराल तर जगाची अधोगति कल्पांतिंहि[१९] होणार नाहीं; आणि आपल्या वेदमूर्तीची, केवळ संघशक्तीनेच, त्रिलोकांत अजरामर कीर्ती गाजून राहिल.

मैनाबाई ! फार आभार झाले. राघूदादा ! येतो हं.

ब्राह्मणमहाराज ! आम्हांस नमस्काराचा अधिकार नाहीं. आपणास वेदांचा अधिकार आहे, आपण जगाचे आधारस्तंभ आहांत, म्हणून आम्ही अज्ञ जनांनी साभार सत्कारच करणें इष्ट आहे; महाराज रागावूं नका. आपण पृथ्वीवरचे देवच आहांत. भूदेवांत हेवा उत्पन्न झाल्याने नीचतर सेवा करण्याचा प्रसंग येतो असे बुध्दिमतांचे शुध्द प्रतिपादन आहे.

काय ह्या पक्ष्यांचे उच्च विचार ! दधीचि मुनीच्या आश्रमांतील पक्ष्यांची कक्षा भारीच आकांक्षा[२०] उत्पन्न करीत आहे. आतां त्याचें निर्मल गुरुकुल अवलोकन करून पातंजल मुनींना प्रेमळ हकिगत निवेदन केली पाहिजे. हेच ते गुरुकुल संशय नाहीं; हें पहा त्याचे कुलवान शिष्यमंडळ, सूर्यमंडळ न्याहाळीत न्याहाळीत वेदमंडलाचा पाठ करीत आहे.... हा ! हा! यांचा योगाभ्यास, व्यास[२१] ऋषीलाहि हव्यासच देईल. पहा -

पद (चाल-तृणपर्णाहि०)

यमनियमासन प्राणायामें प्रत्याहारा कुणि करिती ।
ध्यानधारणा धरूनि समाधि पूर्णत्वाने किति वसती ॥
आसन कुंभक मुद्रा नादा अनुसंधानी बहु तपती ।
हठयोगाची झाली वाटे येथ समाधि शुध्द रिती ॥१॥

पण हा कोण, सरस्वती नदींत स्नान करून इकडेच येत आहे ? ब्राह्मण म्हणावा तर अंगावर यज्ञोपवीत[२२] कसें दिसत नाहीं ? बाबा !

तू कोणं

महाराज ! मी जातीचा अंत्यज आहे.

काय? अंत्यज ! चांडाळ, आम्हां ब्राह्मणाजवळ? अंत्यजाची छाया[२३] ब्राह्मणाला भ्रष्ट करते, हें नाहीं का तुला ठाऊक ?

महाराज ! अंत्यजाची छाया ब्राह्मणाला भ्रष्ट करते, तसेंच ब्राह्मणाचे किरण अत्यंजाला शुध्द करीत नाहींत काय? भ्रष्टाभ्रष्टत्व जातीवर अवलंबून नाही; कृतीवर संभवून आहे.

आताशा ह्या, अतिशूद्राचे स्तोम अतिशयच माजले आहे. अंत्यजा ! महाशय दधीचि मुनीच्या आश्रमांत तू कसां शिरलास ?

गुरुमहाराजांना आतांच वंदन करून आशीर्वाद घेऊन आलों.

काय, दधीचि मुनि सनातन धर्माला मान देत नाहींत कीं काय? तुझा छायास्पर्श त्याना कसा मानवतो? जगांत त्यांस सद्गुरुरत्न म्हणतात.

ब्राह्मणमहाराज ! गुरुवर्यांना आम्ही रत्नापेक्षा श्रेष्ठ परिसाप्रमाणे मानतो. सरस्वती नदींत--

काय ? सरस्वती नदीला स्पर्श[२४] केलास? काय हें ? सनातन धर्माभिनानी नामशेष झाले का ? तू काय सत्यच बोलतोस ना ? (स्वगत) हा गुरुवर्यांना परिसाप्रमाणे मानतो. म्हणजे, परिसाच्या स्पर्शानें लोहाचें सुवर्ण होतें, असाच याचा भावार्थ दिसतो.

विप्रोत्तम ! माझ्या जिव्हेस अमृत येतच नाहीं. सनातन धर्माची तत्वें, दया, परोपकार हींच आहेत. त्यांत स्पर्शास्पर्शाचा[२५] संबंध नाही. ईश्वरभक्ति ही मुख्य आहे.

अंत्यजा ! आम्हां ब्राह्मणांस धर्मशास्त्र शिकवतोस कीं काय? महाशय दधीचि मुनि, वर्णाश्रमधर्माला कसा मान देत नाहींत, हेंच आश्चर्य आहे. आम्हीच ब्राह्मणांनी यांस इतकें वर चढविलें. आमचा आर्य धर्म, वैदिक धर्म, सनातन धर्म आम्हीच बुडवीत आहोंत. कामधेनुप्रमाणे आमची श्रुति या खाटिकांच्या हातांत देत आहो अंत्यजा ! आम्ही ब्राह्मण, परमेश्वराचे मुख आहोंत. धर्माचे मूळ वेद; श्रुति स्मृतीची उत्पत्ति आम्हांपासून आहे.

ब्राह्मणमहाराज ! गुरुवर्याच्या कृपेने आम्हांस थोडेंसे कळतें आहे. विराट स्वरूपाच्या वदनापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, उरुपासून वैश्य आणि चरणापासून शूद्र यांची उत्पत्ति आहे; आम्ही सर्व एकाच शरीराचे अवयव आहोत.

अंत्यजा ! 'सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानः' हे कळत आहे ना तुला ? सर्वांत ब्राह्मण[२६] श्रेष्ठ.

विप्रोत्तम ! शरीरांत शिर प्रधान नव्हे राजाच असें समजा; पण पायांचा स्पर्श हातास, हातांचा स्पर्श मुखास होऊं नये, असे धरून चालेल का? भागीरथीची[२७] उत्पत्ति परमेश्वराच्या चरणापासून असली तरी ती जगद्वयं आहे की नाही? आपल्या ब्राह्मणाच्या दक्षिण पायांत सर्व तीर्थे असतात, तीं अस्पृश्य कशीं होतील? ईश्वराच्या चरणाचेच ध्यान करावे असा आपला शास्त्रार्थ आहे ना?

महाशय दधीचि मुनीला सनातन धर्माचा, वर्णव्यवस्थेचा अभिमान नाहीं, हें पातंजल मुनींना आवडणार नाही?

ब्राह्मणवर्य ! गुरुवर्यांना धर्माप्रमाणे नीतीचाहि अभिमान आहे.

अरे, धर्म आणि नीति यांत अंतर काय समजतोस? धर्मात आणि नीतींत भेदभाव कांहींच नाहीं.

धर्म-नीतीत भेदभाव नाहीं, पण धर्मातच द्वैतभाव आहे, आणि नीति अद्वैत आहे. नीतीचें तत्व[२८] नसल्यास धर्माला महत्व नाहीं, नीतीची महति नसल्यास धर्मकर्माची स्थिति अधोगतीला पात्र होते. परमेश्वरालाहि तत्वरूपानेच जाणले पाहिजे.

अरे, पण नीतीचें तत्व काय म्हणून समजतोस?

ब्राह्मणमहाराज ! आपण सूर्याप्रमाणे ज्ञानी असून अज्ञानतमाची पांघुरणी कशी घेतां ? नीतीचें तत्व म्हणजे 'आत्मवत् सर्व भूतानि' असेंच आहे ना ? आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेकरें आहोत, त्यांत भेदभाव त्यास कसा मानवणार? आपणास दुसऱ्याने केलेले आवडत नाहीं तें आपण दुसऱ्याशीं करूं नये, हेंच धर्मनीतीचें, समाजशास्त्राचें मूलतत्व आहे, असें गुरुमहाराज प्रतिपादन करतांना पुष्कळदां ऐकले आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था प्रत्येकाच्या गुणकर्मप्रिमाणे[२९] विभागली आहे, असें ते स्पष्ट म्हणतात.

अरे, पण वर्णव्यवस्था कोणी विभागली म्हणतोस ? पूर्वजन्मांतील पापपुण्याने प्रत्येकाला जन्म मिळतो कीं नाहीं?

विप्रोत्तम ! पूर्वजन्माचे मर्म सोपें नाहीं. पूर्वजन्मांत आपण मनुष्यच होतों असें ना आपलें मत ?

अरे, असें कसें होईल? हजारों योनि फिरतां फिरतां अवचित मानवजन्माची प्राप्ति होत असते.

ब्राह्मवर्य ! मनुष्यावांचून पापपुण्याचें ज्ञान इतर प्राण्यांस होत असतें का? ज्ञानावाचून झालेल्या कर्मांचें फळ कसें मिळेल ? वृक्ष, लता ह्यादेखील योनीच ना?

(स्वगत) येथें जरा अडचण येते खरी. (प्रकट) अरे, मी तुझ्याशीं वाद घालीत नाही. शास्त्रापेक्षा रूढि[३०] श्रेष्ठ आहे. शास्त्राद्रूढिर्वलीयसि अतिशुद्र अस्पृश्यच मानले पाहिजेत. त्यांनी स्पर्श केलेले पाणीदेखील अस्पृश्यच मानलें पाहिजे.

ब्राह्मणमहाराज ! पाणीच अस्पृश्य का ? आमचे पाणी लागलेले धान्यदेखील वाणी लोकांनी अस्पृश्यच मानलें पाहिजे. सरस्वती नदी आमच्या स्पर्शानें पातकीच होणार का?

अरे, गंगेच्या स्नानाने महापापें नाश पावतात. 'गंगा पापं, शशि तापं, दैन्यं कल्पतरूस्तथा' असा शास्त्रार्थ आहे. आणि सरस्वती गंगेला पातक ?

विप्रोत्तम ! सरस्वतीला पाप नाहीं, तर सरस्वतीच्या भक्तांना-सारस्वतांना - पातक कसें लागतें म्हणतां? 'यथा माता तथा सुतः' असे म्हणतात ना?

तें असो; आम्ही ब्राह्मण, अंत्यजाचे भाषणदेखील श्रवण करीत नसतों.

महाराज ! अंत्यजाचें भाषण श्रवण करीत नसाल, पण अंत्यज ग्रहांचे जप करतां, दानें देतां, वेध पाळतां, हें मात्र रसाळ आहे. आम्ही अंत्यज झालों तरी अनार्य मात्र नाहींत. आर्य धर्माचीच आम्ही उपासना करतो. आर्य देवतांचीच आम्ही पूजा करतों. अपराजिता चामुंडा देवी शिखाबध्दांत[३१] असते. तिचा आम्ही त्याग करीत नाहीं.

(स्वगत) काय ? 'तिष्टदेवी शिखाबध्दे चामुंडे अपरजिते' हे मंत्रवचनदेखील वास कळलें? श्रुतिस्मृति[३२] ह्या गुप्त रीतीनेच ब्राह्मणांनी रक्षिल्या होत्या. त्यांचा विक्रय आम्हीच करीत आहों. सरस्वतीचें पतित्व आम्हीच सोडलें, आम्हीच पतित झालो, या अवनीवर ब्राह्मणांची अवनति होण्याचा समय आम्हीच आणला, (प्रकट) अरे, गुरुमहाराज दधीचि मुनि कोठें आहेत? आतां त्यांकडे या तुझ्या आचरणाबद्दल निराकरण केले पाहिजे. स्पर्शास्पर्शाचे प्रकरण आताच निवारण न झाल्यास पुढें महारण माजण्याचा प्रसंग येईल.

ब्राह्मणमहाराज ! इतके रागावूं नका, आम्हां दीन जनांशीं मारहाण कशाला? आमचें पालन तुम्हीच केलें पाहिजे. आपण ब्राह्मण ज्ञानवान् आहांत, जगाचे आधार आहांत, आमचा उध्दार तुम्हीच केला पाहिजे, आपण धरामर आहां, आम्ही आमरण आपली सेवाच केली पाहिजे.

बरें ते असो. सर्व ऋषींची सभा भरवून याचा आतांच निकाल लावणे इष्ट आहे. नाहीं तर हे भ्रष्ट लोक सर्व सृष्टीला निकृष्टावस्था आणल्यावाचून राहाणार नाहीत. पतंजल मुनीच्या कानांत हा ध्वनि घातला पाहिजे.

विप्रोत्तम ! शांत व्हा, आपण ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण सर्व जगांत श्रेष्ठ आहांत, आम्हां दीन जनांवर[३३] रोष करू नका, आमचा दोष आम्हांस कळतो आहे. आमच्या अस्पर्शास आम्हीच कारण आहोत. आमचे ओंगळ आचरण, अभक्ष्यभक्षण, हेंच आमच्या अस्पर्शास मूळ कारण आहे. आपला न्याय आम्ही मानतो. पण मूळ तत्व सोडून नि:सत्व वादांत आपण हात घालता हे मात्र जगांत घातक वाटते. निर्मळपणा हा धर्माचा मूळ पाया आहे. आयुर्वेदाचे रहस्य यांतच साद्रस्य आहे. धर्माचे साधन सारे शरीर अवधानावर अवलंबून आहे; हें आम्ही सांगण्याचें प्रयोजन नाही?

हो, हे जरा सत्य आहे. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनं'[३४] यांतच तथ्य आहे. निर्मळपणा हाच सर्व धर्माचा पाया आहे. गलिच्छ आचरण हेंच पापाचें कारण.

बरं, महाराज नमस्कार, नाहीं क्षमा; नमस्काराचा अधिकार आम्हांस नाहीं; आम्ही लवूनच सत्कार करणे श्रेयस्कर[३५] आहे; एरवीं नमस्काराचा धात्वर्थ रूचिकारकच आहे; येतों महाराज.

काय हा चमत्कार ! दधीचि मुनीच्या आश्रमांत पक्ष्यांनी गुरूत्वाची कक्षा पुरवली; आणि या अतिशूद्राने त्यावर धर्माची मुद्रा बसवली. आतां ह्या लतावल्लरी[३६] कशी तंद्री लावतात तें पाहावयाचें आहे. हें पहा वेदांतकेसरी वत्स मुनि इकडेसच येत आहेत. वत्स मुनि !

कोत्स मुनी ! इकडेच का आहांत आपण? महाशय, गुरुमहाराज सरस्वतीतीरावर आपली प्रतीक्षा करीत आहेत; आपण कोणत्या कामांत गुंतून उरलां तर इतका वेळ?

वत्स मुनी ! आज आपल्या शान्त आश्रमांत[३७] मला भारीच लाभ झाला, सूर्यनारायण किती वर चढला, हें देखील कळलें नाहीं.

काय, आपणास कसचा लाभ झाला ? आम्ही सारे स्वस्थ सरस्वती नदीत स्नान करीत होतों. आम्हां शिष्यवर्गांत[३८] आपणास कोणीच भेटला असे दिसत नाहीं.

अहो ! आपल्या आश्रमांत सारे गुरुच मला भेटले, मग शिष्यांची काय गरज? येथे पशु, पक्षी,[३९] तरू, लता, नद्या, पर्वत सारे गुरुस्वरूपच आहेत. आपल्या पक्ष्यांनी तर गुरुत्वाची कमालच करून सोडली.

हं, चंद्रप्रभा मैना भेटली का आपणास ? मोठी हुशार बोली; आणि रत्नकांत राघू पाहिला का ? भारी उमदा भाषी.

हो अगदी बरोबर; उभय पक्ष्यांनी माझी चांगलीच ओवाळणी केली. बरं पण, महाशय दधीचि मुनि कोठें आहेत?

कोत्स मुनी ! गुरूमहाराज सरस्वतीच्या वाळवंटावर आहेत.

वत्स मुनी ! पाहिलेस ना ? ही पहा :-

पद (चाल-रजनिनाथ हा०)

बालरवीची[४०] सुंदर कांती । देत मनाला अनुपम शांती ।
दाहि दिशा ह्या उपावियोगे । चिंताग्रस्तहि रम्यचि दिसती ।
किरण रवीचे तिमिरा नाशुनि। शुभं प्रकाशा देती जगतां ॥१॥

---

१. कामं प्रकृतिवैराग्यं सद्यः शमयितु क्षमः । - रघुवंश
२. मनोरथस्याविषयं मनोविषयमात्मनः । - कुमारसंभव
३. गुरुः प्रहर्षः प्रवभूवनात्मनि । - रघुवंश
४. पश्चादुच्चैर्भवति हरिणः स्वांगमायच्छमानः
नष्टाशंका हरिणशिशवो मंदमंदश्चरंति । - शाकुंतल
५. कर्मणा याति विप्रत्वं ब्रह्म ज्ञानाति ब्रह्मण । - मनुस्मृति
६. तटिनि चिराय विचारय । - भाभिनोविलास.
७. शंभु स्वयंभु हरयो हरिणेक्षणानाम् । - भर्तृहरि.
८. सेवालाघवकारिणी कृतधिय : स्थाने श्वधृत्ति विदुः । - मुद्राराक्षस.
९. चंचलंहि मनःकृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । - भगवद्गीता.
१०. गुरुकाव्यानुगां बिभ्रच्चांद्रीमक्षि नभः श्रियम् । - शिशुपालवध.
११. उपकारापकारौहि लक्ष्यं लक्षणमेतयोः। - शिशुपालवध.
१२. न द्वेक्षियज्ञनमतस्त्वमजातशत्रू :। - वेणीसंहार
१३. कर्वति खण्डिताग्रात सूत्रं मृणालदिव राजहंसी । - विक्रमोर्वशीय
१४. ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययं । - भगवद्गीता ५-१
१५. यथा सर्वाणि भूतानि धरा धारयते समम्। - हितोपदेश.
१६. लतेव सन्नध्द मनोज्ञपल्लवा । - रघुवंश
१७. आशीर्वचनरांयुक्तां नित्यं यस्मात् प्रकुर्वते । - सहित्यदर्पण
१८. वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृताधार्यते । - भर्तृहरि.
१९. पुरा कल्पक्षये वृत्ते जातं जलमयं जगत्। - रघुवंश.
२०. मयारहस्यमुदितं तत्संगमाकांक्षया । - अमरूशतक
२१. वेदव्यास सनवदशयो वेदवेदाक्षराणि । - व्यंकटाध्वर्य.
२२. वामांसावलंविना यज्ञोपवीते नोभ्दापमानः । - कादंबरी.
२३. छाया न मूछेति मलोपहतप्रसादे । - शाकुंतल.
२४. गाः कोटिशः स्पर्शयिता घटोघ्री :। - रघुवंश
२५. ब्राह्मण्या शूद्रसंभूतो जातः चांडाळ एवहि ।
सर्वत्र नगराब्दाह्या सर्वधर्मबहिष्कृत ।

तस्य स्पर्शनिमात्रेण सचैलमलस्नानमाचरेत् ।
न गृहित्वा तस्य भिक्षा स्पर्शास्पिर्श न कारयेत् । - सह्याद्रि खंड.

२६. बुध्दिमत्सु नराः श्रेष्ठा नरेशु ब्राह्मणा स्मृताः। - मनुस्मृति.
२७. मला निरस्त्रितां भवश्चरणकन्यका आपगा । - केकावली.
२८. न तु मामभिजानन्ति तत्वेना तच्छवंति ते । - भगवद्गीता ९-२४
२९. चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः । - भगवग्दीता
३०. व्यंगे न रहिता रूढौ सहितातु प्रयोजने । - काव्यप्रकाश
३१. धूमादग्ने : शिखापश्चाहृदयादंशयो रवै :। - रघुवंश
३२. स्मृतिमपि न ते यांति क्षमापाविना यदनुग्रहम् । - राजतरंगिणी
३३. दिनानि दीनोध्दरणोचितद्यस्य । - रघुवंश
३४. कुमारसंभव - कालिदास
३५. प्रतिवन्धातिहि श्रेयः पूज्य पूजाव्यतिक्रम :। - रघुवंश
३६. अनपायिनि संश्रयद्रुमे गज भग्ने पतनाय वल्लरी। - कुमारसंभव
३७. शांतमिदमाश्रमपदं स्फुरतिच बाहुः। - शाकुंतल
३८. शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् । - भगवग्दीता
३९. ननुवज्रिण एव वीर्यमेत द्विजयन्ते द्विपतो यदस्य पक्ष्याः - विक्रमोर्वशीय.
४०. रवैर्मयूख रभिता पितोभृशम्। - ऋतुसंहार.

■■

सर्ग ४

ज्याला आदि न अंत मध्य, भरला, जो निर्विकारी स्वयें ।
माया षड्पुवेष्टिता विलसते, तो खेळवी निश्चये ॥
विश्वात्मा जगता भरोनि उरला नामारूपावेगळा ।
रक्षो तो जगदीश ताप हरूनी सर्वांस जो आगळा ॥१॥

आतां कसें करावें ! या अलंबुवा देवीबरोबर आलें; सारा आर्यावर्त हिंडलें फिरलें, घमेंडीचे बोल बोललें; देवीला चकित केलें, आणि आतां आलें ताळ्यावर, काय तो महात्मा[१] ऋषी ! खरोखर त्याच्या तपस्तेजाने देवेंद्राचे सिंहासन डळमळू लागले म्हणतात ते यथार्थ आहे. काय त्याचे ते डोळे ! इतका वयोवृध्द तापसी, पण कान्ति[२] किती प्रखर ! माझ्यानें तर त्याजवळ, नव्हे, आश्रमाच्या आसपासेदेखील जाववत नाहीं. काय पहा; मी जातें पण पायच मागें सरतात, आतां अलंबुषा देवीला सांगावें तरी काय? देवी चिंतानदींत अगदी बुडूनच आहे. निद्रा नाही, अन्न नाही, मला तरी हे काय माहीत? देवेंद्रांनी जा म्हटले, आले; आम्हां अप्सरांना प्रवासाची तर भारीच हौस..... पण अलंबुषा काय म्हणते, त्या ऋषीच्या आश्रमांत मी आधीं जावे ते कां ? यश लाभलें, तर महेंद्राचे सिंहासन अचल उरलें; रत्नखचित पदक पडलें अलंबुषेच्या गळ्यांत. आणि ऋषीच्या शापाग्नीत भस्म झाली तर मेली बिचारी वैजयंती.....नाहीं. मी तशी कमी बुध्दीची[३] नाहीं, आणि माझे कर्तव्य तरी काय?

पद (चाल-तृपममता रामा०)

देवीला साह्य करावें। बुध्दीला सांगत जावे ॥ हे खरें
देवेंद्र सांगती मजला । नच सोडि कधा देवीला ॥ हे बरें
युक्तीने जग जिंकावें । देहाला नच दुखवावें ॥ हें खरें
कासया, जाउं मी तया, स्थानिं विनिमया,
व्यर्थ चालावें, जीविता पाणि सोडावें ॥१॥

आणि पहा, ते ऋषी साधारण मनुष्याप्रमाणे नाहींत.

पद (चाल सदर)

लोहाचे पिष्ट करोनी । भक्षिति का निज हस्तांनी ॥ बघ कसे

अग्नीची कुडे करिती । सुखशांत त्यामध्ये बसती ॥ तर कसे
पायाला वरती करिती । भूमीस मस्तका धरिती ॥ वर तसे
ज्याप्रती नाही तनुप्रिती, श्वास कोंडिती,
निश्चला स्वमनी. कालही जयां बहु मानी ॥२॥

ते ऋषी म्हणजे लोहभस्म भक्षून लोहस्तंभ झालेले, त्यावर आम्हां अप्सरांचे कांटे कसे रूततील?.... आतां युक्ति तरी कसली योजावी ? अलंबुषादेवीची सारी भिस्त त्या मदनावर, पण तो अधोवदन; त्या ऋषीचें दर्शनच घेण्यास धजत नाही. अनंगाला[४] आणि अंगनांला श्रृति[५] आणि भिती या पाठीपुढें ओढणे घेतच असतात...ही पहा अलंबुषा, तापसीप्रमाणे फिरत फिरत इकडेसच येत आहे. तिला सांगावे तरी काय? तिला भिववूनहि उपयोगाचे नाही. धीर सो स्त्रंबीर.....देवी ! इतक्यातच कशाला ग आलीस? मी नाहीं का सांगितले, स्वस्थ सरस्वती नदींत सुखशांत जलबिहार करीत रहा म्हणून.

वैजयंती ! शाबास, सोबतीण असावी तर अशीच असावी. महेंद्रानी सांगितलेंच होते; वैजयंती बरोबर असली म्हणजे पंचाइतीची गोष्टच नको म्हणून. बरं, सांग आधी, ते ऋषि तुला काय म्हणाले ?

देवी ! काय ग लावलीस त्या ऋषीची मिजास ? त्या ऋषीपेक्षां कृषीवलांस मी भारीच मान देतें.

वैजयंती ! मान नको देऊं, आम्हांला अपमान होऊन मान स्त्रालीं घालण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून म्हणतें;तू त्या ऋषींना भेटून काय बोललीस ते सांग, ते ऋषी तुझ्याशी कसे वागले, काय बोलले, हें मला कळले पाहिजे.

देवी ! बोलणे, नटणे, हसणे, स्त्रेळणे, मुरडणे ही कोणाशी ?

साकी

पशुसम ऋषी ते कोठें आम्ही राजविलासी बाला ।
रूप गुण यौवन सम नसतां काय करावा चाळा ।
तारा[६] चंद्राला । रूचति न अन्या देवाला ॥१॥

वैजयंती ! हेंच का तुझें. येऊन जाऊन बार्हस्पत्यच ऐकावे ? त्या ऋषीपाशीं जाऊन त्याच्याशीं विचारपूस करून येण्यास तुला नाहीं का सांगितले ? त्या

ऋषीचे राहणे, विहरणे कसे काय असतें. हें लक्षांत घेण्यास तू लक्षणवान् आहेस, तुझे लक्ष लक्षांत भारी आहे; अग, अशा व्यवहारांत कोणासहि मध्यस्थाची गरज असतेच.

(स्वगत) मी ऋषीपाशी जावे, आणि शापाग्नीत भस्म होऊन यावे, आपला जीव म्हणजे सदाशिव. (प्रकट) देवी ! काय ग बोलतेस ? स्त्रियांच्या प्राप्तीत पुरूषांनी मध्यस्थी केली पाहिजे, आणि या मध्यस्थींत व्यवस्थित स्त्रियाच पाहिजेत; तरूण तरूणीच्या[७] मध्यस्थीत वृध्दा नारी पतिव्रतांचा भारीच सुळसुळाट असतो; आम्हां स्त्रियांना ग काय वृध्द पुरुष मध्यस्थीला आणावे लागतात? आमचे मध्यस्थ आम्हांकडेसच असतात.

ते ग कोण ? वैजयंती ! मी मात्र जन्मांत मध्यस्थ मध्यस्थीच्या फंदांत पडले नाही.

हेंच ते, मी तरी काय म्हणते ? तू जात्या एकाच देवरायाशी रममाण झालीस; त्यात मध्यस्थीचा बाणा तो कसा कळणार, आणि अनुभवाचा शहाणपणा तो कसला येणार ? मोठ्या राजधानींत असलें तरी खेड्यापाड्यांतसुद्धा पर्यटन केलेंच पाहिजे. बहुत वेष, अनेक देश पाहिल्यावाचून चातुर्याचा लेश मिळत नसतो. देवी ! अशन, शयन वसन[८] यात नेहमी फेरबदल झालाच पाहिजे असे अश्विनोदेव सांगतात की नाही?

वैजयंती ! तूं तशी अनुभवी शहाणी आहेस खरी, तर सांग पाहूं, आतां त्या ऋषीशीं कसें वागावें ?

देवी ! देवादिकांविषयी माझा अनुभव[९] कसा आहे हे तुला नाहीं का ठाऊक ?

साकी

भदिय रूपयौवना[१०] पाहुनी तल्लिन त्या देवांनी ।
सविनय विनंती करिता त्यांना न बघावें ढुंकोनो ॥
चित्ती प्रेम जरी असले। वरती दाखवी न सगळे ॥१॥

वैजयंती ! आहे ग मला ठाऊक. पण स्वर्गाविरचे सारे विचार येथे व्यवहारांत आणतां येत नाहींत; म्हणून म्हणते. तू त्या ऋषींच्या आश्रमात जा, आणि ते ऋषि कोठें असतात,कसे बसतात, त्यांचे खाणे, रहाणे, विहरणे कसे असते, हे सारे आधीं लक्षात घेऊन ये. उगीच इकडेतिकडे भटकूं नकोस.

देवी ! मी काय इकडेतिकडे उगीच हिंडतें फिरतें म्हणतेस? माझ्या सहज फिरण्यात सहस्र कामे होत असतात! काल पहा, मी त्या ऋषीच्या आश्रमांत सहज सहल करण्यास गेले, तेथे काय सांगू --

पद (चाल-नंदनवन देवी०)

अमरावतिहुनि[११] रम्य सुखाचे स्थान मला गमलें ।
फलपुष्पांही युक्त सदोदित वृक्ष दिसति भरले।
सुवासगंधोदकस्नानातें करिति सुखे लतिका ।
गुंजारव[१२] भ्रमरांचे पाहुनि तल्लिन त्या कलिका ॥१॥

देवी ! काय सांगूं--

पद (चाल-सदर)

चंदनतरूच्या[१३] सन्निध होतें किंचित छायेला ।
एक भुजंगम डोलत आला लागे कायेला ।
नाजुक नृत्या करूनी सांगे भीति नसे मजला ।
गळां पडे मम वदना लागे चुंबन घ्यायाला ॥१॥

वैजयंती ! खरेंच, तें आश्रमस्थान निर्वैर आणि ते ऋषिहि निर्विकार असे मी तर्कानेच सिध्द केलें होतें.

खरीच तूं तर्कानें; चित्रें काढणारी देवी ! तर तुला त्या ऋषीचें चित्र कसें काढवत नाहीं.

बरें तर, मी रेखतें त्यांचें चित्र---

पद (चाल - सिंहासनि बैसेल०)

दुकुलवस्त्र परिधान करोनी मुकुटा[१४] घालिती शिरी ।
वलये शोभति दोनी करी । रत्नाचे ते हार अमोलिक शोभति ।
कंठावरी। कुंडले[१५] कर्णीं बहु साजिरी ॥ रम्य मंदिरे उच्च
गोपुरीं पुष्पित शय्यांवरी । दासी चंदनलेपा करी ॥१॥

शाबास बाई वैजयंती! ऋषींना राजांचें रूप दिलेंस थट्टा करण्याचीच ही वेळ.

देवी ! ते ऋषि कसे असतात, कोठें बसतात, हे जर तुला तर्कानें समजत नाही, तर मी म्हणतें तें खोटें कसे म्हणतेस ?

वैजयंती ! तसें नाहीं, त्या ऋषींचा आहारविहार कसा काय असतो हें तर्कानें कसें कळणार ?

देवी ! त्या ऋषींचा आहारव्यवहार कसा असतो हें पुसणे म्हणजे तुझ्या शहाणपणाचा टिळकच पुसणे आहे. अग, तुझ्या मते --

पद (चाल-अलख जटा०)

नवनितसम मृदुलदेह असति का मुनी ?।
पक्वान्ने सेविति कीं वसति वाहनी ॥
करिती का दुग्धपान । ऐकति का मधुर गान ॥
रात्रंदिन धरिति ध्यान। विषयसेवनी ? ॥१॥

नाहीं ग, वैजयंती ! मी तितकी भोळी नाही.

देवी ! तूं भोळी नाहींस, मला मात्र खुळी समजतेस. त्या ऋषींचें तेज किती असेल, हें काय त्यांची नाडी पाहून सिध्द केले पाहिजे? आर्य लोक सूर्याचे वजन काय तराजूंत घालून करतात?

वैजयंती, तूं काय बोलतेस तें तुलाच ठाऊक, अग आर्य लोकांनी सूर्याचें वजन कसे केले? सूर्य कोठें, आर्यावर्त कोठें ?

देवी ! खरोखर, सूर्यमंडळ पृथ्वीपेक्षां तेरा लक्ष पटीने मोठें आहे म्हणून बृहस्पति वेदसूक्त म्हणून आपल्या शिष्यांना सांगतांना मी ऐकले आहे हे पहा वेदसूक्त :-

''षटसूर्य श्रवसा महां असि सत्रा देव महां असि '' - ऋग्वेद

काय, वैजयंतीला सारा ऋग्वेद तोंडपाठ । एक खरें, स्वर्गस्थ देवांपेक्षा आर्य लोक मोठे चाणाक्ष आहेत. चरित्रावरून चित्र [१५] काढण्याची कला त्यास अवगत असते, हे विचित्रच म्हणतात.

देवी ! क्षीरसागरांत लक्ष्मीदेवी आदिनारायणाचे पाय कसे चुरते हे तर मला येथेंच चित्रें पाहून समजलें. हे आर्य लोक कसे ग क्षीरसागरांत गेले ? आपले

ब्रह्मदेव, तेहतीस कोटी देवांसहित, क्षीरसिंधूच्या आदल्या तीरावरच बसून गा-हाणी घालतात आणि नाभि, नाभि हे शब्द ऐकूनच परत येतात म्हणून सांगतात. देवी! यांनी त्यांचा वर्ण तरी ग कसा शोभवला, लक्ष्मी गोरटी आणि भगवान् निळा !

वैजयंती ! अग ती कविकल्पना[१७] असेल.

छे ग, देवी ! क्षीरसागराचें क्षेत्रफळदेखील आर्य लोकांनी मोजून ठेवलें आहें; म्हणून क्षीरसागर बरोबर दोन लक्ष कोश[१८] आहे.

खरं तर बाई, आश्चर्य करण्यासारखेंच आर्य लोकांचें ज्ञान भारीच तर.

देवी ! लक्षावधि कोशांवर राहणारे ग्रह यांचें भय बाळगतात; यांना नकळत त्यांना कोणत्याच राशीशी संगम करतां येत नाही. देवी ! ऐकतेस ना, या आर्य लोकांनी प्रत्येक ग्रह किती उंचआहे हें देखील दोरीसूत लावून तंतोतंत मोजलें आहे. म्हणजे पृथ्वीपासून सूर्यमंडळ तीन कोटी चार लक्ष कोश[१] आणि चंद्रमा शहात्तर हजार कोश उंच आहे, असें शास्त्रशुध्द रीतीने सिध्द केलें आहे.

वैजयंतीला किती तरी माहिती ! खगोल भूगोल तर अगदी हातांत, अधिक स्तुतीला व्याजस्तुति म्हणतात.

देवी ! खरंच सांगतें, आर्य लोकांचें शास्त्रज्ञान पाहून चतुरानन ब्रह्मदेव चार तोंडांत आठ बोटे घालतो म्हणतात.

होय ग, वैजयंती ! आर्य लोकांचे पराक्रम पाहून अमरगणाचा भ्रम भारीच श्रम पावतो असेंहि म्हणतात.

होय तर देवी ! आर्य लोकांचे अस्त्रज्ञान[१९] किती ग आश्चर्याचें !

श्लोक-कामदा

बाण सोडुनी मेघ पाडिती । फोडिती गिरी सिंधु[२०] शोषिती ।
स्वर्गदिवता आणि ती क्षिती। अग्नि निर्मिती सूर्य प्रकटिती ॥१॥

वैजयंती ! खरंच तर,यमधर्माचे भयंकर रोग आर्य लोकांचे भारीच भय बाळगतात. सोन्यामोत्यांचे भस्म लावून महानमहान व्यांधींचे भस्मच करतात म्हणून देव विस्मय पावतात.

देवी ! इतकेंच नाहीं, हे आर्य लोक --

साकी

पंचवदन करि भस्म मदन परि जीवविती रति कांता ।
वृध्दा देती तारूण्यचि कीं होई चकित विधाता ॥
संतति[२१] मनसोक्ता । निर्मिती आश्चर्याचि चित्ता ॥१॥

बरं, पण वैजयंती । आम्ही काय, आर्य लोकांचें वर्णनच करण्यास इकडे आलों आहों, त्या ऋषीच्या तपस्तेजाने स्वर्गावर आकांतच मांडला आहे. आणि तूं म्हणतेस सुखशांत विश्रांति घ्यावी म्हणून.

देवी ! मी एक विचारते, त्या ऋषींनी येथे होमहवनें केलीं म्हणून त्याचा धूम्र काय स्वर्गावर जाऊन देवांचे डोळे कसकसतात? देवेंद्राला यांची कसली ग चिंता? हे ऋषि स्वर्गावर जाऊन इंद्रपदावर बसणार आणि आम्ही अप्सरा का त्याच्या दाढ्यांना वश होणार?

वैजयंती ! स्वर्गलोक आम्हां अप्सरांकरतांच का केला आहे?

छे ! देवी, भारीच कोंवळी आहेस. अग, आम्हां अप्सरांचे वदन पाहाण्याकरतांच लोक देवांचे वंदन करतात. एरवी त्यांचे दर्शनिच कोणी मनांत आणणार नव्हते.

बरं तर बाई; स्वर्गाधिपति यांचे उगीच भय बाळगतो तर.

देवी ! मला खरचं सांग, देवेंद्राला स्वर्गांत कसचें ग सुख ? आणि पहा.

पद (चाल-उरला भेद न ज्या)

चित्ता सौख्य जरी नाहीं । तरि तो व्यर्थ स्वर्ग पाहीं ॥
कोणी दैत्य मत्त झाला । शंभुने वर कोणा दिधला ।
तप करि ब्राह्मण भूमिवरी। ऊर्वशी ! चिंता दूर करीं ॥
ऐशा अमृतपानाहुनिजल शतपट सुखकारी । चिंतावास न जरि शरिरीं ॥१॥

वैजयंतीची महति वैराग्यवृत्तीहूनहि वरती आहे. त्या ऋषींच्या तपमोजाचा ताप, स्वर्गात कांपरेंच भरवितो आणि---

हे ग देवी ! देवेंद्राची भीति या ऋषींच्या कृतींत रतिमात्र नाहीं. आणि खरें सांगू, त्या ऋषींना स्वर्गाचे सिंहासन घे घे म्हणून दिलें तरी नको नको म्हणून पाताळांत पळून जातील. स्वर्ग स्वर्ग म्हणतात तितकेंच बरें हे त्यांना पूर्ण माहीत आहे. स्वर्गसुखांत कालसर्पाचे[२२] विष भरलें आहे, हे ते जाणतात.

मग, वैजयंती ! महेंद्राची चिंता व्यर्थच तर ?

देवी ! खरें सांगू?

पद (चाल - नाही सुभद्रा या वार्तेते०)

वडवाग्नीची भगिनी लक्ष्मी तापदायि चित्ता ।
जन्मतांच तिस सागर देई सहचरणी चिंता ॥
सुखकर आरोग्याची मुद्रा निद्रा ती पळवी ।
प्राणवियोगा, महान रोगां जनशरिरीं भरवी ॥१॥

अशीच ती लक्ष्मी, राजलक्ष्मी, स्वर्गलक्ष्मी वाढतां वाढतां, चिंता ! अतिचिंता, महाचिंता वाढतच असते. देवी ! लक्ष्मीचा उपभोग आणि चिंतेचा महारोग, यांचा वियोगच होत नसतो. हें खरें कीं नाही?

पुरे ग, वैजयंती ! लक्ष्मी ही आमची बहीणच कीं नाहीं ?

देवी ! बहीण आणि विहीण झाली म्हणून काय झालें? गुणाला आणि वर्णाला[१] काय शत्रुत्व आणि मित्रत्व असतें ?

मग, वैजयंती ! देवेंद्राला या ऋषींचा उगीच संशय तर ?

देवी ! सर्व ज्ञानांत अनुभवज्ञान हें भारी श्रेष्ठ आहे, हें महानुभाव[२३] मुनि मान्य करतात; तर सांगतें.

साकी

धन[२४] ज्या गांठी असतें त्याला साधुहि तस्कर वाटे ।
सहज बोलतां फसविल ऐशी शंका तन्मनि दाटे ॥
खेळवि वित्ताचा । करितो भ्रंश सुचित्ताचा ॥१॥

वैजयंतीचें वाग्जाल संपणार तरी कधीं ?देवेंद्राला आतां सांगावें तरी काय? शचीदेवीला तोंड कसें दाखवावे ? या भूमंडळावर येतांना तिने दिलेला फुलांचा हार, अपयशाची हार घेऊन परत कसा दाखवावा?

देवी ! शचीदेव तुझ्याशी मोठ्या प्रेमाने वागतात तर ! इंद्रायणीची वाखाणणी याचकरतां करतात. आपल्या प्राणपतीच्या प्रीतिपात्राशी अप्रीति म्हणून तिला अगदीं नाही; सवतीशीं प्रीति हीच स्त्रियांची उन्नति, नीतीची खरी प्रगतिहि यांतच वसती आहे असें म्हणतात.

वैजयंती ! फारच जीभ लांब केलीस. आपल्या भाषेचा अर्थ मी व्यर्थ समजत नाही. शचीदेवीने माझा मत्सर[२५] करावयाला मी तिचे राज्य हरण केलें नाहीं?

होय ग देवी ! तूं तिचे राज्य हरण केलें नाहींस. पण देवेंद्राने मला जर अर्ध्या दृष्टीने पाहिले तर मात्र सर्व सृष्टि भस्म करण्यासारखी कोपवृष्टि करशील.

पुरे ग, वैजयंती; आम्ही आलों कोणत्या कार्यास आणि तूं करतेस भाषेचा विपर्यास. आतां कसे करावे? देवेंद्राने, वैजयंती बुध्दिमती म्हणून बृहस्पतीला विनंति करून माझ्या संगतीस दिली. पण खंतीची जागृति तीच अधिक करते आहे.

देवी ! सांग बरे, तुझ्याच मताप्रमाणे वागतें तर आतां.

तर मग, वैजयंती ! त्या ऋषीच्या आश्रमांत जाण्याचा विचार आम्हीं केला होता ना?

छे ग, देवी; ऋषीच्या आश्रमांत जाण्याचे श्रम निरर्थक आणि पहा-

साकी

पुरुषासन्निध जातां सहजीं मानहीन[२६] ती युवती ।
स्वयेंच लक्ष्मी प्राप्तअसे तरि कुणि नच तिजला गणिती ॥
लाभचि कष्टाचा । देतो सौख्य स्पष्ट वाचा ॥१॥

असेच खरें, पण वैजयंती !.....

देवी ! काय ग तूं फिरून फिरून पणच पण म्हणतेस, देवेंद्राशी तूं कांही तरी पण लावून आलीस असें दिसतें.

तसें नाहीं ग, वैजयंती ! तुझ्या भाषणांत खरेपणा आहे, पण-

हेंच तें, देवी ! पण लावून कन्यार्पण करण्याचा मूर्खपणा मनुष्यगणावांचून कोणीहि करणार नाही.

वैजयंती ! कोठें ग धावलीस ? पण लावून कोणी ग कन्यार्पण केले?

देवी ! खरेंच; एका राजानेअसा पण केला म्हणून सांगतात की, एक कसलेंसें वेताचें धनुष्य मोडलें तर त्यास कन्यारत्नाचे[२७] दान करावे, मग तो देव असो की दानव असो, नर असो वा वानर असो....

शाबास, वैजयंतीला साऱ्या गोष्टी कशा कळतात हेंच आश्चर्य आहे ! भूमंडळात आलीस कधीं आणि सारें ऐकलेंस तरी कधीं? तर सांगूं ? ते धनुष्य साधारण असणार नाहीं. आपल्या त्या भार्गवरामाच्या शिवधनुष्यास त्याचे तीनशे गण लागले तरी ओढण्यास होत नाही असे सांगतात, आणि ते धनुष्य मोडणारा असाधारणच पुरुष असला पाहिजे.

असाधारण पुरुष ? देवी ! तें धनुष्य तो पण लावणाऱ्या कन्येने एका बोटावर खेळवले हे लक्षांत ठेव.

होय ग वैजयंती ! पण ती कन्या दहा लक्षांत भारी आहे, हेहि लक्षांत घेतले पाहिजे.

देवी ! हें खरें असेल एखादें; पण मला सांग, नवऱ्याची सारी भिस्त का त्याच्या शक्तीवरच ? मग, कुलशील, गोत्रपत्र हीं सारीं व्यर्थच तर ! मोठमोठे वृक्ष मोडणारे वानर हे काम सहजच करणार होते, आणि सोन्यासारख्या नवरीस खांद्यावर घेऊन ह्या पर्वतावरून त्या पर्वतावर उड्या मारणार होते; मृत्युलोकच्या लग्नाच्या रीति ऐकल्या म्हणजे मनाची स्थिती भारीच खंती पावते आहे.

तें धनुष्य वानर मोडणार होतें ना? वैजयंती ! दाही दिशा कोपविणाऱ्या दैत्येशाची कशी दुर्दशा उडाली, हें मात्रतुला कळलें नसेल. पण तें असो, वैजयंतीने सांगावयाचा युक्तिवाद,[२८] पण ती करते वितंडवाद आतां आम्हांस कांही बुध्दिवाद[२९] सांगणाऱ्या स्त्रिया कोठें मिळतील? स्त्रियांच्या कार्यात स्त्रियांवाचून कोणीच दाद घेणार नाही.

देवी ! स्त्रियाच पाहिजेत का तुझ्या कार्यास? ह्या पहा, मैना, कोकिळा, साळुंकी या स्त्रियाच की नाहींत ? यांच्या युक्तीनेच आम्ही पुरुषांची मति वक्रगति करून टाकूं.

हं, हं, समजलें; वैजयंतीची भाषापध्दति आशादातीच आहे. गायनकलेने मैना, कोकिळा[३०] जगाला शोकी बनवतात, हे खरेंच.

देवी ! गायनकला अबलांस प्रबला करते.

खरेंच ग, वैजयंती ! पण, त्या ऋषीना गायनाचा नाद असेल ना ?

शाबास, देवी ! तूं आपलें स्वर्गावरचे शहाणपण, येथें कोणत्यातरी पणांत हरवलें असें दिसतें. तर पहा-

साकी

गीत[३१] सुभाषित युवतीलीला[३२] वश नच मनुजा करिती ।
मूर्खांचि किंवा पशुसम त्यांची सुज्ञांमाजी गणती ॥
गायनवादन ते। संगित[३३] जगता रंगविते ॥१॥

काय बाई! वैजयंती च्या भांडारांत, शब्दरत्ने किती असतील, हें बृहस्पतीलाहि माहीत नसेल ! हं, बरें सुचलें, तूं मघाशी काय म्हणालीस? आमचे मध्यस्थ आम्हांकडेसच असतात, म्हणजेते ग कोण?

देवी ! कसची ग तुला मध्यस्थीचीच महति? सध्याची परिस्थिती मतींत घेऊन मनाचा एकदां धीर सुटला म्हणजे बुद्धिहि बधिर होते असें म्हणतात.

वैजयंती ! संशयाची निवृत्ति झाल्यावाचून मतीची गति चालू होत नसते; संदिग्ध शब्द बुध्दीला बध्द करतात. आम्हांकडे मध्यस्थ असतात हे शब्द चमत्कारिक दिसतात. पण ते मध्यस्थ व्यक्त की गुप्त ?

साकी

पुरुषमना आकर्षक मन्मथज्योति[३४] कामिनीनयनीं[३५]।
हास्यरतीचा पाश नराच्या हृदया घे ओढोनी ॥
रोमरोम नखरे । स्त्रियांचे मध्यस्थचि सारे ॥१॥

शाबास ! वैजयंती ! मोठीच तुझी मतीची महति. हेच ना मध्यस्थ? देवी, पहा तर आणखी -

साकी

कुरळ केश निज वेणिफणीचे दंश पुरुषनेत्राला ।
होतां विव्हळ गात्रगलित तो सोडि न प्रितिपात्राला ॥
कुंकुम चंद्रचि तो । नरमनसागर खवळवितो ॥१॥

बरं बाई वैजयंती . इतके चातुर्य, चतुर्मुख ब्रह्मदेवाकडे असेल असें दिसत नाही. मानवांची बुध्दिशक्ति देवदानवांच्याहि मतीवर सक्ति करीत असते.

देवी ! अंगनांचा देहसंग झाल्यावर पुरुषांचा बुध्दिभंग सहजच अनंग करितो, हे अभंग वाक्य आहे.

वैजयंती! तूं म्हणतेस तसे सारेच पुरुष असतात असे नाही; श्रेष्ठ पुरुषांना स्त्रीसौंदर्याची मर्यादाच असत नाही.

देवी ! पुरुषांना आपल्या मर्यादेत आणण्यास स्त्रियांना सौंदर्याचीच गरज लागते असे नाही. आणि स्पष्ट सांगते, श्रेष्ठ म्हणविणाऱ्या पुरुषांस मतिभ्रष्ट करण्यास, स्त्रियांना थोडेच कष्ट पडतात. पहा,

साकी

मृदुल सुरंजित रंगित वसनें परिधानित ललनांचा ।
व्यसनों[३६] पाडिति विषयि जनांना चित्रगती गमनाची ॥
हारहि पुष्पांचे । करिती बध्द नरा साचे ॥१॥

शाबास, धन्य वैजयंती ! तुझ्याइतकी स्फूर्ति महान् कवींच्या मतीलाहि अतिशयच होईल खरे पुरुष स्त्रियांची नावेंच घेत नसतात.

काय, देवी ! स्त्रियांची नावे पुरूष घेत नसतात ? तर खचित सांगतें, अभिनव स्त्रियांची नावेंच ऐकलीं म्हणजे महानुभाव पुरुष आपल्या नांवलौकिकास विसरतात असाच जगाचा अनुभव आहे. आणि पहा, कमलिनी, कुमुदिनी हीं नावे ऐकलीं म्हणजे, पुरुषांचें मन भ्रमराप्रमाणे रूंजी घालीत असतें; आणि गुलाब मालती यासारख्री नावे कानांत गेलीं म्हणजे, त्याचा मधु वास कसा घेण्यास मिळेल म्हणून ते पुरुष रात्रंदिवस वसवसत असतात.

पण वैजयंती, साधारण पुरुषांची करणी आदरणीय होत नाही.

देवी! साधारण पुरुषांची करणी ?तर मी साधार सांगते,एका नवरमणीची गुणकीर्तिएका पक्ष्याच्या तोंडून ऐकतांच पुण्यश्लोक म्हणविणारे नरवराग्रणी धरणीवर लोळणी घेऊं लागले, असे सांगतात. आणि काय सांगू देवी ! नवयुवतीच्या अंगावरची भूषणे पुरुषांच्या लक्षांत गेलीं म्हणजे वक्ष:स्थळ[३७] भेदून टाकतात, आणि त्यांना लोकांनी दिलेलीं दूषणेदेखील दिसत नसतात.

वैजयंती ! तुझें इतकें वाक्पांडित्य पाहून वाग्देवी सरस्वती मान खालीच घालील.

देवी ! खरें सांगू आपल्या सरस्वतीला जर मी मान देतें तर केवळ ती अविवाहिता म्हणून....

वैजयंती ! अविवाहीत म्हणजे मयूरावर बसणारी म्हणूनच का सरस्वती मानवती ?

काय, देवी ! अविवाहिता म्हणजे विवाह तापाचे संताप त्यागलेली. वाहनावर का भानाची कमान असते?

वैजयंती ! फिरून फिरून विवाहावरच का तुझा वाग्विहार? मनुष्य आणि पशु यांत अंतर काय ते विवाहानेंच आलें आहे.

देवी ! विवाहावर माझा वाग्विहार नाहीं, वाक्कुठार आहे. खरोखर जनाचें भय न धरतां मनापासून सांगतें. विवाह म्हटला की माझ्या देहाचा[३८] दाह[३९] होत असतो. पशुपक्ष्यांना विवाह नाहीं, पण गाईशीं घोडा, हत्तिणीशी लांडगा किंवा कोकिळेशी बगळा यांचा अंगसंग होत नसतो. नाहीं तर पहा आपले विवाहशास्त्रज्ञ देव मानवस्त्रियांशी, मानव राक्षसस्त्रियांशी लग्नमग्न होत असतात.

वैजयंती ! आधारांवांचून बोलणे शहाणपणाला बाधा करतें; देव कोठें ग मानवकन्याशी लग्ने लावतात? देवांचा मान तो काय आणि मानवकन्या त्या काय !

देवी ! तूं देवेंद्राच्या अंत:पुरांतच असतां, जगांतील गोष्टी ऐकशील तर मन भारीच कष्टी होईल. देव मानवकन्याशी लग्ने लावीत नाहींत; मागण्या करतात, विनवण्या करतात, याचनेची[४०] यातना पत्करतात आणि ओवाळण्या करून घेतात.

वैजयंतीस सर्व श्रुत म्हणतात; नाही बाई अशा गोष्टी माझ्या लक्षांत पण, देवांनी कोणाला ग मागण्या घातल्या ? स्वर्गांगनांपेक्षा[४१] मानवकन्या भारीच रूपवान् तर ! कोण ग ती ?

देवी ! महा रूपवती दमयंती[४२]-

वैजयंती ! असू दे ग, देवाची कृति अपकीर्तीकारक कधींच असणार नाहीं.

देवी ! देवांच्या दुष्कृतीनें त्यांची दुष्कीर्ति तर झालीच, पण आम्हां अप्सरांच्या रूपकीर्तीची नालस्ती करण्यास, त्यानी कविजनांस स्फूर्ति दिली.

वैजयंतीच्या बोलण्याची संगति म्हणून लागतच नाहीं. अप्सरांची कीर्ति, त्रिलोकास भरती; काय ग, कवीच्या स्फूर्तीने तुझी ख्याति कमी केली?

देवी ! समुद्रोभ्दवा सात कोटी अप्सरांपेक्षा त्या रूपवती दमयंतीचे पारडे जड झाले, आणि ब्रह्मदेवाला, तिला निर्माण करण्यास नवीनच मनोमय मूस[४३] ओतावी लागली,असे ते निःशंक म्हणतात.

अग, वैजयंती ! कवि[४४] हे निरंकुश असतात. त्यांस दोष देतां येत नाहीं.

देवी ! आपल्या देवांची कृति जर नीतिमंत असती तर त्या निरंकुश कवींस त्रिशंकूसारखे लोबंत ठेवणार होते. पण काय करणार? राजांचे पाप, प्रजेला शाप घेण्यास लावतें, हे खरें. माझ्या बोलण्याकडे देवी लक्षच देत नाहीं.

वैजयंती च्या शब्दांच्या कोटीपुढे, माझे लक्ष आणि हजार काय चुंडे लावणार? जगांत विवाह होऊच नयेत. हें मत भारी चुकीचें आहे.

देवी ! माझ्या बोलण्याचा अर्थ तू व्यर्थच घालवतेस. जगांत विवाह व्हावे खरे, पण ते शास्त्रशुध्द असावे; बोलणे एक आणि करणे दुसरें; येथे महापातकाचें धरणें असतें. देवी ! तूं पहा, विवाह म्हणजे काय? लग्नमंत्रांचा अर्थ वधूवरांस जर कळत नाही तर हा अनर्थ म्हटल्यास भाषण व्यर्थ कसे होईल? लग्न म्हणजे मनाचे संलग्न पण नवरानवरीच्या नयनांस जर त्या लग्नापूर्वी दर्शनच होत नाहीं, तर काय अंतर्ज्ञानानेच मनाचें मीलन होत असतें?

वैजयंती ! आर्य लोकांत विविध प्रकारचे विवाह असतात, त्यांत गांधर्वविवाह श्रेष्ठ मानतात.

देवी ! हेंच ते, गांधर्वविवाह म्हणजे ग काय ? गंधर्व हे आमचे बंधूच की नाहीत? प्रीतिविवाहास पुरुषांनी गांधर्वविवाह हे नांव ठेवले आहे, इतकेंच; एरवी त्या विवाहास अप्सरसविवाह हेंच नांव खरें शोभते. देवी! आधी काय म्हणालीस? माझें मत चुकीचें? तर सांगते, चुकलेल्या मतांतूनच खरें मत पुढें निघतें हा सिध्दांत आहे. माझा सारा कटाक्ष त्या ब्राह्मविवाहावर आहे.

वैजयंती ! ब्राह्मविवाहांत काय ग तुला अनन्वित दिसतें? उगीच पुरुष जातीवर अनीतीचा आरोप करतेस.

देवी ! पुरुष जातीवर मी वृथा आरोप करीत नाही; तूंच पहा, हे पुरुष नवरदेव होऊन अग्निदेवतेसन्निध[४५] शपथ वाहतात. ''धर्मेंच, अर्थेंच, कामेच नातिचरामि'' खरें की नाहीं ? आणि लगेच होतात ''रात्रिंचरामि''. या पातकाला चांद्रायणी प्रायश्चित्त निश्चित कमी होईल की नाही? आणि तो अग्निदेव, त्याच्या देहाची

लाहीलाही कशी ग नाहीं करीत? भोळ्या बापड्या अज्ञान कुमारींचा विश्वासघात, यासारखे अघःपात करणारे महापातक दुसरे असणारच नाही, हें मी पुनः पुनः म्हणणारच.

वैजयंती ! पुरुषांविरूध्द स्त्रियांनी कधीच बोलू नये. सुज्ञ पुरुष पापभीरु, देवभीरू असतात.

देवी ! पुरुष पापभीरू ? अग, त्या पुरुषांची गुप्त कृत्ये चित्रगुप्तालाहि गुप्तच असतात.

वैजयंती ! पुरुष पातकी आणि स्त्रिया पुण्यवान्, हा स्त्रीजातीचा पक्षपात नीतीचा घातक मानतात.

देवी ! मी इतकी घातकी नाही. स्त्रियांच्या पातकास यमाचा कुंभपाक पुरुषांनीच भोगला पाहिजे; पुरुष जर शुध्द[४६] आचरण करतील तर स्त्रियांचे चरण कधींच पापमार्गी होणार नाहीत. शुध्द शास्त्रज्ञ असेंच म्हणतात '' स्त्रि पाप भ्रतारस्य....'' स्त्रियांना बिघडवितात ते पुरुषच.

बरें तर वैजयंती; स्त्रियांची पक्षपाती, स्त्रियांनी कितीहि दुष्कृत्यें केली तर पाप म्हणून नाहींच; सदाशुध्दा गंगा की भागीरथी, असेंच ना तुझें मत ?

देवी ? मीच असे म्हणतेअसे नाही. आपले ब्रह्मनिष्ठ वसिष्ठ मुनि,गंभीर ध्वनीने सागंतात, ''स्त्रियः रजसः शुध्दः नदी ओघेन शुध्दते'' रजोदर्शन झालें म्हणजे स्त्रियांचे वर्तन[४७] कसेंहि असल्यास पापाचें परिमार्जन होतच असतें.

बरें तर, वैजयंती, तू देवांचीदेखील भीति धरीत नाहीस; पण तुझ्या भाषेची रीति बृहस्पतीलाहि नापसंतच होईल; सत्यं वद यापुढे प्रियं वद हेंच शास्त्रकारांचे हृद्गत आहे. धर्मनीतीची बंधने सर्वांस सुखाची साधने आहेत.

काय, देवी ! धर्मशास्त्राची बंधने केवळ कनिष्ठास ! श्रेष्ठाचा[४८] अनिष्ट प्रकार कोणीच उच्चारीत नाहींत. अनीतिनदीचा ओघ महालक्ष्मी पर्वतावरून खाली येत असतो. असें उगीच नाहीं म्हणत. विवाहाचीं बंधने मनुष्यांस, वर्ण, वश्य, तारा यांचा पसारा मनुष्यांकरतां सागराच्या[४९] कन्येचे गोत्र आणि पर्वताच्या आत्मजेचे जन्मपत्र कोठे ग महानमहान देवांनी पाहिलें होतें? आतां पुढे पहा, देव की मानव, अस्वलाच्या पोरीशी आणि नागिणीच्या पिल्याशी लग्ने लावणार आणि जगांत धन्य होणार !

बरं बाई, वैजयंतीला विवाहाची पध्दति नापसंतच आहे तर ! पण वैजयंती ! विवाहाला दिव्य संस्कार म्हणतात. आणि लग्न हे धार्मिक बंधन असून त्याचा स्तुत्य हेतु प्रजोत्पादन हा आहे.

बरें देवी ! विवाह हा दिव्य संस्कार, विवाहावांचून संसार चालावयाचा नाही; आणि स्तुत्य हेतु काय प्रजोत्पादन ना? लग्नाच्या पध्दति सोडल्यास प्रजेची उत्पत्ति होणारच नाही. देवी! प्रतिज्ञापूर्वक सांगते, विवाहाची बंधने, स्त्रीशिक्षणाची साधने प्राप्त झाल्यावर तटातट तुटून जातील, आणि ही आपली लग्नाची गज्जगाठं स्त्रीस्वातंत्र्याची घांट ऐकतांच वाट मिळेल तिकडे फेटाळून जाईल. सरस्वतीच्या दर्शनाने स्वातंत्र्य-प्रभंजन सुटला म्हणजे, विवाहाचा हेतु प्रजोत्पादन[४] हे व्यर्थ होऊन लग्न म्हणजे केवळ विलासी[५०] जीवन हेंच मत प्रादूर्भूत होईल.

वैजयंतीची भाषापध्दति बृहस्पतीला तरी समजेल का?

देवी ! माझ्या शुध्द भाषेंत कधींच दोष असणार नाही. तूंच पहा, स्वतंत्र सरस्वतीची उपासना करून पतितंत्र गर्तेंत पतन पावणे हें त्या उपास्य देवतेचा उपहास करण्याचे महापातक पदरी बांधण्यासारखे आहे की नाही? लग्न म्हणजे अज्ञानाचें प्रदर्शन हें त्या ज्ञानसरिता सरस्वतीस कसें मान्य होईल?

वैजयंतीच्या शब्दलालित्याचा रंग, विचाराचे तरंग, हे पाहिले म्हणजे अनंगराज स्वरोस्वरच दंग होऊन जाईल.अग, विवाहावांचून जगाचा नैतिक निर्वाह होणार कसा ? सुव्यवस्थित संसार-व्यवहाराला विवाहपध्दति जगांत घाललीच पाहिजे.

काय,देवी ! विवाहावाचून निर्वाह होणार नाही कोणाचा? त्या आप्पलपोट्या ब्राह्मणांचा, अंग, त्या ब्राह्मणांनी दक्षणा[५१] उपटण्याकरतां ह्या साऱ्या धर्माच्या उठावण्या केल्या आहेत ! आणखी काहीच नाही.

वैजयंती ! ब्राह्मणांवरहि उपसलीस का तरवार ? आतां तर बृहस्पतीच्या घरांत तुला थारा मिळणे कठीण. वेदश्रुत म्हणतेस आणि वेदमूर्ति ब्राह्मणांची निंदा करतेस! श्रुतीत ब्राह्मणांची स्तुतीच[५२] भरली आहे, असे म्हणतात, हे मात्र तुला ठाऊक नसेल.

देवी ! श्रूतीची माहिती मला नाही म्हणणाऱ्यांस मंदमतीच म्हणतात. ही पहा श्रूतीची स्तुति:-

''ब्रह्मविज्ञानमित्याह तस्मात् ब्राह्मणो मुख्यो मुख्यो भवति'' (यजुर्वेद अ. ५.)

काय बाई, वैजयंतीला साऱ्या श्रुति तोंडपाठ, पण बोलताना मात्रआडवाट धरीत असते. ब्राह्मण[५२] हे साऱ्या जगांत श्रेष्ठ आहेत. वेदमंत्रांच्या योगाने स्वर्गस्थ देवता त्यांच्या स्वाधीन असतात.

देवी ! आहे तर तुला ठाऊक ! ब्राह्मणांच्या स्तुतीचा धडा तूं पाठ केलास, पण ब्राह्मण कोणास म्हणावे याचा मात्र उलगडा तुला साधला नाही.

''देवाधीन जगत्सर्व, मंत्राधीनंच[५३] देवता ।
स मंत्रा ब्राह्मणाधीना, ब्राह्मणो मम देवता ॥''

ह्या मंत्रावरूनच ब्राह्मणाचें तंत्र श्रेष्ठ होत नाहीं.

वैजयंती ! ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व निसर्गतत्त्वानेच सिध्द केले आहे. पहा -

साकी

वेदाभ्यासी ब्राह्मण समजे देवचि या भूवरती ।
निज तपतेजे सर्व जगाचें पाप भस्म ते करिती ॥
पदरज विप्रांचे । करिती भुक्त जनां साचे ॥१॥

देवी ! ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व कोणी ग नाकबूल केले? पण ब्राह्मणत्व कशानें येते हे मात्र तत्व[५४] शोधण्यास बरेच विद्वत्व पाहिजे, आनुवंशिक सत्व येथे उपयोगाचे नाही. काय! आनुवंशिक सत्त्व उपयोगी नाही?

काय? आनुवंशिक सत्व उपयोगी नाही? सिंहाच्या पोटी कोल्हा, आणि हंसापासून कावळा यांची उत्पत्ति होणारच तर! आनुवंशिक रोगाची देखील उत्पत्ति लावतात, तर वंशवृक्षाची[५५] फलनिष्पत्ति निष्फळच होणार ? बरे असूं दे ग, उगीच वादविस्तार करतेस.

देवी ! मी उगीच वादविस्तार करीत नाही. माझा वादविहार त्या विवाहव्यवहारावर ठरलेला आहे. विवाहाची दु:स्थिति सुधारल्यावाचून आर्यलोकांची प्रगति कधीच होणार नाही, हें तत्व महत्वाचे आहे.

वैजयंती ! थोडेच बोलणे, लोकांत डुलणे, असेच असले पाहिजे. आतां तूं म्हणतेस तसा काल येणार असे भविष्यकारांचे मत आहे. विवाह म्हणजे खुशीचा व्यवहार, अन्नसंबंधाला बंधन नाही, धर्मकर्माचा मार्ग स्वर्गाविर, हा प्रकार कलियुगात चालणार म्हणून थोरथोर ऋषि भिऊन आहेत. कलियुगामुळे होईल धर्माचे वाटोळें.

काय, कलियुगामुळे धर्माचे वाटोळे होणार म्हणून ऋषि भ्याले आहेत म्हणतेस? तर खरें सांगू, कलियुग[५६] नव्हे, सुवर्णयुग, ज्ञानयोग येणार म्हणून ते ऋषी भ्याले आहेत, आणि त्यांनी केलेली गुप्त कपटकृत्ये उघड होणार, त्याची त्या ब्राह्मणांस भारीच भीति वाटत असते. हे खोटे नाही पत्रतंत्राने मंत्र म्हणून लोकांस अपवित्र मानणारे ब्राह्मण, श्रूतिस्मृतीचे गाठोडे' आपल्याकडे बांधून ठेवतात आणि सर्व लोकांत आपणास श्रेष्ठ मानतात, हा उलगडा होण्याचा काळ, कलियुगांतच येणार मोठे कपटी, आपमतलबी !

वैजयंती ! काय, श्रूतिस्मृति करणारे ब्राह्मण सर्व लोकांच्या वंदनास पात्र असून त्यांची तू निंदा करतेस? सर्व जगाच्या कल्याणार्थ धर्म रचणारे ते ब्राह्मण.

देवी! जगरक्षणार्थ धर्म रचतात ना ते ब्राह्मण ? अग, त्या ब्राह्मणांनी धर्मशास्त्रांत किती ग घोटाळा माजवला ! भावाभावांतदेखील भेदभाव करतांना त्यांना खेद कसा ग नाही वाटला? एका बापाची लेकरे, त्यांतदेखील पंक्तिप्रपंच ! खरे की नाही?

वैजयंती ! वर्णव्यवस्थेचा धर्म यांत सूक्ष्म मर्म असते. हें ब्राह्मणाचे कर्म उत्तमच मानतात. धर्मशास्त्रे लोकांच्या हिताकरतां रचलेली आहेत.

देवी ! एकच सांग, एका आईच्या उदरांतील मुले, त्यातदेखील यांनी भेदभाव कसा ग ठेवला? मुलीने खाल्ल्यास मार आणि मुलाने चोरल्यास आदरसत्कार हा कोणत्या ग धर्माचा आचारविचार ? खरेंच सांगते, स्त्रीस्वातंत्र्याचा प्रसार झाल्यावाचून जगाचा उध्दार कधीच होणार नाही खास.

वैजयंतीचे विचार, स्त्रीस्वातंत्र्याचा प्रसार आणि जगाचा उध्दार, या तीनहि विकारांचा संचार, स्वर्गात आणि आर्यावर्तात कधीच होणार नाही. स्वतंत्रता आणि स्वैर[५७] वर्तन यात भारीच अंतर असते. आर्य स्त्रियांचे श्रेष्ठत्व मान, मर्यादा,विनयशीलता[५८], नम्रता यांतच विद्यमान असणार.

देवी ! असाच दुराचार, अनीतीचा प्रकार चालणार म्हणतेस तर नकोच मला तो स्वर्ग आणि आर्यावर्त. मी स्वस्थ ग्रहमंडळात जाऊन राहतें. पूर्ण स्वातंत्र्याचे सुखसोहाळे खेळावे ते ग्रहमंडळात. नवग्रह आणि बारा राशी यांची विलास वाटणी त्यांनी सुखसार करून ठेवली आहे एक राशी जर एका ग्राहाची उच्च राणी तर तीच दुसऱ्याची स्वक्षेत्राग्रणी; प्रत्येक ग्राहाची अर्ध, दृष्टि, पाव दृष्टी प्रत्येक राशीवर असतेच, सप्तम स्थानावर म्हणजे जायास्थानावर सर्वांची पूर्ण दृष्टी.

वैजयंती ! चाललीस ना ग्रहमंडळावर? अग, ग्रह म्हणजे महाभयंकर, महान् महान् देव त्यांचे भय बाळगतात. महादेव शंकर, म्हणतात, एका ग्रहाच्या भयाने माथ्यावर शिळा घेऊन गंगेत लवून बसला. ग्रह म्हणजे मनुष्य नव्हेत.

देवी ! ग्रह म्हणजे अगदी मनुष्याप्रमाणे वर्तनाचे. पहा, मनुष्याप्रमाणेच त्यांच्यांत शत्रूत्व-मित्रत्व असतें. चातुर्वर्ण्यव्यवस्था तर आहेच, मात्र स्पर्शास्पर्शाचा पंक्तिप्रपंच नाही, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अत्यंजदेखील एकाच वेळी एकाच राशीशी सुखशांत विलासभोग घेत असतात.

वैजयंती ! ग्रहांत आणखी शत्रूत्व-मित्रत्व असते? मग मनुष्यच ते!

देवी ! ग्रहगणांत शत्रूत्व तर भारीच असतें. पितापुत्र तर भारीच हाडवैरी, ब्राह्मण-ब्राह्मणांत नैसर्गिक द्वेषभाव, आणि काय सांगू, त्या प्रत्येक ग्रहाची, काय म्हणतात. महादशा आणि अंतर्दशा असते, त्या वेळी त्याच्या भरारीस करारीच नसते.

वैजयंतीला इतकी माहिती कधी ग मिळाली? अग, पण, शत्रूत्व आणि मित्रत्व म्हणतात ते कसे? आणि त्याचा परिणाम काय?

देवी ! काय सांगू, त्यांच्या शत्रूत्व-मित्रत्वाचा परिणाम लोकांना भोवत असतो. पण राशीजवळ ते अगदी प्रेमळ ! हा गुण भारीच वाखाणण्यासारखा ! आणि त्या राशीदेवता किती ग हुशार ! एकाच वेळी आठ ग्रहांसदेखील सुखोपभोग[५९] देण्यास अगदी तयार !

वैजयंती ! राशीशी प्रेमळपणा हा गुण तर भारीच वाखाणण्यासारखा ना?

देवी ! या अप्रतिम गुणानेच ते ग्रह हजारों कोशांवर गगनांत राहून भूमंडळावरचे राज्य चालवतात. पहा, एक होतो राजा[६०] दुसरा म्हणवतो प्रधान, एक मेघाधिपति तर एक रसाधिपति. प्रत्येक मनुष्याचें जनन, मरण, सुख, दुःख यांच्या हातांत! हानि, कीर्ति, यश, लाभ देखील यांच्या दृष्टीने ! हे ग्रह एका व्यक्तिला कधी सुखाच्या पर्वतावर नेऊन बसवतील तर कधी दुःखाच्या समुद्रांत लोटून देतील, असा यांचा प्रभाव आहे. या ग्रहांना,आर्य लोकांनी आर्यावर्ताचे राज्य कधीं ग अर्पण केलें, कोण जाणे.

वैजयंती ! पृथ्वीवरच्या लोकांवरहि यांचा प्रभाव असतो ना ?

देवी ! काय सांगू, आर्यावर्ताचे देशविभागदेखील त्यांनी स्वेच्छेप्रमाणे करून घेतले आहेत.

बरं तर बाई, वैजयंती ! मनुष्याचे जननमरणदेखील त्यांच्या हातांत?

देवी ! अगदी खरे, त्या ग्रहांची प्रत्येक दिवशी नियमित पंचतत्वे असतात, आणि त्याच्या वायुतत्वात जनन आणि आकाशतत्वांत निधन असे नियमबंधन आहे. आणि पहा, हे आर्य लोक किती ग भेकड, त्या ग्रहांस, नव्हे अत्यंज ग्रहांसदेखील, पूज्य मानतात, त्यांचा जप करतात, त्यास दाने देतात, आणि काय सांगू, राहुकेतूचे आणि सूर्यचंद्राचे ग्रहण[५१] झाल्यास हे आर्य लोक उपोषण करतात.

वैजयंती ! भीतीच्या जागी नमस्कृति केलीच पाहिजे.

देवी ! भीतीच म्हणून नाही, हा आर्य लोकांचा मनाचा दुबळेपणा पहा, तारा म्हणजे वृध्दा नारी पतिव्रता आणि चंद्रमा तर क्षयरोगी निर्बल, पण हे आर्य लोक आपल्या विवाहकार्यात, यांचे बल शोधतात; ''ताराबलं चंद्रबलं तदेव''

वैजयंती ! इतकें ग्रहलाघव तूं कोठे ग शिकलीस? वृध्द पराशर ऋषि भेटले वाटते आपणास ? सत्यवतीची सवत वैजयंती, असें नाही ना लोक म्हणणार ? पण ते असो; तू आर्य लोकांना भेकड, दुर्बल कशी ग म्हणतेस ? आतांच ना, त्यांचें तू वर्णन[५२] केलेंस कीं, आर्य लोकांचे भय स्वर्गस्थ देव भारीच बाळगतात, त्यानी देवेंद्रास पुष्कळदां सहाय्य केले आहे, महान् देवांची पर्वा न करणारा वृषपर्वा याचा गर्वापहार एका आर्य राजानेच केला; इतकेच नाही तर त्याच्या वीरपत्नीने शुक्रा चार्याच्या शक्तीवरहि सक्ति केली, असे सांगतात आतां इतके खरे की, आर्य लोकांना अनार्य ग्रहांचें ग्रहण लागते.

देवी ! मी ते खोटे कोठे म्हणते ? गुण[५३] दोष[५४] वर्णन हे सहजासहजी होतच असतें. आर्य लोकांप्रमाणे आर्यांगना बुध्दिमत्तेत भारीच प्रवीण असतात.

वैजयंती ! आर्य स्त्रियांचा पातिव्रत्यप्रभाव कळला आहे ना तुला? एका आर्य कन्येने यमराजाच्या दाढेतून आपल्या पतीस ओढून काढले इतकेच नाही तर त्या धर्मराजाकडून, पौत्रमाथां छत्र देखो, अशा प्रकारचे वर[५५] मागून घेतले; आणखी काय सांगू ? एका आर्य साध्वीच्या भयाने सूर्यदेखील उगवेनासा झाला. आर्य स्त्रियांच्या शापाचे भय देव -दानवांस भारी असते.

देवी ! मोठी बाई पतिव्रता ती आपल्या पतीस खाद्यांवर घेऊन, त्याच्या प्रीतिपात्र वेश्येच्या घरी जाणारी; अशिक्षिता अशाच पतिव्रता असतात. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झालें म्हणजे मात्र हे पतिव्रत्याचे लक्षण[५६] क्षणमात्र राहणार नाही. पुराणिक सांगतात आणि अज्ञानी बाया ऐकतात.

वैजयंती ! असेच ना आमचे कीर्तन चालावयाचे? मलाहि पण, नको नको म्हणते तरी, उत्तरांवर प्रत्युत्तरें द्यावी लागतात.

देवी ! असूं तर त्या असंगत गोष्टी, तुझ्याच मताप्रमाणे वागणे माझे कर्तव्य आहे. सांग तर मग.....

वैजयंती ! आतां त्या ऋषीपाशी जाण्याचा कार्यक्रम कसा ठरवावा ?

देवी ! फिरून फिरून ऋषीपाशी जाण्याचाचविचार काय करतेस ? ऋषीपाशी जाण्यास का कार्यक्रम पाहिजे ?स्त्रियांचा पराक्रम असा असावा की, पुरुषांनी धर्मकर्म सोडून आमच्यामागे धावत यावे.

वैजयंती ! अगदी साधेच केले तर अद्याप ऋषीचे डोळेच पाहिले नसतील.

काय देवी ! ऋषींचे डोळे काळे तांबडे, मला पाहून पांढरेच होतील.

बरे तर, वैजयंती ! स्त्रियांनी थोडेंच बोलावे, पण ते असो तूं आधीं गायनाचा अनुभव घ्यावा असे म्हणत होतीस ना ?

देवी ! पुन: पुन: तू एकच बोलतेस आणि मला म्हणतेस, वाद घेणारी स्त्रियांनी थोडे बोलावे, अधिक रडावे, आणि कधी मरावे ? पुरुष आणि स्त्रिया यांत भेद[५७] वेददेखील धरीत नाहीत. सोमरस पिण्यास, सूर्यदेवतेआधी, पृथ्वीदेवी[५८], उषादेवी[५९] यांस आमंत्रणे करतात ते वेद जगद्वंद्य.

काय बाई, वैजयंतीचा जेथेतेथे वेद; आपल्या श्रुतींनी माझी मति बंद झाली, धृतीची गति बंद पडली; आणि काळजाची भीति वरती चढली; कार्याची स्मृतिदेखील नष्ट झाली.

देवी! तूच करतेस वादाची उकरणी, आणि मला म्हणतेस वाद करणी[७०] पुराणाचा भरणा अधिक झाला आणि पुरुषाचा मान वरती चढला. स्त्रियांचा कमीपणा वाढला म्हणून माझ्या देहाचा इंगळा होत असतो; स्त्रियांना अज्ञान अबला म्हणणाऱ्यांचा गळाच दाबला पाहिजे. तू आणखी काय म्हणतेस, गायनाचा का अनुभव घेतला पाहिजे?महानुभाव म्हणविणारे तपोनिधि, गायनवादनाने बुध्दिहीन होतात. अग, गायनाचा जलसा आणि जलविहार यांची जोडी सजली म्हणजे ऋषीच्या खोडी कोठे ग उरतील? आणि पहा, आपला तो यमन राग[७१] आळवला म्हणजे,ऋषीचे मन पुढे गमनच करणार नाही, हा ठाम सिध्दांत.

वैजयंती ! तिकडे कसला ग गलबलासा ?

देवी ! ते पहा ऋषीकुमार सरस्वती नदीत स्नान करण्यास जात आहेत.

वैजयंती ! तर आम्ही जरा दूरच होऊं

देवी ! इतकी भितेस का ? तो शिष्यवर्ग आम्हांस पाहून पळत सुटेल, तर आम्ही त्या वरच्या शिलेवर बसून जरा गमत पाहूं हें पहा ।

पद (चाल- तृणपर्णाहि)

सरस्वतीच्या निर्मल जीवनीं अधमर्षण हे किति करिती ।
पोहति कैसे मत्स्यासम हे, कच्छप तैसे जालिं बुडति ॥
देह जलांतरीं माना वरती अहंपूर्विका कुणि करिती।
बध्दासन घालुनी जलावरि ध्यान कराया किति बसती ॥१॥

वैजयंती ! पाहिलेस ना इकडे सरस्वतीच्या जलांत ?

पद (चाल-सदर)

निर्मल नभिंचा तारांगण[७२] तो स्वच्छ जलांतरि किति दिसतो ।
विश्वविरामा विमल चंद्रमा सरस्वतीजल शोभवितो ॥
शुक्रगुरुसह लोहितांग हा मंगल जल मंगल करितो ।
मंद पवन हा लहरी देउनि शांत मनाला सुखवीतो ॥१॥

---

१. द्विपन्ति मंदाश्चरितं महान्मनः - कुमारसंभव.
२. कान्तिरेवातिविस्तीर्णा दीप्तिरित्याभिधीयते - ऋतुसहार.
३. शास्त्रेष्वकुंठिता बुध्दि : - रघुवंश
४. तनुतां दुःखमनंग मोक्ष्यति । - कुमारसंभव
५. ज्ञानाभिष्टांगमाद्येस्तु संपूर्ण स्पृहता धृतिः - ऋतुसंहार
६. सश्रेणीषु तारासु कुमुद्वत्सुच वारिशु । - रघुवंश
७. न्यावा चमूवरी त्वां रथ तरूणीप्रति जसा स्मरे तरूणा - मोरोपंत विराटपूर्व

८. नीत्वानील सलिलवसनं मुक्त रोधा नितम्बम् । - मेघदूत.
९. अनुभवं वचसा सखि लुम्पसि । - नैषधचरित्र.
१०. निवेशयत्ने प्रमदा सयौवना । - ऋतुसंहार
११. ससंभ्रमेन्द्र दुतपाति तर्गला। निमीलिताक्षिवभियाममरावति। - काव्यप्रकाश
१२. लताकुंजे गुंजन्मधुव्रत मडली मुखर शिखरे लीना। - गीतगोविंद.
१३. मणिप्रकारा सरसंच चंदनं । शुचौ प्रिये यांति जनस्य सेव्यताम्। - ऋतुसंहार
१४. मुकुटरत्न मरीचिभिरस्पृशन्। - रघुवंश.
१५. कुंडलीकुल कुंडलेन पातालम्। - रसगंगाधर.
१६. चित्रस्थानपि रोदयंति शतधा कुर्वंति भित्तीरपि । - काव्यप्रकाश.
१७. इदं कविभ्यः पूर्वेभ्यो नमो वाकं प्रशास्महे। - उत्तररामचरित्र
१८. लक्षार्ध योजनं पेतः विग्रहं कामरूपिणः। - भागवत.
१९. अस्त्रज्वालावलीढ प्रतिबलजलधेरंतरौर्वायमाणे । - वेणीसंहार
२०. तस्याः सिन्धोः पृथुमपि तनुं दूरभावात् प्रवाहम्। - मेघदूत.
२१. संतति शुध्दवंश्याहि परत्रेहच शर्मणे । - रघुवंश
तेनोज्झति कोपितोऽसौ । वदा न तोथेन विषणि नागः। - शिशुपालवध.
२२. उत्कर्षहेतवस्तेस्युरचल स्थितयोगुणाः। - काव्यप्रकाश
२३. अनुभाव विशेषान्तु सेनापरिवृताविव । - रघुवंश
२४. गुरोरपीदं धनमाहिताग्नेः । - रघुवंश
२५. त्वयि मत्सरादिव निरस्तदयाःसुतरांक्षिणोति स्रलु नां मदनः - शिशुपालवध
२६. मानोन्नतेनाप्यभिवंद्य सुर्धा - रघुवंश
२७. कन्यारत्नमयोनिजन्म भवतामास्ते । - महावीरचरित्र.
२८. असाक्षिक हते चिन्हैर्युक्तिमिश्चागमेनच । - याज्ञवल्क्यस्मृति.
२९. मूढः परप्रत्ययनेयबुध्दि। - रघुवंश
३०. पुंस्कोकिलोयन्मधुरंच कुंजम् । - कुमारसंभव
३१. यत्सत्यं विरतेऽपि गीतसमये गच्छामि शृण्वन्निव। - मृच्छकटिक.
३२. प्राणेश्वरानुकृतिमाकलयंति लीलाम्। - शिशुपालवध.
३३. साहित्य संगीतकलाविहीनः साक्षात्पशु :पुच्छविषाणहीन :। - भर्तृहरि.
३४. प्रायश्चापं नवहतिमयान्मन्मथः षट्पदज्यम् । - मेघदूत.
३५. केषां नैषा कथय कविता कामिनी कातुकाय । - मेघदूत.
३६. तेजोद्वयस्य युगपद् व्यसनोदयाभ्याम् । - शाकुंतल.

३७. रघुर्भृशं वक्षसि ते न ताडितः । - रघुवंश
३८. देहमात्रात्मवादो दूषितो वेदितव्या । - शरीरभाष्यः
३९. .....क्तिमिव कृष्ण वत्मनि । - रघुवंश
४०. वध्यतामभयथानांजलिः। - रघुवंश
४१. स्वर्गस्त्रीकुचकुंभसंभ्रमपरा रंभः कथं दुर्लभः। - मेघदूत
४२. सुंदर सकल वधूने कशि नलसतिच होय दमयंती। - रघुनाथपंडित
४३. ब्रह्मा कशींच करिता मृदु हे न होती ।
या कारणास्तव मनोमय मूस ओती - रघुनाथपंडित
४४. इदं कविभ्यः पूर्वेभ्यो नमो वाकं प्रशास्महे । - उत्तररामचरित्र.
४५. सख्यं कृत्वाऽग्निसाक्षिकम्। - रामायण अयोध्याकांड
४६. सतैराकनयामास शुध्दांत शुध्दकर्मभि । - कुमारसंभव
४७. स्मरसिच तदुपान्तेप्वावयोर्वर्तनानि । - उत्तररामचरित्र
४८. स खलु श्रेष्ठि च त्वरे प्रतिवसति। - मृच्छकटिक.
४९. सरसामस्मि सागरः । - भगवद्गीता.
५०. हरिरिह मुग्धवधूनिकरे विलासिनी विलसति केलि पुरे । - गीतगोविंद
५१. प्राप्यते दक्षणा विप्रा त्यज्यते यजमानकं । - वृध्द चाणक्य.
५२. ॐ आब्रह्मन ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायन्ता मास्मिन् राष्ट्रे:। - ऋग्वेद.
५३. भोगीव मंत्रोषधिरूध्द वीर्य :। - रघुवंश
५४. संन्यासस्य महाबाहो तत्वमिच्छामि वेदित्तुम। - भगवद्गीता
५५. सांद्रीकृता स्पंदनवंशचक्रेः। - रघुवंश
५६. करि सुनिर्मली परम उग्र दावानली। - केकावली.
५७. अव्याहतैः स्वैरगेतः स तस्याः । - रघुवंश
५८. गुणैश्च तैस्तैर्विनयप्रधानः - रघुवंश
५९. सुखं शेते मातस्तव खलु कृपातः पुनरयं। - गंगालहरी.
६०. तथैव सोऽभूदन्वर्था राजा प्रकृतिरंजनात् । - रघुवंश.
६१. शशिदिवाकरयोर्ग्रहपीडनम् । - हितोपदेश
६२. शोभेव मंदर क्षुब्ध क्षुभितांभोधिवर्णना । - शिशुपालवध.
६३. गणयति गुणग्रामं भ्रामं भ्रमादपि नेह ते । - गीतगोविंद
६४. दोषापि नूनमहिमांशुरसौ किलेति । - शिशुपालवध
६५. अध्यमिर्थ्य पतिर्वाचमाद्दे वदतां वरः। - रघुवंश

६६. अव्याक्षेपो भविष्यं त्याः कार्यसिध्देर्हि लक्ष्मण्। - रघुवंश
६७. तामगौरवभेदेन मुनीश्चापटधदीश्वर - कुमारसंभव.
६८. दिवा पृथिव्या : उपसा सूर्यण च सोमं पिवंतम्। - ऋ.मं. ८-३५
६९. व्रीडावनम्रवदनाभुषणि स्मरामि। - काव्यप्रकाश
७०. अवाच्यवादीश्च पहुत्वदिष्यंति तवाहिता।। - भगवद्गीता
७१. चित्तं मुनेरपि हरंति निवृत्तरागम्। - ऋतुसंहार
७२. अधिक विकस दंतर्विस्मयस्मे तारैः। - मालतीमाधव.

■■

सर्ग ५ वा

आर्या (गीति)

वर्णिति वेद जयाला अंत न लागे अनंत ज्या वदती ।
कीर्ती[१] लिहितां सरल्या सरस्वतीच्या अनंत नव दवती ॥१॥
वत्स ! सुर्याराधना-पाठ तयार झाला ना?

गुरुमहाराज , झाला साधारण, पहा-

''अग्नो प्रास्ता ऽऽ हुतिः....
आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजा :॥ मैत्रायणोपनिषद् ६-३७

पुरे, वत्सा ! अर्थ आला का लक्षांत ? अर्थाविचून पाठांतर व्यर्थ
गुरुमहाराज, अर्थ असा दिसतो :-

साकी

अग्नीमध्ये हवन करी तेंआदित्याप्रति पावे ।
तद्रस पर्जन्याच्या द्वारे भूमी वरि ओलावे ॥
मेघचि अन्नाचा । दाता जगता या साचा ॥१॥

वत्स ! यथार्थ भाषांतर केले म्हणजे अध्ययनाचे सार्थक होत असते.
गुरुमहाराज ! भाषांतर बोलू का ?
जरा थांब; कौडिण्य ! ब्रह्मदर्शन झाले ना ?
हो झाले, साधारण झाले, गुरुमहाराज पहा -

''अग्निहोत्रं जुव्हानो लोभजालं भिन्नति'' मैत्रायणी उपनिषद् ६-३८
बरस्स, सान्वय अर्थ सांग पाहू कौडिण्य! लाजू नकोस.
गुरुमहाराज ! अग्नि यस्य होत्रं, हा षष्ठि तत्पुरुष समास,

कौडिण्य ! उपनिषदास व्याकरणाची आकारणी नको आहे, व्याकरण म्हणजे स्वतंत्र भाषेचे मरणच आहे पदांचा स्पष्ट अर्थ लावला म्हणजे गोड पदार्थाप्रिमाणे रूचि देत असतो.

गुरुमहाराज ! अग्निहोत्रि, जुव्हाल्याने, या प्रकारेकरून, लोभजाले,त्या काळाचे ठायीं भिन्नति म्हणजे भिन्नरूपी होत असतात.

कौडिण्य ! अशा भाषेने अर्थसादृश्य कसे होईल ?

गुरुमहाराज ! तर याचा अर्थ जुळणारच नाही.

कौडिण्य ! असे कसे होईल? वाणी[२] आणि अर्थ, अर्धनारीनटेश्वराप्रमाणे एकजीवच असली पाहिजेत. वत्सा, सांग पाहू याचा अर्थ

पहा गुरुमहाराज.

साकी

अग्निहोत्रि जन लोभजाल तें टाकितसे तोडोनी ।
संमोहाला छेदुनि पाडी क्रोधा दूर करोनी ॥
षड्रिपु जो नाशी । अग्निपूजक अविनाशी ॥१॥

शाबास, बाळांनो ! अग्नि आणि सूर्य हे तेज:स्वरूपी आहेत; सर्व देवतांत, सर्व भूतांत[३], सर्व तत्वांत सूर्यदेवता ही श्रेष्ठ आहे. ग्रहमंडळात सूर्य हा राजा आहे. आणि पहा -

दिंडी

रवीमध्ये स्थिर चंद्र सदा राहे । शशीमाजी अग्नि हा सत्व पाहे ॥
सत्यस्वरूपी परमेश विश्वकर्ता । अणूरेणूहुनि बोलती विधाता ॥१॥

गुरुमहाराज ! हे कशावरून ?

वत्स ! मैत्रायणी उपनिषदांत-

'' अह्नहि सौर सोमाग्नि सात्विकानि''

असे वर्णन केले आहे ते नाही का लक्षात ?

हो, हो, गुरुमहाराज ! ग्रहमंडळात सूर्य हा क्षत्रिय म्हणजे राजा असें म्हणतात ना? आणि पहा, ज्योतिषशास्त्रांत रवि हा पितृस्थान आहे.

हो, वत्सा ! हे पहा -

साकी

याया लोकां सौख्य भूपती कर घेई त्यांकडुनी ।
सर्व जगाला जीवन याया रवि घे जल[४] शोषोनी ॥
रवि हा नेत्राचे विश्वाचा । आत्मा चराचरा साचा ॥१॥

गुरुमहाराज ! सूर्यनारायणाच्या किरणांत जप केला म्हणजे महान व्याधींचा नाश होतो असे म्हणतात ना?

वत्स ! काय अध्ययनाचा अर्थच नाही का लक्षात घेत?

'' सुर्याभिमुख जप्त्वा महा व्याधिभयान् प्रमुच्यते'' - अथर्वशीर्ष.

हो, हो, गुरुमहाराज ! तसे आहे खरें,

वत्सा ! यमाचे दूत रोग, यमाच्या जनकाला कसे भिणार नाहीत?

हा आला कौडिण्य, पुराणकेसरी.

हो, बाबा, चुकलो; न्यायशास्त्री आणि वेदांती वैदिक आणि पुराणिक यांचा लंगडा झगडा सदोदितच चालू असतो.

बाळानो ! उगीच वाद घेऊ नका, स्वस्थ ऐका. सर्व भूतमात्रांचा अन्न हा प्राण आहे, अन्न प्रथमोत्पन्न आहे, अन्न हे औषध आहे. ''ज्येष्ठमन्नं भिषक्स्मृतम्'' असे उपनिषदाचे मत आहे. अन्नाची उत्पत्ति मेघापासून आहे. ''अन्न पर्जन्यसंभव:'' आणि मेघाचा[५] जनक सूर्य आहे.''आदित्यात् आपोजायन्ते'' असें अथर्वशीर्षात स्पष्ट सांगितले आहे.

गुरुमहाराज ! सूर्योपासना श्रेष्ठच तर.

हो, वत्स ! ऐकलेस ना -

''सूर्यं तपत्या वरणाय दृष्टे: कल्पेत लोकस्य कथं तमिस्रा ''

ऋग्वेद मं. १३.

आणि सांगतो, आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक शास्त्र सिध्दांतास, सूर्योपासनेसारखे अन्य साधन संमत नाही. हे सर्व आत्मज्ञानानेंच जाणले पाहिजे.

गुरुमहाराज, आत्मज्ञान म्हणजे काय?

वत्स ! आत्मज्ञान समजण्यास भारी दुर्घट आहे. आत्मज्ञानप्राप्तीस पुष्कळच विघ्ने येत असतात; दुराचरणी लोक सदाचरणी लोकांस मोहपाशांनी[६] अडकवून आत्मज्ञानाच्या सिध्दीत विघ्ने आणतात.

गुरुमहाराज ! दुराचरणी लोकांची ओळख कशी पटावी?

वत्सा ! मैत्रायणीयोपनिषदांतील ''ज्ञानोपसर्ग'' पाठ बोल पांहू.

हा पहा गुरुमहाराज -

''मोह जालस्येव वै योनिर्यदा स्वर्गः मै. उ. ७-६

पुरे, शुध्द शब्दार्थ सांग पाहू ?

गुरुमहाराज ! अर्थ असा दिसतो ''शूद्राचे शिष्य बनलेले, शुद्र असून शास्त्रे जाणणारे, दृष्टबुध्दि, जटाधारी[७], नट, भांडखोर, बहुरूपी अशा प्रकारचे दुष्ट प्राणी, जगांत पुष्कळ असतात, या नीच लोकांच्या संगतीस कधीच राहू नये, हे स्वर्गगतीस अपात्र असतात.''

वत्स ! स्वल्पच भारी आहे. तात्पर्य

''भ्राम्यलोको न जानाति वेदविद्या तरंतुयात्'' मै. उ.

असो. पण थोडक्यातच सांगतो. जगांत खऱ्यापेक्षा खोट्याचा भरणा अधिक असतो, साधूपेक्षा दुर्जन पुष्कळच असतात, ते अधोगतीने जातात, इतकेच नाही, त्यांच्या संसर्गाने सज्जनदेखील पुष्कळदा मुक्त स्थितीस मुकत असतात.

गुरुमहाराज ! अधोगतीला जाणाऱ्या जीवांची सोय परमेश्वराने काहीच केली नाही की काय? आणि या नीच कार्यरत प्राण्यांना कधीच मुक्ति मिळणार नाही की काय?

बाळानों ! या सर्व गोष्टींचा उकल थोडक्यात सांगून पुरा व्हावयाचा नाही. स्वानुभवावाचून ब्रह्मज्ञान पटावयाचे नाही, तत्वविज्ञानावाचून सत्व, आत्मत्व यांची ओळख पटणार नाही.

गुरुमहाराज ! तत्वज्ञानांत पंचतत्वांची धारणा असते ना?

वत्स ! जगाची उभारणीच जर पंचतत्वांपासून झाली आहे, तर तत्वज्ञानात त्याची धारणा असलीच पाहिजे.

गुरुमहाराज ! बरीच आठवण झाली विश्वाची उभारणी कशी झाली? वत्स असे प्रश्न मला भारीच आवडतात ऐका-

पद (चाल-निर्धनतेने लज्जा)

ॐ ब्रह्मापासोनी झालें आकाशचि निश्चितीं । नभांतुनि होय वायुची गती ॥ पवनापासुनि तेज निपजले वन्हि जला उपजवी ॥ पृथ्वी, जलजाकृति भासवी ॥ भूमीपासुनि धान्य निपजते अन्न मानवांप्रती ॥ जाववी, विश्वेशाची कृती ॥१॥

(चाल) या आकाशाला शब्द एक गुण असे । मारूती, शब्द स्पर्श दिसतसे । अग्नि रूप अधिक घेतसे । जल, पृथ्वी हीं रसगंधाचीं मूळ कारणें खरीं । बोलती शास्त्रांच्या वैखरी ॥२॥

गुरुमहाराज ! पृथ्वी ही पंचतत्वांतील एक तत्वच तर.

वत्स ! काय संशय? सर्व वस्तूंचें जनन[८] पृथ्वीतच आहे. पृथ्वी ही अष्टमूर्ति परमेश्वराची एक मूर्ति आहे.

हो, वेदांत पृथ्वीचें स्तवन भारीच केलें आहे. पण.....

वत्स ! पण, परंतु हे संदिग्ध शब्द, शुध्द भाषेला बध्द करतात; संशय काय दिसतो तो स्पष्ट बोल.

गुरुमहाराज ! संशय म्हणजे, छांदोग्योपनिषदांत, तेज[९], आप आणि पृथ्वी ही तीनच सूक्ष्म मूळतत्वे, सृष्टी निर्माण होण्यास कारणीभूत आहेत, असे सिध्दांतपूर्वक म्हटले आहे तें कसें ?

वत्सा ! अशा प्रश्नांनी[१०] मला आनंदच होत असतो. ऐका, प्रारंभी मूळ महाभूते तीनच मानून, त्रिवत्करणाने जगाची उत्पत्ति लावीत असत. आपल्या उपनिषदांतच नव्हे. वेदान्तसूत्रांतहि तसेच आहे आणि आपले बादरायणाचार्य, पंचतत्वाचे नावहि घेत नाहीत. पण पुढे तैत्तिरीयं संहिता, बृहदारण्यक, गर्भोपनिषद् या ग्रंथकारांनी बराच श्रुतिशोध लावून पंचीकरण पध्दति जगांत लावून दिली आहे.

गुरुमहाराज ! अशी घोटाळ्याचीं बरींच स्थळें उपनिषदांत आहेत असें म्हणतात.

छे ! वत्स, अज्ञान लोकांचे म्हणणे, उपहासास पात्र होणे, अशातला प्रकार; उपनिषदांत घोटाळा, मग सारें जगच घोटाळ्यांत पडेल; धर्माचे सर्व रहस्य

उपनिषदापासून आहे. सर्व जगांत उपनिषदांसारखे कल्याणकारक, उन्नतिदायक, तत्वसार ग्रंथ अन्य मिळणार नाहीत, बोल काय घोटाळा म्हणतात?

गुरुमहाराज ! छांदोग्योपनिषदांत, परब्रह्मास एकदां सत् आणि एकदा असत् अशी परस्परविरोधी नावे काय म्हणून दिली आहेत?

वत्स ! उपनिषदांचे महत्व तुमच्या लक्षांत सारखे आले नाही.

''यद्वेदाध्ययनं तथोपनिपदां योगस्थच ज्ञानं ॥
'' उपनीय तमात्मानं ब्रह्मा पास्त द्वंय यत:'' ॥
निहंत्य विद्यां तद्वंच तस्मादुपनिपभ्दवेत् ॥

उपनिषदांचे श्रेष्ठत्व महान् महान् वेदवेत्त्या ऋषींनी भारीच वर्णन केलेले आहे; वत्स, काय म्हटलेंस, परब्रह्मास सत् असत् अशी नावे असतात? तैत्तिरीय संहिता पहा,

'' विज्ञानंचविज्ञानंच सत्य चानृतंच ''

याचा अर्थ पाहिलास म्हणजे सहजच विरोधाचा भ्रम उरणार नाही; ब्रह्म हें परमेश्वराचे मायामय विश्वच आहे.

गुरुमहाराज ! हे लक्षांत येण्यास बराच अभ्यास पाहिजे.

वत्स ! हें आधीं गूढच भासतें, पण थोडासा अध्यात्मविद्येचा अभ्यास झाला म्हणजे अगदीं सुलभ दिसणार.

गुरुमहाराज ! अध्यात्मविद्या म्हणजे काय?

वत्स ! थोडक्यांतच सांगतों, सर्व विद्यांत अध्यात्मविद्या ही भारी श्रेष्ठ आहे. अध्यात्म विषयांत एकदां मन शिरलें म्हणजे ईश्वराचा ऋणानुबंध चटकन् ध्यानांत येतो. जीवाच्या पुरषार्थाची नांगी सपशेल लुली पडते. आणि जीवाचें उत्तमांग जे मस्तक ते परमेश्वराच्या चरणावर सहजच नम्र होते.

गुरुमहाराज ! आत्मज्ञानानेंच का मुक्तिलाभ होत असतो?

वत्स ! खरें म्हणतां मुक्तिलाभास सत्याचीच कास धरली पाहिजे. ''सत्य वद'' ही मूल श्रुतीची गति आहे. सत्यापरता[११] धर्म नाही, सत्यापरतें कर्म नाही, सच्चिध्दन परमात्म्याचा ओढा सदा सर्वकाळ सत्याकडेसच असतो, हें निश्चित आहे.

''महाभूतानि सत्यानि यथात्मापि तथैवहि'' -(याज्ञवल्क्यस्मृति)

असो, बराच विस्तार झाला. आतां काय कसचा पाठ?

गुरुमहाराज ! अग्निदेवेतचा स्तुतिपाठ.

वत्स ! कालचा अर्यमा देवतेचा स्तुतिपाठ पुरा झाला ना ?

हो, पाठ झाला पण अर्थ उरला होता महाराज.

मग, वत्सा ! अर्थाविचून पाठ व्यर्थ, हें नाहीं का लक्षात? बरें, आधी अर्यमा देवतेचा पाठ बोल; आर्य लोकांनी अर्यमा देवतेची स्तुति प्रतिदिनी केलीच पाहिजे.

बरें महाराज !

''ऋजुनीतिनो वरूणो मित्रो नयतु विद्वान। अर्यमा देवैः सजोषाः ॥

पुरे, अर्थ बोल.

पहा, गुरुमहाराज.

सर्वज्ञानी जे वरूण आणि मित्र ते आणि इतर देवांसहित
अर्यमा[१२] हा आम्हांला सरळ नीतीचा मार्ग दाखवो

फार उत्तम. वत्स ! ह्या सुक्ताचा हेतु आला ना लक्षांत ? हो गुरूमहाराज,पण सरळ मार्ग दाखवणे म्हणजे काय? हेंच ते, वत्सा ! अर्थाचें तथ्य चित्तांत बिंबलें तरच पाठाचें सार्थक. पहा, ईश्वरी कृपा आणि सन्मार्गदर्शन यांचें वर्णन ह्या सुक्तांत आहे. परमेश्वराच्या[१३] प्रसादावाचून अज्ञान लोकांस सन्मार्ग म्हणजे मुक्तिमार्गाचा लाभ होणार नाहीं, हेंच ह्या स्तुतीचें गुह्य तत्व आहे. बरें, होऊं द्या पुढचा पाठ.

पहा, गुरुमहाराज -

''आंगिरसो विरूपः- इमे विप्रस्य वेधसः अग्नेर अस्तृत यज्वनः।
गिरः स्तोमास ईरते ॥१॥

पुरे, अर्थ होऊ द्या, शब्दार्थापेक्षां लक्ष्यार्थ लक्षांत आणला पाहिजे.

पहा गुरुमहाराज - ''ज्ञानरूप सत्कर्माचा विधाता आणि भक्तांच्या यज्ञयागांचा कधीहि उच्छेद होऊं न देणारा जो अग्नि, त्याची स्तोत्रे माझी वाणी उच्चारीत असते.''

फार सरस, पण वत्सा ! मूळ शब्द अगदी गाळलास.

होय, महाराज, ''विरूप म्हणजे रूपहीन आंगिरस मुनि.''

हेच ते वत्स ! आंगिरस मुनीला विद्रुप ठरवलेंस ?

नाही महाराज ! पण विरूप[१४] शब्दाचा आणखी अर्थ कसा होतो? विरूप म्हणजे रूपहीन, कुरूप असा शब्दार्थ लावतात ना ?

वत्स ! विरूप नामक देव तू ऐकला नाहींस का?

हो, हो, आर्यावर्ताच्या वायव्य दिशेकडे, उत्तर वृत्ताजवळ विरूप[१५] नावाचा, थंड हवेचा देश आहे; असे का ? मग, विरूप देशांत वास करणारा आंगिरस मुनि, असा अर्थ असेलसा दिसतो; पण-

वत्स ! इतकेहि समजून, पण हे आहेच?

तसे नाही, गुरुमहाराज ! विरूप देशांत जाण्यास, काश्यप[१६] समुद्र, काकुत्स[१७] पर्वत वगैरे मध्ये आहेत ना? मग ते ऋषि तिकडे कसे गेले ?

वत्स ! विरूपदेश झाला तरी भूमंडळावरचाच की नाही? स्वर्गपाताळांत गमन करणारे ऋषि यांस समुद्रोल्लंघन अवघड होईल असे वाटते का? जलांवर, वायुमंडळावर[१८] फिरणे, ही योगसिध्दीची लक्षणे आहेत.

गुरुमहाराज ! अशी ही योगसिध्दी अगम्यच तर,

वत्स ! योगाची महति जितकी वर्णन करावी तितकी थोडीच होणार आहे. योगशास्त्रावर महान् महान् कवींनी बरींच वर्णनपर काव्ये रचलेली आहेत. तरी ती अगदी थोडीच दिसतात पहा-

''अन्योन्यशोभा परि वृध्द येवां योगस्तडित्तोयद्योरिवास्तु''

आणि काय सांगू

'' वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेना ते तनु त्यजाम् ''

गुरुमहाराज ! योगसिध्दीने रोगांचा नाश होतो असे म्हणतात.

''योगाद्रोगविनाशनं''

वत्स ! अगदी बरोबर, योगशास्त्राचे नाव घेतांच मनोवृत्ति उल्हासित होतात; तरी पण थोडक्यातच सांगतो; मानवी देहांतल्या अत्यंत सुप्त पण अतिशय अद्भुत व प्रचंड अशा शक्ति जागृत करुन त्यांच्याकरवी, ''कर्तुम् अकर्तुम्, अन्यथा

कर्तुम्'' असे असाधारण सामर्थ्य आंगी आणावयाचे, आणि त्रिकालज्ञानित्व, अजरत्व, अरोगित्व व अंतीं मोक्षपद प्राप्त करून घ्यावयाचे, अशासाठी योगशास्त्राचा उदयआहे.

गुरुमहाराज ! योगाभ्यास हा एक व्यवसाय म्हणतात ना ?

वत्स ! प्रातःस्नान, सूर्योपासना, प्राणायाम - पर्याय आणि यौगिक व्यायाम यांनी भयंकर असे असाध्य रोगी रोगमुक्त होत असतात. यौगिक व्यायाम हा सर्वोत्कृष्ट व सर्वांगीण व्यायाम आहे.

बरे, पण गुरुमहाराज ! अर्यमादेवतेच्या स्तुतीत सन्मार्गदर्शन असे म्हटले, त्याचा अर्थ काय?

वत्स ! सन्मार्ग म्हणजे पुण्यमार्ग, हें काय सांगितले पाहिजे? मोक्षमार्गाचे दर्शन अर्थात मुक्तिलाभ होण्यास परमेश्वराची कृपा पाहिजेच, कारण ईश्वरी सत्तेवाचून अग्निदेवतेच्यानेहि तृणाची काडीदेखील जाळवत नाही. पहा,

'' तस्मिंस्त्वयि कि वीर्यमित्यपीदं सर्व दहेयम्।
यदिदं पृथ्वि व्यापिति'' केनोपनिषद् ३-४.

गुरुमहाराज ! सन्मार्ग या शब्दाची शुध्द व्याख्या आमच्या चित्तांत सरळ भरत नाही, क्षमा असावी.

वत्स ! तुझ्या प्रश्नांचा मला राग येत नाही. याकरतां आधी पातंजल योगशास्त्राचा अभ्यास झाला पाहिजे; प्रकृति, निवृत्ति याची व्युत्पत्ति लागली पाहिजे. तात्पर्य, स्वल्पांतच सांगावयाचे म्हणजे जो विषय सत् असत् बुध्दीबरोबर, हृदयस्थ आत्म्याला भिडून जातो तो खरा मार्ग होय; आर्य तत्वज्ञानाचा बोध झाला म्हणजे, हे सारे करतलामलकाप्रमाणे तुझ्या चित्तांत खेळत राहील.

गुरुमहाराज ! आर्य तत्वज्ञानांत काय आहे?

वत्स ! तुझ्या वयोमानाप्रमाणे हे प्रश्न भारीच आनंद देतात. पहा, आर्य लोकांचे तत्वज्ञान मानवी जीवनांतील सत्य, सौंदर्य व प्रगति-प्रियता यांच्यावर मुख्यतः अधिष्ठित आहे; तत्वज्ञानावांचून महान् महान् यज्ञांचा, कर्माचा अधःपात[२०] होत असतो; बरें, हें सारें तुला थोड्या उपनिषदाचे वाचन[२१] झाले म्हणजे, सहजासहजी समजू लागणार आहे. विचार, प्रश्न केल्यावाचून उत्तर कसे मिळेल?

गुरुमहाराज ! कर्म म्हणजे काय ?

वत्स ! एकाच हातांत किती पात्रे घेशील ? कर्म शब्दाची व्याख्या भारी व्यापक आहे. ज्ञान आणि कर्म, धर्म आणि कर्म, व्याकरणशास्त्रात कर्म, ज्योतिषशास्त्रातहि भाग्यस्थान हे कर्मालाच गणले आहे.

गुरुमहाराज ! योग मात्र कर्माहून निराळा असतो का ?

उत्तम प्रश्न; वत्स ! कुशलतेने केलेल्या कर्मास योग[२२]असे म्हणतात. ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग, हे मोक्षाचे विशिष्ट मार्ग आहेत.

गुरुमहाराज ! भक्ति ही योगसिध्दीच तर.

वत्स ! काय विचारतोस ? भक्ती[२३] सारखें मुक्तिलाभास अन्य साधनच नाही. भक्ति, श्रध्दा ही सर्व कर्मांशी समरस झालेली असलीच पाहिजे. परमेश्वरास भक्तीसारखे प्रियकर दुसरे कार्यच नाही.

एकच प्रश्न, महाराज, ज्ञानप्राप्ति झाल्यावरहि कर्म केलेच पाहिजे असे म्हणतात ते कसे?

वत्स ! तुझ्या प्रश्नाचा मला उबग येत नाही. ज्ञान म्हणजे काय हेंच आधी ध्यानांत आले पाहिजे. आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान का शाब्दिक ज्ञान? मनुष्यलोक, जन्मापासून प्राणोत्क्रमणापर्यंत कर्मानें[२४] बांधलेलाच आहे; मग कर्म सोडणे, करणे, ओढणे, तोडणे कोणाच्या हातांत असणार? उगीच आपले भाषाज्ञान दाखविण्याकरतां शब्दाचे तारे तोडतात. ब्रह्मज्ञान कांही लेकराच्या गोष्टीसारखे नाही. याला जाडा अभ्यास, सुद्‌गुरुचा उपदेशलाभ झाला पाहिजे. खरे ज्ञान प्राप्त होण्यास स्वात्मसद्दर्शनिच[२५] झाले पाहिजे; तुझा वेदपाठ झाला म्हणजे याचा उलगडा करून देऊं बरे, बोल आणखी कांही संशय असेल तर.

गुरुमहाराज ! कर्म करणे हा अधिकार आहे, केवळ कर्तव्य म्हणूनच कर्म करावे. फळाची इच्छा धरू नये असे म्हणतात ते कसे ?

बाळांनो ! कर्तव्य म्हणजेच कर्म, कर्म करणे हा अधिकार आहे, बरोबर पण अधिकाराला आधार पाहिजे की नाही? औषध घेणे कर्तव्य म्हणून, रोग जावो अथवा राहो, ही फलाशा नव्हे की काय? निर्हेतुक कर्म करणार तरी कशास? मग ते कर्म स्वार्थी असो वा परार्थी असो, साध्य असो किंवा असाध्य असो. फळाची

आशा सोडून आंब्याच्या झाडावर दगड काय म्हणून मारावयाचे; नुसता वाद घेऊन लोकांस भ्रमांत घालतात आणि आपण भ्रमांत पडतात इतकेच कौडिण्य बोल, कांही मनांत दिसते ते.

गुरुमहाराज ! ऐतरेय ब्राह्मणांत

''साम्राज्यं भोज्यं स्वराज्यं पारमेष्ट्यं राज्यं ''

असें म्हटलें आहे तें काय?

फार सरस. बाळानो, सर्व राज्यसंघटनेची ही व्याख्यात्मक नावे आहेत. सर्व राज्यव्यवस्थेत स्वराज्य ही, विद्वान समंजस लोकांची राजव्यवस्था आहे.

पण, महाराज्यं आणि पारमेष्ट्यं राज्यं हे काय?

वत्स ! ऋग्वेदांत स्वराज्यसूक्त आहे ते बोल.

पहा, महाराज -

''आयद वामीय चक्षसा मित्र वयंच सुरयः।
व्यचिष्टे बहुपाय्ये चत्तेमहि स्वराज्ये ।''

अर्थ बोल.

गुरुमहाराज ! ''मित्रभावाने वागणाऱ्या वैमनस्यहीन सज्जनांनो, तसेच विशाल दृष्टीच्या सुज्ञ लोकांनो, तुम्ही सर्व विद्वान मिळून, व्यापक आणि ज्याच्या रक्षणाला अनेक लोकांच्या सहाय्याची अपेक्षा आहे अशा स्वराज्याची व्यवस्था उत्तम करण्याकरतां सर्व प्रकारे यत्न करूं'' पण महाराज, स्वराज्यव्यवस्था ती कशी करतात?

वत्स ! सर्व प्रजा मिळून उत्तम पुरुषाची योजना करतात, आणि त्याला लोकाध्यक्ष असे म्हणतात. तो राजापेक्षां श्रेष्ठ मानतात. कौडिण्य ! महाराज्य आणि पारमेष्टी राज्य यापेक्षां स्वराज्य हे श्रेष्ठ आहे; बरे, पण माध्यान्हसंध्येचा वेळ झाला ना?

हो, काहींच कळले नाही.

पद (विराटवदना० या चालीवर)

ग्रहमालेचा मध्य सूर्य हा नभमध्यावरि बघ दिसतो ।
सहस्र किरणे पसरूनिजगती संतापाला निपजवितो ॥
संध्यावंदनकार्यी[२५] रतले विप्र किती हे शांतमती ।
अर्घ्यप्रदाना[२७] करिती भावे निष्ठा धरूनी शुध्द रिती ॥
नक्षत्रांसह शशि हा भासे सागरउदरी की बसला ।
गिरिगुहांतरी स्थान मागुनी अंधकार हा जणु लपला ॥१॥

---

१. वंशस्य कर्तारमनंतकीतिम् । - रघुवंश
२. वाणी आणिक अर्थ जेवि नियमें एकामधे राहती ॥ - रघुवंश भाषांतर लेलेकृत
३. तं वेधाविदधे नूनं महाभूतसमाधिनः । - रघुवंश
४. वाचस्पतिरूवाचेदं प्रांजलीर्जलजासनम्। - कुमारसंभव
५. नवाबुमताः शिखिनो नदंती । मेघागमे कुंदसमान दंति ॥ - रसगंगाधर
६. यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव । - भगवद्गीता.
७. जटाजूटग्रंथौ यदचि विनबध्दा पुरभिदा । - गंगालहरी.
८. भूमोतु जायते सर्वं भूपो सर्व विनश्वसि । - महाभारत भीष्मपर्व.
९. राजलक्ष्मी तेजो विशेषानुमितां दधान्। - रघुवंश
१०. अविज्ञात प्रवचनं प्रश्न इत्यमिधीयने । - काव्यदर्पण.
११. यो वै स धर्मः सत्यं वै तत् । - बृहदारण्यकोषनिषद्
१२. पितृणामर्यमा चास्मि । - भगवग्दीता
१३. सारंगास्ते जललवमुचः सूचयिष्यंति मार्गम्। - मेघदूत
१४. वपुर्विरूपाक्षमलक्ष्य जन्मतः। - कुमारसंभव
१५. विरूप शब्दाचा अपभ्रंश युरोप, आणि आंगिरस मुनीच्या वंशजांस अंगिरज, अंग्रज-इंग्रज अशी नावे देतात असे आधुनिक श्रूतिसंशोधकांचे मत आहे.
१६. कास्पियन समुद्र
१७. काकेशस् पर्वत.

१८. शीतो वायुः परिणमयिता काननोदुबंराणाम् । - मेघदूत

१९. संन्यासस्य महाबाहो तत्वमिच्छामि वेदितुम् । - भगवग्दीता.

२०. न तु मामभिजानन्ति तत्वेना तच्छवंति ते । - भगवग्दीता.

२१. ऋषीणापुनराद्याना वाचमर्थानुधावति । - उत्तररामचरित्र.

२२. योग : कर्मसु कौशलम् । - भगवद्गीता.

२३. भक्तिच्छेदैरिव विरचितां भूति भंगे गजस्य। - मेघदूत

२४. कर्मानुबंधेन मनुष्यलोके । - भगवद्गीता

२५. खरे बाणले अर्जुना ज्ञान त्याला ।
स्वात्मसद्दर्शनी नित्य रमला। - गीतामृतशतपदी - गर्दे.

२६. कुर्वन् संध्या बलिपटहतां शूलिनः श्लाधनीयाम् - मेघदूत

२७. तानर्घ्यमिर्घ्यामिदाय दुरात्पत्या ययौ गिरि :। - कुमारसंभव.

■■

सर्ग ६ वा

साकी

पंचतत्वमय सत्वरूपि जो जगदात्मा हृषिकेशी ।
सृष्टिचक्र जो चालवि नियमें मायातित अविनाशी ॥
सुखकर तो होवो । जगता सुसंस्कृती देवो ॥१॥

शाबास ! वैजयंती, शाबास ! किती बुध्दिमान्, देवादिकांनी तोडांत बोटेच घालावी ! इतकें चातुर्य माझ्यांत असेल, असें मला वाटलेंच नाही; देवेंद्र रत्नपरीक्षक; अलंबुषेला उगीच पुढे केली, कोणाच्या धीरावर, तर वैजयंतीच्या; माझ्या बुध्दीची, चातुर्याची महति त्याला पूर्ण माहीत होती. आतां पहा -

पद (चाल - शिवलि बरें झाले०)

खचित मला गमलें, आतां । महेंद्रचिंतानल शोषाया
सागर मी बनलें । आतां ॥ शक्ति मुनीची सर्व भंगली ।
तपोतेजता दग्ध जाहली । अलबुषा देवीच्या सुगळीं ।
पदकचि मी झालें । आतां ॥१॥

आतां पहा -

गुरुकुल[1] सारें धुडकुनि देतें । तपोवनाचे उपवन करितें ।
शचिदेवीच्या नांवे येथें । बाग नवी रचितें । आतां ॥२॥

काय पहा, ते ऋषि म्हणजे खदिरांगार, सूर्यमंडळावर जाववेल पण त्या मुनींजवळ जाणे म्हणजे भस्मच होणे; तेज तरी किती प्रखर, जणूं काय सारें जग भस्मच होऊन जाईल. ते ऋषि, सरस्वतीच्या तीरावर असले म्हणजे नदीचें शीतल जल लाल झाल्यासारखें दिसूं लागतें. आम्ही तर-

पद (चाल - नंदनवन देवीने)

सरस्वतीतचि स्नाना करितां पाहुनि मुनिच्या त्या नयना ।
कंप भरे किती ताप बाधती वरती करवे नच वदना ॥
गायनवादन सर्वहि हरलें थरथर कांपे तें रसना ।
अलंबुषा देवीचा गेला धीर सोडूनी कधिच मना ॥१॥

बोलायला सारें सुलभ पण प्रसंग आला म्हणजे अंग होते धैर्यभंग; काय पहा.

पद (चाल-अलख घटा०)

पाहुनिया दिव्यतेजधारि ते मुनी।
भीतीची वीज बसे चपल मन्मनी ॥
बुध्दीचा होय ऱ्हास ।न सुटे ते वदनि श्वास ।
जाळिल की त्रिजगास । शाप देउनी ॥१॥

मग केले काय, सरस्वती देवीचें केलें स्तवन[२] देवी सरस्वती !

पद (चाल-नंदनवन देवीने०)

सरस्वतीदेवी तुज भावे माळ मनोमय कमलांची[३] ।
अर्पितसो ही सप्रेमाने लाज राख या अबलांची ॥
मुनितप दुर्भेद्यचि दुर्गाला वज्रपाणि[४] तो बहु भ्याला ।
गलितधैर्य या आम्ही बाला लागतसों तव चरणाला ॥
वरदाती तूं विश्वदीपिका सरिद्वरा जगत्रयजननी ।
इच्छित वरदानाते देउनि मुक्त करीं मुनिभयांतुनी ॥१॥

काय तरी चमत्कार, सरिद्वरा सरस्वती, आम्हां स्त्रियांची अप्सरांची अभिमानी भगिनी किती तरी तिचे तेज !

पद (चाल - बायांनो या सोडोनी)

चिद्रुप ब्रह्मिंची दुहिता । लावण्यजलाची सरिता ॥
पाहुनी दिव्यरूपखाणी । हृदयांचे झालें पाणी ॥
धरूनिया स्वये निज पाणी । आलिंगुनि दावी ममता ॥१॥

भीति तर किती भीति,ऋषीच्या तपोतेजाने शापवन्हीत भस्म होऊं ही एक भीति; जगज्जननी सरस्वती, आलिंगन देण्यास सरसावते तिच्या सन्निध जावे तरी कसें ? ती आम्हां अप्सरांस अस्पृश्य मानील. ही तर मोठी भीति, आम्ही कीं नाही, कितीही प्रौढी सांगितल्या, तरी आमचे दोष[५] आम्हांला मागे ओढतातच, पण देवी सरस्वतीने :

पद (चाल-बायांनो घा०)

धरूनियां स्वयें निज हृदयीं । बोलाचें मोल न होई ।
हृग्दता विचारूनि घेई । लाजवी गुणें नवनीता ॥२॥

अलंबुषा झाली गर्भगळित, मी तर अगदी भयचकित; जिव्हा उचलत नाही; हात हालत नाहीत, डोळे अधीर आणि कर्ण बधिर, तेव्हा,

पद (चाल -सदर०)

कुरवाळुनि बोले देवी । निज अमृतकर शिरिं ठेवी ॥
प्रेम ते अमोलिक दावी । पूज्य जी स्वये त्रिजगता ॥३॥

पण हे मी कोणाशी बोलते आहे ? माझ्याच देहाशी; ते कां ? हे अरण्यगायन ऐकणार तरी कोण? तसे नाही, तडागांत[६] जल तुंबलें म्हणजे पाट फोडावाच लागतो, मनांतले विचार जिव्हेला आधार, हेंच खरें झाले, सरस्वतीचे अभय वरदान तर मिळालेच; अलंबुषेला म्हटलें, आतां मनाचा धीर कर आणि गायनाचा गजर उडवून दे, राग, उपराग, भार्या, मूर्च्छना, यांचा तनाना सारखा चालू दे. हा पहा संध्याराग, नभोनील आगारांत रांगतो आहे आणि ऋषीचा संध्याकाळ, रविशशीच्या संधिकाळांत खुलतो आहे. आपल्या त्या षड्ज गांधार सुरांस तनखा दिला म्हणजे सुरासुरांच्या उरास विळखा बसतोच आहे. मग मुनीच्या नेत्रांस कसा अंधार करणार नाही? ही पहा वसंताने[७] कशी बहार उडविली आहे ती.

पद (चाल - नंदनवन देवीने०)

सरस्वतीच्या जलीं मनोहर पुष्पवाटिका नव रचिली ।
गुलाब चंपक पारिजात या तरूपंक्तीनी नदि भरली ॥
बकुल मालती पुष्प सुगंधें भ्रमर गुंजती चहूंकडे ।
वाटे तेव्हा मुनिमन नगिंचे ढांसळोनियां पडति कडे ॥१॥

किती सांगितलें, भाकितलें तरी अलंबुषेला धीरच होईना, तुंबराचा तुंबरा दिला हातांत, पण काय उपयोग ? शूरत्वावाचून तरवार कशी वार करील ? इतक्यांत.

पद (चाल - रूचती का तीर्थ०)

मुनिवर ते स्नानसंध्याकार्यार्थी पातले ।
नवरचना पाहुनियां विस्मितसे[९] भासले ।
नासाग्री लावूनीयां दृष्टी तैं बैसले ।
नच बघवे रूप त्याचे मन माझे स्खळबळे ॥१॥

सरस्वतीच्या वरप्रसादाने, त्या ऋषींच्या तेजाचा दाह आम्हांला बाधा करणार नाही, इतका जरी मनाला धीर आला, तरी नदीच्या जलावर ती येण्यास देह बधिर झाल्यासारखा दिसू लागला ; तेव्हा,

सरस्वतीचे गुप्तलिंगन अलंबुषा देवीला।
सांगे मुनिंच्या मनोललाटा विषयगंध[१०] लेवविला ॥
गायनशर हाणी । ठेवीं निश्चल मन वाणी ॥१॥

काय पहा, सरस्वतीच्या जळावर, बसणे, उठणे, विहरणे म्हणजे भूमीवरच्याप्रमाणे, ही दिव्य कला, आम्हां अप्सरांनाच साध्य, म्हणून भारीच गर्व होता. पण तो सर्व या ऋषींनी मोकलून दिला; ते मुनि,नदीजलाला स्पर्श न करतांच अंतराळांत पादुकांनी झपाझप उडतात, मग तर आमची गाळणच उडाली; ते ऋषि जितके येतात आम्हांजवळ, तितकी होते आमची पळापळ.....

अरे, पण विसरलें, सरस्वतीचें चित्र घेण्यास चुकले शचीदेवीच्या वस्तुसंग्रहालयांत, हे चित्र विचित्रच होणार होतें.....नाहीं, ती दैदिप्यमान् मूर्ति माझ्या हृदयांतून कशी निघून जाईल? सरस्वतीचें चित्र कसें बसें रेखीनच, पण ते दिव्य तेज कसे काढवेल; होईल, त्या चित्राला विद्युत्प्रकाश[११] दिला तर कांही होईल हा, हा, काय तरी तिचे रूपः ।

पद (चाल - सतनु करावा पुन्हा०)

अधोवदन तो मदन जाहला पाहुनि जिचिया स्वरूपाला।
लाज घेत तो शशांक गगनीं अपत्र[१२] प्रवाहीं मग लपला ॥
अस्ता गेला वासरमणि परि तारागण नच ये वरता ।
ग्रहगण सारा निष्प्रभ दिसला प्रकट भासवी बन्हिलता ॥१॥

चित्र कसें तरी रेखीनच, पण त्या देवीचे मनमोहक बोल कसे दाखवतां येतील?

पद (चाल -सदर)

मनमोहक ते सुधारसाहुनि गोड शब्द त्या श्रवणपथीं ।
मनोमया त्या तारेंतुनियां जाऊनि हृदया द्रव करिती ॥
वाटे अमृत वर्षाविचि का भोगावतीचा शितल झरा ।
वाणि नव्हे ती खाणिच भासे अर्थप्रसव तो दिव्य हिरा ॥२॥

त्या देवी सरस्वतीचें, तेजोमान रूप, आणि अमृतमधुर वाणी स्वर्गांगनांना दाखवून कुतूहल[१३] करण्यास पाहिजेच होतें. आणि तें प्रदर्शन पाहण्याकरतां, वैकुंठविलासी लक्ष्मी आणि कैलासनिवासी पार्वती, या देवी येऊन गर्वहीन होऊन गेल्या असत्या; आणि ब्रह्मदेवाला तर तसे स्वरूप निर्माण करण्यास अभिनव विद्युत मनोमय[१४] मूस ओतावी लागणार होती; आणि माझें भूमंडळावर आगमनाचें सार्थक्य अगणितच झालें असतें. पण करावें कसें ?..... हं, आलें लक्षांत, वैजयंतीच्या कल्पनासृष्टीत[१५] काय काय भरले आहे. तें परमेष्टीच्याहि अदृष्टी खास असणार नाही. आतां पहा -

साकी

चित्रकलेचें मर्म जाणतां तमहारी भास्कर तो ।
ध्वनिवाहकता वायुदेव हें कार्य सहजची करितो ॥
त्यांना सांगुनियां । करिते बहुविध खेळाया ॥१॥

बरें, पण, अंतिम कार्य साध्य होण्यापुर्वीच का ह्या साऱ्या मनाच्या कल्पना? दृश्यसृष्टीत आणि कल्पनासृष्टीत कल्पनांतीत अंतर; तर हे सारे बोल, फोलच आहेत. त्या ऋषीचे आम्हांजवळ आगमन आणि आम्ही करतो पलायन; मग यांत साधन तें काय साधणार ? उभयंताच्या संगमावाचून कृतकर्माला यश तरी कसे येणार? असो. आतां तरी झालें तें कांही कमी झाले नाही-

साकी

वीणावादन गायन परिसुनि नागापरि मुनि डोळे ।
अलंबुषादेवीच्या लीलांवरती लावुनि डोळे ॥
संध्या सोडुनियां । टकमक बघति रूपकाया ॥१॥

एकावर एक चिंता, चिंतेच्या गर्तेत एकदां मन पत्तन पावले म्हणजेमग मुक्त होण्याचें साधनच मिळत नसतें, हें खरें ! शांत, दांत, विषयविरत मुनीशी सामना; राग, कामना, वासना यांचा नायनाटच झाला पाहिजे. अलंबुषा म्हणते, ऋषीच्या तापवन्हीत भस्म होऊन जाऊं तर त्यांच्या तपोभंगाची दुष्ट वासना मनांत काय म्हणून आणलीस ? अंगसंगावाचून तपोभंग करण्यास अनगाचें अंतरंग निराळेच घ्याले पाहिजे.....हो, पण येथे वेळ किती होतो, हें तर अगदी कळत नाही. हा पहा-

पद (चाल - व्हावा लाभ तुझा०)

संध्याराग कसा खुलवी । प्राग्वधु शोधित जात रवी ॥
गगनीं कांचनरस भरला । सागर पवनें खवळविला ॥
निशापति तारागण वाहे। सरिताजल कौतुक पाहे ॥
मुनीचा शिष्यवर्ग सगळा। संध्याकर्मी रत झाला ॥२॥

---

१. गुरुशुश्रूषणालस्यात्समावह्यं गुरोः कुलात्। - श्रीशंकराचार्यचरित्र.
२. स्तुत्यं स्तुतिभिरर्थ्याभिरूपस्थे सरस्वती । - रघुवंश
३. नवावतारं कमलादिवोत्पलम् । - रघुवंश
४. वज्रं मुमुक्षुन्निव वज्रपाणि। - रघुवंश
५. दोषाऽपि नूनमहिमांशुरसौ किलेति । - शिशुपालवध.
६. जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट । - मोरोपंत.
७. वसंत योधः समुपागतः प्रिये । - ऋतुसंहार
८. नदीमिवांतः सलिलां सरस्वतीम्। - रघुवंश
९. तपः क्षरति विस्मयात् । - मनुस्मृति
१०. अविभावि तेषु विषयः प्रथमं मदनोपि नूनमं भवत्तमसा । - शिशुपालवध.
११. मा भूदवं क्षणमपिच ते विद्युता विप्रयोगः। - मेघदूत.
१२. परि तो विपाण्डु दधदश्रशिरः। - शिशुपालवध.
१३. कुतूहलेनेव मनुष्यशोणित्म्। - रघुवंश
१४. धाताकरीच करीता मृदु हे न होती ।
या कारणास्तव मनोमय मूस ओती। - रघुनाथपंडित
१५. अनेक पितृकाणा तु पितृतो भागकल्पना । - याज्ञवल्क्यस्मृति.

सर्ग ७ वा

आर्या (गीति)

सर्गस्थितिलयकारण आवरणी जो धरीत विश्वास ।
प्रभुवर तो कलिमय भय वारूनि तारील हाच विश्वास ॥१॥

ही पहाटेची वेळ, कितीतरी आनंददायक !

पद (चाल - हा सकल देह०)

सुप्रभातसमय रूचिर सुखवि लोक सारा ।
कांचनरस[१] लेउनि निज करि उषा विहारा ॥
अज्ञानी निद्रेंने । गढलीं जीं लोकमनें ।
उठवाया रविकिरणे। करिती जगिं पसारा ॥१॥

परमेश्वराची लीला कितीतरी अगम्य सहस्ररश्मि चंडकिरण, ताप देत असतां, सारे लोक, पशुपक्षीदेखील, उघड्या जगांत हिंडत फिरत असतात, आणि शीतल चंद्राच्या प्रकाशांत निद्रेचें आभरण[२] घेऊन, घरे,घरटी, गुहा यांत स्वस्थ पडत असतात, याचे कारण काय असावे ?

आतांचा हा उप:काल -

पद (चाल-दिसली पुनरपि०)

ब्राह्मणवर्णा ब्राह्ममुहूर्ती ब्रह्मानंदचि भासवितो ।
शब्दब्रह्म तो वेद पढाया उक्त काल हा जाणवतो ॥
अज्ञानाची रजनी सरली येई वरता ज्ञानरवी ।
तमोहारिणी भास्कररमणी उषादेवता जग सुखवी ॥
दिनकररथ[३] नि:शंक चालण्या अर्घ्या देती विप्रमणी ।
अप्रतिहत ही नियमित चाले विश्वेशाची जगिं करणी ॥१॥

काय पण, या दिवसांत सरस्वतीच्या जलांत नवीनच प्रकार चालला आहे. जन्मांत न पाहिलेला फुलबाग, या नदींत कसा उत्पन्न झाला, मनमोहक लतावेळीचे[४] मंडपच दिसतात ते कोठून आले, हे काहीच तर्कांत[५] येत नाही. आणि -

पद (चाल - दिसली पुन०)

मंजुल गायन वीणावादन[६] कोठुनि येतें वनांतरीं।
चित्त वेधते, कांही न दिसतें मोह वाढतो मनावरी ॥
दिसती कांही स्त्रिया चपलशा गुप्त होति कीं दिसति वरी ।
अंत न लागे शांत मनाला उत्सुकता किति हृदय भरी ॥१॥

सारें खरें, पण या तपोवनांत स्त्रिया म्हणजे चित्रांत देखील दिसूं नयेत....काय त्या स्त्रिया मनुष्यच असतील, का जलदेवता, वनदेवता म्हणतात त्या असतील कांहीच लक्षांत येत नाही, असो त्यांकडे दुर्लक्षच करणे सुलक्षण आहे;....पण मनाचा वेग त्यांकडस ओढतो तो कां? काल असें झालें -

पद (चाल-सदर)

सुगंधवातें मस्तक भरलें रूप भासलें वीज खरी ।
स्वर्गदेवता कीं वनदेवी स्पष्ट कळेना अजुनि तरी ॥
आकाशांतुनि उषादेवता स्नाना आली भूमिवरी ।
सरस्वती ही प्रत्यक्षचि की शुध्द मानवी वेष[७] धरी ॥१॥

पण, त्या स्त्रियांनी काय आरंभले आहे? त्या उषादेवता असोत किंवा निशादेवता असोत -

पद (चाल -रूचती का तीर्थ०)

भीति नसे काय त्यांना श्रीगुरुची वाटते ।
शापाग्नीमाजि काया का सहजीं होमिते ॥
उग्र तपोतेज ज्याचें स्वर्गाला भिववितें ।
खेद गमे व्यर्थ प्राणी प्राणान्ता पावते ॥१॥

कसेहि असो, गुरुमहाराजांची दृष्टि न पावो म्हणजे झाले. त्यांना स्त्री हा शब्द वेदपाठातदेखील रूचत नाही. स्त्रियांचे स्मरण योगधारणेला अध:क्रमण करते, असें ते नेहमी म्हणत असतात..... अरे, पण हा तिकडे कोण? कौडिण्य! अशा वेळी इकडेतिकडे काय म्हणून फिरतो आहे ?....अरे कौडिण्य ! कौडिण्य ! काय कर्णरंध्रे भरली का थंडीने .....कौडिण्य ! काय मस्तक फिरल्यासारखा दिसतो ! अगदी जवळ आलो तरी दिसत नाही की काय?

हो, हो, वत्स ! इकडे कोणीकडे ? ही वेळा पहाटेची का रात्रीची ? काय सूर्य उजाडला, का चंद्र निजला ?

कौडिण्य ! काय निजसुरा आहेस, सारखे डोळे पूस; पण, एक सांग गुरुमहाराज कोठे आहेत?

वत्स ! गुरुमहाराज, गुरु, जयजय परब्रह्म सद्गुरुः गुरुला क्षय नाही, नाम नाही. अक्षय अनामरूप अद्वय चिध्दन परात्परूः गुरु भगवान् की जय.

कौडिण्य ! भूतपिशाच्चबाधा झाली की काय?

वत्स ! पंचमहाभूतात्मक जग आहे, सर्वत्र भूते आहेत.

कौडिण्य ! वेडा झालास का वेड पांगरतोस? कौडिण्य ! असा भिऊं नकोस, घाबरू नकोस, डोळे तर भयंकर दिसतात, पण सांग, गुरुमहाराज कोठे आहेत?

वत्स ! गुरुमहाराज सर्वत्र आहेत, सर्व जगांत भरून आहेत. गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरा :

हे चिन्ह कांही ठीक दिसत नाही. कौडिण्य ! इकडे ये, अगदी घाबरू नकोस, येथे बैस, शांत हो जरा, हे पहा डोळ्यांस पाणी लावतो. फक्त गुरुमहाराज कोठे आहेत तें सांग तू होतास कोठे, आलास कधी; सारखे सांग.

वत्स ! कसे सांगू, नक्षत्रे पाहून सांगूं, का लग्नघटी पाहून सांगू ? ज्योतिषशास्त्रांत[८] सारे भूतभविष्य[९] कळते ना? तू तर महान् ज्योतिषशास्त्रज्ञ आहेस, जन्मकुंडली पाहून ज्योतिषी, जन्मवेळ, महिना, वर्षे अगदी बरोबर सांगतात, लग्नकुंडली पाहिली म्हणजे मुलींचे रूप, गुण, बंधु वगैरे सारे कळते ना? लग्नापूर्वी नवऱ्याने नवरीस पाहू नये, तिचे सारे गुण, गण, लग्नकुंडलीत कळतात, असे नाहीत का म्हणत? भिन्न नाडी झाली म्हणजे हाताची नाडी पाहण्याची गरजच नाही, प्रीति षडाष्टक जुळले म्हणजे दांपत्यात कलह[१०] म्हणून होणारच नाही. मग पहा, पादच्छाया घालून लग्न स्पष्ट कर, आणि गुरुमहाराज कोठे जलांत आहेत का स्थलांत आहेत ते प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं, मग प्रत्यक्षाला का प्रमाण पाहिजे ?

कौडिण्याला इतके वक्तृत्व[११] कोठून प्राप्त झाले ?कौडिण्य ! प्राण कासावीस होत आले, जरा उपकार कर आणि गुरुमहाराज कोठे आहेत, तें सांग तू काल

त्यांच्याबरोबर होतास की नाही? सारखा वृत्तांत सांग जरा शांत हो, उगीच मला घाबरवू नकोस.

वत्स ! कालचा वृत्तांत ? पहा -

पद (चाल-नीरक्षीरालिंगन०)

सरस्वतीच्या स्वच्छ जलांतरि पुष्पवाटिका पाहोनी ।
मन्मन तल्लिन झालें आतां नच ओढवतें फिरवोनी ॥
सुस्वर[१२] गायन ऐकुनि झाला लुब्ध देह हा बधिर तसा।
वीणावादन-गायन-नादे भ्रमित जाहलों नाग तसा ॥१॥

हेंच तें पिशाच्च![१३] त्या फुलबागा, त्या स्त्रिया, तें गायन,आले लक्षांत, पण एक सांग,गुरुमहाराजांची दृष्टि गेली नाही ना त्यांच्याकडे, बिचाऱ्या स्त्रिया, शापाग्नीत भस्म होऊन जातील. कौडिण्य ! गुरुमहाराज कोठें आहेत ते थोडक्यात सांग, प्रात:संध्येचा वेळ होऊन गेला.

वत्स ! थोडकें, तुटकें कसे सांगू, आधी मंगलाचरण, मग कथेचें निरूपण आधी आचमन[१४] मग पूजन.

कौडिण्य ! असे सांगू नकोस, वाद घालण्याची ही वेळ नाही. गुरुमहाराज आतां कोठे भेटतील ते स्पष्ट सांग, प्राण डोळ्यांत आले.

वत्स ! प्राण डोळ्यात म्हणजे, आधी तोंडातून नाकांत का जातात? गुरु म्हणजे सर्व शिष्यांचे गुरु, त्यांत भेदभाव नाही, मात्र शत्रू नाहींत, गुरुदेवता माउली, आणि शिष्यांवर तिची साऊली.

कौडिण्य ! असे करूं नकोस, जरा उपकार करून सारखें वृत्त निवेदन कर.

वत्स ! सारखे सांगतो, मध्येच मात्र मला घोटाळवूं नकोस. पहा, गुरुमहाराजांमागून काल मी गेलो. तेव्हा -

पद (चाल - नीरक्षीरालींगन०)

पुष्पवाटिका रम्य मनोहर जलांतरी किति वर्णावी ।
लतामंडपा सुंदर ललना हावभाव सुंदर दावी ॥
गायनवादन ऐकुनि सहजीं मोह[१५] उपजवी चित्ताला ।
संध्यास्नाना भानचि नुरलें देहभाग हा गहिंवरला ॥१॥

हं, आले लक्षांत, त्या स्त्रियांच्या कुभांडांत कौडिण्य सापडला खास; पण गुरुमहाराजांचे वर्तमान काहींच सांगत नाही, कौडिण्य ! जरा उपकार कर आणि गुरुमहाराज कोठे आहेत, इतके स्पष्ट सांग.

वत्स ! तूं पहिला वेदान्ती नैय्यायिक आणि मी साधा पुराणिक; आमची जोडी कशी जुडेल? सारी हकिगत सांगतो. स्वस्थ, पाहिजे तर तटस्थपणे ऐक. पहा -

पद (चाल - सदर)

सरस्वतीच्या नदीतटाकीं दीपपंक्तिशा[१६] बहु दिसल्या।
नयनज्योति ती गुप्त जाहली, चित्तवृत्ति त्या स्थलिं रमल्या ॥
आकाशांतिल नक्षत्रावलि लोपुनि गेल्या कीं नकळे ।
पेटवितो तरि कोणि न दिसतो वाळवंट तें शांत जळे ॥१॥

आतां कसे करावे ? हा काय बरळतो, की खरें सांगतो, हेंच तर्कांत येत नाही; खोटे म्हणवत नाही आणि खरें भासत नाही. पण या साऱ्या कृत्यांत , त्या स्त्रियांचे कांही कपटजाल आहे खरें. कौडिण्य !

हेंच तें शांत रीतीनें ऐकतोस ते हेंच का? श्रोत्याचे श्रवण एकाग्र नसले म्हणजे, पुराणाचें पूर्वनिरूपण स्मरणांतून जात असते. हे खरें प्रमाण की नाही?....ऐक -

साकी

गुरूवर तेव्हां सरस्वतीच्या पाण्यावरती चलती ।
विस्मय वाटे मच्चित्ताला, लतावल्लरी पळती ॥
गायन मंद बंद झाले । मज तो भानचि नच उरले ॥१॥

कौडिण्याच्या भाषेचा अर्थ जुळत नाही. सत्य काय आणि असत्य काय? आमच्या गुरुकुलांत वाढलेला कौडिण्य अनृत भाषण करील हें तर अगदीं अनुचित, साराच संशय, विस्मय भासतो; आतां पहा, आमचें हें तपोवन, यांत त्या स्त्रियांचे आगमन काय म्हणून? वीणावादन,[१७] गायन, नर्तन येथे कशाकरतां? दीपमाला प्रगटल्या, म्हणजे हे सारें इंद्रजालच म्हणावयाचे ....हं, दीपराग आळवला म्हणजे दीपमाला प्रकाशल्या असें दिसते म्हणतात, तसाच प्रकार नसेल कशावरून? कौडिण्य ! मला समजण्यासारखे शुध्द भाषेत सांग, गुरुमहाराज कोठे आहेत? तितकें मला मला पुरे आहे.

वत्स ! गुरुमहाराजांची माहिती विचारली म्हणजे, तुझी महति[१८] वाढणारच; मात्र ही प्रश्नाची अतिताईच आहे; शुध्द कसें बोलावें, आणि शुध्द कसें लिहावे, हें व्याकरण[१९] शिकल्यावाचून कसे कळेल? आम्हां पुराणिकांना, व्याकरणाची आकारणी तरी कशाला? परमेश्वराचे एक नामस्मरण केलें म्हणजे, नाम, सर्वनाम, सामान्य-विशेषनामाची गरजच लागत नाही...

कौडिण्य ! क्षमा कर, गुरुमहाराज पाण्यावरती चलती, म्हणजे, काय ते तरी स्पष्ट सांग.

वत्स ! स्पष्ट काय, माझें आणखी अदृष्ट सांगावयाचे? गुरुमहाराज पाण्यावरती चालतात, लतावेली पळतात, फुलबागा धांवतात, असा मला भास होऊं लागला; दीपमाला लोपल्या, जलदेवता कोपल्या, सारा झाला अंधार, मी झालो निराधार; जलांत आहे की स्थलांत आहे हेंच कळेनासे झाले; वरती अंधार आणि खाली अंधकार, इतक्यांत जरा अरूणोदय[२०] झाला, दिशा फांकल्या, तेव्हा जरा सावध झालो; फुलबाग नाही; दीपमाला नाहीत, स्त्रिया दिसेनात, गुरुमहाराज भासेनात, सरस्वतीचे निश्चल जल आणि त्यांत माझी खळबळ; जरा थोडक्यांतच स्नान करून आलो तो तुझी भेट झाली, स्वप्न म्हणावे की दृश्य म्हणावे हेंच अद्याप कळत नाही.

कौडिण्य ! तुझ्या इतक्याहि सांगण्यांत गुरुमहाराजांचा शोध लागत नाही; जलावरोह योगसिध्दीचा गुरुमहाराजांनी दुरुपयोग केला; मी काल त्यांच्याबरोबर नसलो, थोडासा चुकलों आणि घोर संकटांत पडलो; गुरुचणास मुकलो; व्यर्थ झालो. कौडिण्य ! आतां तरी शोध लावशील का?

माझ्या सांगण्याचा वत्सास बोधच होत नाही? भयंकर खग्रास ग्रहणाच्या वेधांत मीसांपडलो, आणि गुरुमहाराजांस अंतरलो, अंत समयांतून वाचलों,हें भाग्य[२१] की दुर्भाग्य?

हाय, हाय ! कौडिण्य !गुरुरत्न हरवले, गेले; दुष्ट मायावी स्त्रियांनी, ओढून नेले; हाय !

पद (चाल-दिसली पुनरपी)

व्यर्थ जन्म मम झाला देवा; मरण बरें हें मज गमतें ।
गुरुपद सेवामृत पानातें आंचवलों सत्यचि पुढतें ॥

मायबाप-जन सोडुनि आलों सार्थ कराया देहाला ।
सद्गुरुचरणा अनन्यभावें[२२] रमलो सोडुनि गेहाला ॥
कोण विवशि त्या राक्षसि वाया आल्या ऐशा तपोवनी।
गुरुरत्नाला चोरूनि नेलें मायापटला बांधोनी ॥१॥

वत्सा ! काय बरळतोस, मी शुध्दीवर नाहीं आणि तू तर बेशुध्दच दिसतोस; गुरुमहाराज काय लहान बालक, ओटींत भरून नेले, येतील, भेटतील. करतील झालें. या दोन दिवसांत अनध्याय होणारच; मी जरा झोंप घेतो.

कौडिण्य ! काय निजतों म्हणतोस, छे ! गुरुमहाराजांचा शोध लागेपर्यंत जलदेखील विषासारखे आहे. ऊठ.....

वत्स ! सारी रात्र जाग्रण, भयंकर मरण चुकवून जरा येथें आलों, आणि त्यांत तुझे अधिकरण? गुरुमहाराज यावयाचे असतील तर येतील, मी काय, निजलों, उठलों,रडलों, म्हणून अधिक काय होणार? 'भवितव्यता बलियसि:

कौडिण्य ! हाच काय तुझा पुरुषार्थ? कर्तव्यशून्यांनी[२३] भवितव्य म्हणावे, यत्नहतांनी प्राक्तन गणावे, हे पहा आपले सहाध्यायि खेळत खेळत येतात.

वत्स ! तुझा यत्नप्रयत्न प्रारब्धांपुढे कांहीच उपयोगाचा नाही. उगीच जीव त्रासांत घालूं नकोस, देहाला श्रम आणि बुध्दीला भ्रम आणशील.

कौडिण्य! तूं मनुष्य आणि त्यांत ब्राह्मण, हा भित्रेपणा स्त्रियांनी, मूर्ख लोकांनी, मनांत आणावयाचा; होणार तें होणार, आणि घडणार ते घडणार? पुरुषार्थ म्हणजेच प्रयत्न.

वत्स ! यत्न करून कार्यसिध्दी होईल असें असल्यास सहजच तशी बुध्दि प्राप्त होत असते, नपेक्षां महायत्नच देहान्तास कारण होत असतो.

कौडिण्य ! शाबास, यत्न[२४] करून सिध्द होत नसल्यास मग आपल्याकडे दोष नाही.

वत्स ! काय प्राक्तनाकडे दोष? भवितव्यतेचा मात्र रोष होईल विधिलेखनावर अतिताई तर देहाची मातीच होईल. जरा शांत विश्रांति घेतो. तूंही जरा मनाची खंती सोडून दे, शांति, विश्रांति ही सुखाची संपत्ति असें म्हणतात.

कौडिण्य ! बरें तर, व्यक्ति तितक्या प्रकृति, मति तितक्या गति, पण माझा सिध्दांत तर प्राणान्त होईपर्यंत यत्न[२५] सोडावयाचा नाही.....देवी ! सरस्वति!

पद (चाल - अधम किति०)

दुष्ट दुर्जन कशा कपटि ललना। नष्ट नीचा महा भ्रष्टवदना॥
दिव्य तप तेज बल, गुरुवरानुग्रहें, शरिरिंमाझ्या वसे अग्निसम तें ।
शाप पावक झणीं. पेटवुनि या क्षणी. सर्व जगतीतला भस्म करितें ॥१॥

त्या अधम नीच स्त्रियांना, शापहोमाग्नीत भस्मच करून टाकणार होतो,....पण नको, गुरुमहाराजांची भेट झाल्यावाचून कोणत्याच कार्यास नेट ध्यावयाचा नाही.....गुरुमहाराज की जय !

---

१. तन्मध्येच स्फटिक फल का कांचनी वासयष्टि;। - मेघदूत
२. किमित्य पास्या भरणानि यौवने । - कुमारसंभव.
३. तुल्योव्योगस्तवदिनकृत श्चाधिकारो मतोन :। - विक्रमोर्वशीय.
४. लताप्रतानोद्ग्रथितैः सकेशैः लतेव संनध्द मनोज्ञपल्लवा :॥ - रघुवंश
५. यत् काव्यंम ध्रुवर्षि धर्षितपरास्तकैषु यस्योक्तमः । - नैषधचरित.
६. वीणावादनतत्वज्ञः श्रूतिशास्त्राविशारदः।
तालज्ञश्चा प्रयासेन गोक्षमार्ग निगच्छति ॥ - याज्ञवलत्क्यस्मृति
७. गतवतिकृतवेशे केशवे कुंजशय्याम्। - गीतगोविंद
८. प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ :। - सूर्यसिध्दांत.
९. कःश्रध्दास्यति भूतार्थ सर्वो मां तुलयिष्यति । - मृच्छकटिक.
१०. पश्चात्तापमवाप्नोति कलहांतरिता तु सा । - गीतगोविंद.
११. ननु वक्तृत्व विशेष निस्पृहाः। गुणगृह्या वचने विपश्चित :। - किरातार्जुनीय
१२. तं तस्य स्वरसंक्रमं मृदुगिर श्लिष्टंच तंत्रीस्वनम् । - मृच्छकटिक.
१३. यावज्जीवमायुध पिशाची न हृदयादपक्रमति । - बालरामायण.
१४. दद्यादाचमनंततः। - याज्ञवल्क्यस्मृति.
१५. मोहन सस्त भयतेंद्रियाणाम् । - कुमारसंभव.
१६. निशीथदीपाः सहसा हतत्विषः। - रघुवंश.
१७. उत्संगे वा मलिन वसने सौम्य निक्षिप्य वीणाम्। - मेघदूत
१८. अवेक्षमाणं महती मुहुर्मुहुः। - शिशुपालवध
१९. यद्यापि बहुनाधिषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् । - वेदांगसंहिता.
२०. संसृज्यते सरसिजरेरुणां शुभिन्नैः। - रघुवंश

२१. भाग्यक्रमेणहि धनानि भवंतियाति। - मृच्छकटिक.
२२. अनन्यं भाजं पतिमाप्नुहीति । - कुमारसंभव.
२३. कातरा इति जल्पन्ति यभ्दावा तभ्दविष्यति - पंचतंत्र ।
२४. यत्ने कृते यदि न सिध्दति कोत्र दोषः - पंचतंत्र.
२५. अस्मिन् द्वये रूपविधानयत्नः प्रत्युः प्रजानांवितथोऽभविष्यत्। - कुमारसंभव.

■■

सर्ग ८ वा

आर्या (गीति)

सध्दर्म सकर्म नीति भक्ति जिथें सर्वदा करी वसती ।
ईश्वर कृपाप्रसादें समृध्दा हे सदा असो जगती ॥१॥

प्रात:काळाचा समय; पूर्वदिशेच्या क्षितिजांतून रविबिंब[१] जरा झळकत आहे, सरोवरांतील कमलांप्रमाणे भूमिदेवी हास्यरसाच्या स्वारस्यांत गढून गेली आहे. आपापल्या घरट्यांतून बाहेर पडणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे मनुष्यगण, स्वतंत्र आनंदचित्त फिरत आहे; लतावेलींवर प्रफुल्ल दिसणाऱ्या कोमल पुष्पांप्रमाणे, विमल बालके, बालरवीचा प्रकाश प्रसन्न चित्ताने न्याहाळीत आहेत; अशा वेळी, सरस्वती नदीच्या वाळवंटावर एक प्रेक्षणीय देखावा दिसूं लागला; एक उग्र तपोनिधी ऋषि, विद्युल्लतेला लाजविणारी एक तरूणी स्त्री, आणि बालरवीला दिपविणारा एक बालकुमार, अशा त्रिगुणात्मक तीन व्यक्तींनी, सरस्वतीचे तीर शोभू लागले; तेव्हां .....

आतां कसे करावे ?

पद (निजरूपइला ० चाल)

हितगुज मुनिला सांगूं कीं । सत्य वृत्त ते कथुनि तयांला,
पूर्व स्मृति ती देऊं की ॥ दिव्य तपोबल उग्र रूपाला,
भिऊनि परतुनी जाऊं कीं । बालकुमारा[२] नेउनि त्याचें
मस्तक चरणी ठेऊं कीं ॥१॥

बाळ ! इकडेतिकडे जाऊं नकोस अं? येथे क्रूर पशू असतात, मोठ-मोठे पक्षी असतात, ते तुला घेऊन जातील.

जननी ! जलांतील मच्छापेक्षा, सुसरींपेक्षां हे काय मोठे असतात, त्यांची मला भीति दिसत नाही; अग, हे पशू, पक्षी नेऊन मला काय करतील?

बाळ ! हे पशुपक्षी, मच्छ[३] कच्छां[४] प्रमाणे नाहीत, ते मनुष्याला भक्षण करतात.

मातोश्री ! मग हे मनुष्य हिंडतफिरतच नसतील, घरांतच कोंडून असतात की काय? तर आम्ही जलातच राहिल्यास बरें.

बाळ ! अद्याप तूं भूमीवरची शोभा पाहिलीच नाहीस, तुझ्यासारखे मनुष्य तू पाहिलेस, त्यांच्याशी बोलला, चाललास म्हणजे तुला मच्छकच्छांची आठवणच होणार नाही; मनुष्यलोक सर्वांत उत्तम, आणि मनुष्यप्राणि सर्वांत श्रेष्ठ आहेत.

जननी ! सर्वांत श्रेष्ठ म्हणजे ग कसे ? पशुपक्ष्यांपेक्षाहि श्रेष्ठ ?

बाळ ! पशु, पक्षी, मच्छ, कच्छांपेक्षां मनुष्य हे श्रेष्ठ आहेत. त्यांस ज्ञान[५] ही अत्युतम देणगी परमेश्वराने दिली आहे.

मातोश्री ! तूं आतांच काय सांगितलेस, मनुष्याला पशू हे भक्षण करतात म्हणून की नाही ? मग श्रेष्ठांला कनिष्ठांनी भक्षावे, कनिष्ठांचे भय श्रेष्ठानी[६] धरावे, तर हे श्रेष्ठत्व वरिष्ठच म्हटलें पाहिजे; जननी ! आणि काय म्हटलेस, मनुष्यास ज्ञान ही देणगी परमेश्वराने दिली आहे ती कशी? ईश्वर म्हणजे सर्वांस सारखा असावा, तो सर्व प्राण्यांचा जनक, तर एकास का निराळी देत असतो देणगी ?

बाळ ! तुझा आतां व्रतबंध झाला पाहिजे, विद्या संपादन केली पाहिजे, मग तुला सारे समजू लागेल.

जननी ! व्रतबंध म्हणजे ग काय, आणि विद्या संपादन म्हणजे कसे, आणि विद्या कशाकरतां ?

बाळ ! व्रतबंधावाचून ब्राह्मणत्व येत नसते, मनुष्य जन्मतः शूद्र असतो, ह्या संस्काराने द्वीजत्व प्राप्त होते, आणि विद्येवाचून ज्ञान प्राप्त होत नाही; विद्याहीन मनुष्य पशूप्रमाणे आहेत.

मातोश्री ! काय ग मला सारा घोंटाळाच सांगतेस. मनुष्य जन्मतः शूद्र असतो म्हणजे ब्राह्मणाचा पुत्र शूद्र आणि विद्याहीन मनुष्य, मनुष्याला पशूप्रमाणे भक्षण करतो की काय? आणि एक सांग, मनुष्याला ईश्वराने ज्ञान ही देणगी दिली आहे असें म्हणतेस तर मग विद्या आणखी ती कशाला संपादावयाची ?

बाळ ! मनुष्यांत चार वर्ण असतात, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र; एकापेक्षां एक श्रेष्ठ आहेत, सर्वांत ब्राह्मण श्रेष्ठ.

जननी ! मनुष्याप्रमाणे पशुपक्षांत श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद असतो का?

हो बाळ ! पशूंत व्याघ्र, सिंह हे श्रेष्ठ आहेत, पक्षांत गरूड हा श्रेष्ठ आहे, व्याघ्राला सर्व पशू भीत असतात, तो बलवान् आहे, तो गाई बैलांना भक्षण करीत असतो.

मग, मातोश्री, बलवान् तो श्रेष्ठ, भक्षण करतो तो श्रेष्ठ, भूमंडळावरची रचना[७] उत्तमच म्हणावयाची, मनुष्यांत असेच ना श्रेष्ठत्व ?

बाळ! आतां तू भूमंडळावर फिरलास म्हणजे सारा चमत्कारच दिसणार, पशुपक्ष्यांची[८] ओळख पटणार, वृक्षलतांची नावे कळणार, गांव, शहरे नद्या, पर्वत यांची शोभा दिसणार.

जननी ! मनुष्यांस, पशूंस भिन्न नावे असतात का ग?

बाळ ! प्रत्येक वस्तुला भिन्न भिन्न नावे असतात. वृक्षांला, वेलींला फुलांला,वनस्पतींला[९] आणि लहान लहान जंतूलादेखील नावे असतात, जलचरांसहि नावे असतात. त्याला सामान्यनामें म्हणतात, म्हणजे प्रत्येक जातीची ओळख दाखवणारी नावें असतात.

जननी ! अशी ही प्रत्येक वस्तूची नावें ठेवली तरी ग कोणी? आणि ती कशी ग कळतात?

बाळ ! तुला आतां कठिण दिसतें, तें जरासा लोकांचा परिचय झाला म्हणजे अगदी सुलभ वाटणार; मनुष्यांचीं नावें कळणार; गावांची शहरांची, नद्यांची, पर्वतांची नावे लक्षांत येणार, तीं विशेषनामें म्हणतात; प्रत्येक व्यक्तीची नावे असतात, ती त्यासच ठेवलेली असतात.

मातोश्री ! तू सारें साधेच म्हणतेस पण मला भारी कठीणच दिसतें. प्रत्येक व्यक्तीला असलेली नावे विशेषनाम म्हणतेस, तर पर्वत, नद्या, गांव, शहरे ह्याही व्यक्तीच[१०] तर, त्यांस कोणी ग कशी नावे ठेवली?

बाळ ! उगीच वाद घालू नकोस. व्रतबंध झाला, विद्या पढलास, लोकांत परिचय झाला, म्हणजे हें सारें आपोआपच समजूं लागणार; आतां तुला असा उघडा बागडा, फिरतां येणार नाही, वस्त्रे प्रावरणे घातली पाहिजेत. अलंकार[११] धारण केले पाहिजेत.

काय ! जननी ! वस्त्रें प्रावरणे घातली पाहिजेत, तीं कशाकरतां? आणि अलंकार म्हणतेस ते तरी कसचे? वस्त्रे, अलंकार नसल्यास मनुष्य म्हणणार नाहींत की काय?

बाळ ! वस्त्रालंकारानी मनुष्यांत शोभा येते.

मातोश्री ! परमेश्वरानें मनुष्यास ज्ञान दिले. तसेच वस्त्रालंकार त्याने जन्मत:च कां दिले नाहीत? त्यास काय भारी अवघड पडणार होते? देवाच्या कृतीवर ही अतिताई नाही का होत?

बाळ ! छे ! आतां तूं मनुष्यलोकांत आलास, तर इतर लोकांप्रमाणेच चालले पाहिजे. लोकांच्या रीतीभाती[१२] .....

जननी ! काय ग, लोकांच्या रीतीभाती आणि स्राल्ल्या पाहिजेत? नको ग, मला ही सारी मनुस्यलोकांची कटकट. आम्ही स्वस्थ जलांतच जाऊन राहूं या पाहूं तेथें वस्त्रें नकोत, अलंकार नको. विद्या, व्रतबंध काही एक नको आहे; ही भूमिवरची, सामान्यनामें, शिकतां शिकतां जन्मच नको नको असा होऊन जाईल.

बाळ ! तूं भारी कोवळा आहेस; मनुष्यजन्म[१३] फार उत्तम आहे, आणि आर्यावर्तात मिळणे अतिदुर्लभ; बरें असो.त्या वृक्षास्रालीं पाहिलेस ना?

जननी ! काय ग तेथे आहे, कोण एक निजल्यासारस्रा बसला आहे तो, तो मनुष्य का पशु ?

छे ! बाळ ! तसे म्हणू नकोस, ते महान् तपोनिधि ऋषि आहेत, ते समाधि[१४] लावून बसले आहेत ते तुझे जनक आहत.

जननी ! जनक म्हणजे ग काय?

बाळ ! त्या ऋषीचा तूं पूत्र आहेस.

मातोश्री ! तुझाच ना ग मी पुत्र ? आणि कितीएकांचा पुत्र ?

बाळ ! भारी कोवळा आहेस, आतां त्यांच्याजवळ जा, त्यांना नमस्कार कर, ते तुझा व्रतबंध करतील. विद्या पढवतील; पण संभाळ अं, तेथे झाडीत, सर्पासारस्रे विषारी[१५] प्राणी असतात, ते तुला दंश[१६] करतील; ते लहानच दिसतातपण फार भयंकर !

जननी! काय ग सांगतेस ? लहानच प्राणी म्हणतेस आणि त्यांचे भय धर म्हणतेस ते कसे ? मनुष्यलोक भितात का त्याना? पशूप्रमाणे भक्षण करतात की ते मनुष्यास?

बाळ ! सर्प भक्षण करीत नाहीत. त्यांचा दंश झाला म्हणजे मनुष्याच्या देहांत विष चढते, आणि मरण येते.

मातोश्री ! पशू मनुष्यास भक्षण करतात. म्हणून त्यांस भ्यावें, सर्प दंश करतात म्हणून भ्यावे, मग मनुष्यानीं कशाला जगात रहावे? मनुष्य सर्वात श्रेष्ठ, मनुष्यजन्म भारी उत्तम म्हणतेस तर तो सर्वास भिऊन पळण्यासच तर ना? अशा भयंकर भूमंडळात कोण ग वास करणार? पण जननी ! असे प्राणी परमेश्वराने कशाला ग निर्माण केले ? एकमेकांस मारून खाण्यास की काय ?

बाळ ! त्या ऋषिवर्याची समाधि उतरत आली, त्यांजवळ जा आणि त्यांस नमस्कार कर.

जननी ! तू येतेस ना बरोबर ?

बाळ ! त्या ऋषीजवळ जाण्यास मला भय वाटते, पहा -

पद (चाल - दिसली पुनरूपि)

उग्र तपोनिधी ऋषिवर त्याना, नावडते स्त्री चित्ताला ।
जिवन्मुक्त ते जगती असती तुच्छ मानुनी वित्ताला ॥
नित्य निरंजनि लाउनि दृष्टि निरंतरा निर्जनि वसती ।
शाप देउनी भस्म करिति ते वाटे लोकां बहु भीती ॥१॥

जननी ! त्यांना स्त्रिया आवडत नाहींत म्हणजे पुरुष तरी आवडतात का? स्त्रियांना ते मनुष्यच मानीत नाहीत नसतील तर ! आणि काय म्हटलंस, शाप देऊन भस्म करतात म्हणजे, मनुष्यास पशूप्रमाणे भक्षण करतात की सर्पाप्रमाणे दंशच करून मारून टाकतात? ऋषींचेही आहे तर लोकांस भय? किती तर ही भयंकर पृथ्वी ! आणि येथे वास करणारे मनुष्यही भारीच भयंकर ! पण जननी ! एक सांग बरें, मनुष्य मनुष्यास मारीत नाहीत ना?

बाळाचे विचार विचित्रच असतात. बाळ! मनुष्याने मनुष्यास मारल्यास महापाप असते. त्यास राजाकडून भयंकर दंड होत असतो, मनुष्यासच नव्हे मनुष्यानें पशूस मारल्यासदेखील पातक आहे; युध्दांत[१७] मारल्यास मात्र पाप[१८] नाही.

जननी ! युध्द म्हणजे ग काय? आणि तें कशाकरतां करतात?

बाळाच्या प्रश्नाचे भारीच कौतुक वाटते. बाळ! राजेलोक, परराज्ये घेण्याकरितां एकमेकांवर युध्दे करतात, आणि त्यांचे एकेक शूर, हजारो लोकांचे प्राण घेतात.

बरेच तर हे राजेलोक; इतर लोकांनी मनुष्यांस मारले तर हे महान शासन करतात, आणि हे हजारो लोकांचे प्राण घेतात; मग ते मनुष्य व्याघ्रच म्हणावयाचे; भारीच श्रेष्ठ तर ही भूमंडळावरची रीति आणि कृति. आणि हे ऋषि तर त्यांच्याहूनहि श्रेष्ठ, वरिष्ठ !

बाळ ! हळूच बोल. ही पहा त्या ऋषिवर्यांची समाधि उतरत आली. आता ते आपल्याशीच काय बोलतात, ते येथे झाडाच्या आड राहून ऐकून घेऊं.

दैवाची लीला भारी विचित्र आहे, हे कांही खोटे नाही, मी कोण, केलें काय, आणि झालें काय; माझे ज्ञान, माझी विद्या; माझे आचरण पाहून सर्व लोक माझे चरण वदूं लागले, महायोगी पातंजल मुनि, यांनी तर आपल्या योगशास्त्रावर वार्तिक करण्यास लावले; पाणिनि ऋषींने व्याकरणशास्त्रावर व्याख्या करण्यास सांगितले; जैमिनी, महामुनि तर मीमांसाशास्त्रावर पसंति मागतात. तो हा दधीचि-

पद (चाल-नीरक्षीरलिंगन०)

विषयकर्दमीं लोळत पडला, भ्रंश जाहला बुध्दीचा।
मनोधैर्य तें लोपुनि गेलें भंग होय तपशुध्दीचा ॥
इंद्रियनिग्रह त्याग जाहला वैराग्यां विग्रह आला।
इहपरलोका सार्थचि मुकलों निंद्य जाहलो जगताला ॥
गुरुकुल महिमा ऐकुनि आले विप्रबाळ मम तपोवना ।
नच दाखवते मज मुख त्यांना शून्य भासते मज अवनी॥१॥

काय, होऊं नये तें झालें, घडूं नये ते घडले, पण मानव जन्माचे सार्थक्य होण्यास पाहिजे होते तेहिं दुरावले.

पद (चाल -सदर)

स्वर्गसुखाचे सुत्र पवित्रचि पुत्रवदन[१९] नच पाहियलें ।
विषयविषातें प्राशियलें परि पितर ऋणा[२०] नच फेडियलें ॥
झाली आशा पूर्ण निराशा श्रीपरमेशा तारि मला ।
प्रपंच ना, परमार्थी[२१] मुकलों, घोर अनर्थी हा पडला ॥१॥

आताच, ह्या बाळाची भेट झाल्यास, ऋषिवर्य थेट आनंदात समेट होतील....बाळ ! जरा त्या आंब्याखाली पडलेली थोडींशी फळे घेऊन ये पाहूं; वृक्षावर चढूं नकोस ?

जननी ! वृक्षावरची फळे काढल्यास वृक्ष काय दंश करतात. का शाप देऊन भस्म करतात? आणि याला आंबा म्हणतात ग? हे सामान्यनाम का विशेषनाम? आणि तुला हें कोणी सांगितलें? आणि या प्रत्येक झाडांना निराळ्याच प्रकारची फळे कशी ग असतात?

हा काय चमत्कार, सरस्वतीच्या तीरावर, अद्भूत,अपूर्व[२२] मायावी स्त्रियांनी, माझ्या देहाची, नव्हे साऱ्या जन्माची, राखरांगोळी केली; कपिल[२३], याज्ञवल्क्य या उर्ध्वरेत्या मुनींच्या पंक्तीत बसण्याचा मान जाऊन मान खाली घालण्याचा प्रसंग आला, अपमानाचे लांच्छन लागलेले वदन जनांस दाखवू नये म्हणून, या निर्जन तीर्थावर देहाचे विसर्जन व्हावें या करतां, आधिव्याधिरहित' शुध्द समाधि घेत राहिलो, तेथेहि मनुष्यासारखी चाहूल मला भूल पाडण्यास खुळखुळ करीत आहे. ती कां?....परमेश्वरा ! माझ्याकडून घडलेले महापातक, माझ्या देहाचा घात केल्यावाचून कसे राहील? कृपाघना ! दयाळा ! या पापापासून" मुक्त करण्यास तुझ्यावाचून कोण समर्थ आहे ?

'बाळ ! झाडावर का चढलास ? भूमीवरचीच फळे गोड असतात.'

'जननी ! ही झाडें कशीं ग निपजतात ?'

'ही आपल्या नदीच्याच जलाने वाढतात.'

'मातोश्री ! मग आपल्या जलांत कशी ग झाडे नाहीत? फळेहि नाहीत. या निर्जन क्षेत्रांत कोण हा बालक !'

साकी

बाल रवीसम बालक कोमल, बोल सुधेच्या धारा ।
आकर्षुनि मन्मनास धरितो करित वना सुविहारा ॥
मायाविभ्रम[२४] हा । नव नव दावी खेळ महा ॥१॥

पण याच्या भाषणाचा अर्थ काय? मंजुळ आवाज तर स्त्रियांसारखाच दिसतो आहे, व्यक्ति मात्र व्यक्त दिसत नाही; स्त्रियांच्या मधुर गायनाने पाषाणाच्या शिळा

विरघळून जातात असे म्हणतात. हें सार्थच आहे; वाटते, पार्वतीदेवीच्या गायनानेंच मानससरोवरासारखी[२५] सरोवरे निर्माण झाली; यांत आश्चर्य नाही.

'बाळ ! खाली ये, इतकी फळें कोण खाणार ?'

'जननी ! हीं फळें, मला, तिलोत्तम माशाला दिलीं पाहिजेत.'

काय, या बाळाचे विनमोल बोल, याच्या शब्दांचा अर्थ, शर्त केली तरी, तर्कांत[२६] येत नाही. या बाळाचे जननवृत्त कोण कथन करील; कोण ते जलांतर, आणि तिलोत्तम मासा तो कोण? हा! हा, या बाळाचे वदन तर नयनज्योतीस चलनवलन करण्यास देतच नाही, धन्य भाग्य याच्या जनकाचे ! -

पद (चाल - सतनु करावा)

कुंदकुसुमसम दंतपंक्ति त्या, मंद हास्य शशिवदनीचे ।
गाल गुलाबी लाली पाहुनि सौख्य गमे नंदनवनिचें ॥
चपल हरिणसम पळत दिसे हा कांति रवीची देहाला ।
सत्य भासते पडतो आतां फिरूनि बळी या मोहाला ॥१॥

बाळ ! जरा, खाली ये, हा पहा सूर्य किती वर चढला.

मातोश्री ! सूर्य वरती चढला म्हणून मी कां खाली यावे ? वरती चढेल तो खालती पडेल.

हा ! पुष्कळ मनोनिग्रह केला तरी, मनाचा आग्रह सुटत नाही. किती तरी या बाळाचे तात्विक भाषण ! आता तर -

साकी

वाटे द्यावें आलिंगन त्या धाऊनि सुंदर बाळा ।
उतावीळमन ओढी घ्याया चुंबन चंद्र मुखाला ॥
संशयतम परि तो । चित्तीं विभ्रम भर भरितो ॥१॥

बाळा ! जरा खाली ये, अरे ब्राह्मणानी झाडावरती चढूं नये, असा शास्त्रार्थ आहे, जरा घसरशील तर देहास भारीच त्रास पडतील.

मग, मातोश्री ! ब्राह्मणास फळे का शूद्रानी आणून द्यावी ? ते घसरून पडतील तर ब्राह्मणास त्रास होणार नाहीत? ब्राह्मणानीच केली का शास्त्रें ? का शूद्रानी

काय, हा बाळ ब्राह्मणकुमार ? आणि असे न्यायतत्व कोणाच्या तोंडात येईल? मनोवृत्ति[२७] तर हेच ठरवितात.

बाळ ! हा पहा, तिलोत्तम मासा आणि जलोद्वार मगर, वाळवंटावर येऊ लागले पहा.

हं, आले लक्षात, परमेष्टि ब्रह्मदेवाने माझ्याचकरतां ही भायावी सृष्टी निर्माण केली आहे. निसर्गावर[२८] खड्ग उपसले, मनुष्याची उत्पत्ति मनुष्यापासून व्हावी, पशूपासून पशू निपजावे, मच्छांपासून मच्छ व्हावे, असा सृष्टीचा नियम विधात्यानें मोडून टाकला. श्रेष्ठांनी नियम भंग केल्यावर कनिष्ठांचे आचरण अनिष्टच होणार

बाळ ! ये जरा, वेळ बराच झाला, ही पहा आनंदवती मगरीदेखील वरती आली.

हा, हा, या पुत्राचा जन्म निश्चयात्मक जलचरांपासून, मच्छांपासून असो वा मकरांपासून असो, पण जलांतहि ब्राह्मण, क्षत्रिय, ही वर्ण व्यवस्था कोणी निर्माण केली? ब्राह्मणपुत्र हें तर निःसंशय; ही अद्भूत अपूर्व रचना, चतुराननानेंच केली का? हें तर आश्चर्यच भासतें. पण हेंच काय सारीच माया[२९] ---

पद (चाल - मम सुत०)

जलांतरीं फुलबागचि फिरली। कोणी कधीं तरी पाहियली ॥
नदीवरी खेळति की ललना । कोणी आणियलें तें ध्याना ॥
गायनिं प्रकटति दीपमाला । कोणी पाहियलें तें डोळां ॥
ब्रह्मचर्या ढांसळोनि मम । व्यथित मति केली ।
धात्या, इच्छा नच पुरली ॥१॥

बाळ ! ये, ये, वेळ बराच झाला.

हा ! हा ! -

साकी

एकाएका गुप्त जाहला बाळ जळांतरी गेला ।
मन्मन ओढुनि नेलें सहजीं, चपल विमल रंगेला ।
जडली हे आधी । झाली व्यर्थ समाधी ॥१॥

आतां नकोच हें जग, अशा ह्या पापमय जगांत वास्तव्य करणे नको. परमेश्वराच्या सन्निध राहून त्याची एक निष्ट सेवा करावी, हाच एक शेवटचा मार्ग.

शांति : शांतिः !

---

१. रवेर्मयूरवैरभितापिती भृशम् । - ऋतुसंहार
२. विप्रोणित कुमारं तद्राज्यमस्तमितेश्वरम् । - रघुवंश
३. बभुः पिबंतः परमार्थमत्स्याः । पर्याविलानीव नवोदकानि ॥ - रघुवंश.
४. स्वच्छंदोच्छल दच्छ कच्छ कुहरच्छाते तरांबुच्छटाम् । - काव्यप्रकाश.
५. सर्वंतुसम वेक्ष्येदं निखिलं ज्ञान चक्षुषः । - मनुस्मृति.
६. यद्यदाश्चरतिः श्रेष्ठ स्तदेवेमितरे जनः । - भगवद्गीता.
७. सन्मंगलोपचाराणां सैवादि रचनाऽभवेत् । - रघूवंश
८. ननुवज्रिण एव वीर्यमेत द्विजयन्ते द्विषतो यदस्थ पक्ष्याः । - विक्रमोर्वशीय.
९. प्रभावस्तंभितच्छाया माश्रितः सवनस्पतिम् । - रघुवंश
१०. स्नेह व्यक्तिश्चिर विरहजं मुंचतो बाष्पमुष्णम् । - मेघदूत
११. अलंकारान् सर्वानिपिगलितगवीन् रचयतु । - रसगंगाधर.
१२. पुत्रादपि धनभाजां भीतिः सवंत्रषा विहिता रीतिः । - मुद्राराक्षस.
१३. उत्तमं मानुशे जन्मं भारवे तत्र दुर्लभ :। - महाभारत.
१४. समाधिः सुकरं कार्य कारणांतर योगतः। - काव्यप्रकाश.
१५. तेनोज्झति कोपितोऽसो सदानजोयेन विषाणि नाम :। - शिशुपालवध काव्य.

१६. मुग्धे विधेहि मयि निर्दय दंत दंशम् । - गीतगोविंद
१७. वभूव युध्दं तुमुलं जयैषिणो; । - रघुवंश
१८. पापंपापा : कथयतकथं शौर्यराशेः पितुर्मे । - वेणिसंहार
१९. ना पुत्रस्य गतिमेतेति ससुतः स्यादित्थ मुक्त श्रुते ।। - सुश्लोकलाघव.
२०. ऋणमोचनेन दासत्व मभ्युगतः ऋणदारा :।। - मृच्छकटिक.
२१. परिहास विजल्पितं सखे परमार्थेन न गृह्यता वचः। - शाकुंतल
२२. अपूर्वो दृश्यते वन्हिः कामिन्या स्तनमंडले । - उध्दवदृतकाव्य.
२३. आधिव्याधि पराहतो यदिसदा क्षेमं निजं वांछसि । - भामिनीविलास.
२४. माया मनोभ्दाव्य परीक्षितोऽसि । - रघुवंश.
२५. हंस पंक्तिरपि नायसंप्रति। प्रस्थिता वियति मानसप्रति। - काव्यप्रकाश
२६. यत् काव्यं मधुवर्षि धर्पित परास्तर्केषु यस्योक्तयः । - नैषध चरित्र.
२७. सतांहि संदेहपदेषु वस्तुषु, प्रमाण मंतःकरण प्रवृत्तयः। - शाकुंतल
२८. निसर्ग भिन्नास्पद मेकसंस्थं । - रघुवंश
२९. भवंतिमाया विषुयेनमायिन :। - किरातार्जुनीस.

■■

सर्ग १ वा

साकी

विश्वतरूचें मूल बीज[1] ज्या शिपिति नवविधा भक्ती ।
धर्मनीतिच्या शाखा पसरूनि देवो सुजना मुक्ती ॥
भवभय दुःखाला । नाशूनि तारो जगताला ॥१॥

कोत्सा ! तुझ्या सांगण्याने माझा बराच घोटाळा उडाला, कोणतीहि गोष्ट कथन करणे म्हणजे ती साद्यंत, सविस्तर असली पाहिजे; नपेक्षा, मध्येच भाव तोडलेल्या ऋच्यांप्रमाणे अर्थाचा अनर्थ व्हावयाचा .

काश्यप ! हेंच ते, वृ म्हणतांच सारें वृत्त लक्षांत[2] यावे, यालाच तैलबुध्दि म्हणतात. काष्टबुध्दि चर्मबुध्दी यांची व्याख्या जाणतोस ना?

कोत्सा ! तुझ्यासारखे तैलबुध्दि लक्षांत नव्हे कोट्यावधींतदेखील सांपडणें कठीण. पण, तैलापेक्षा, काष्टांचा, चर्मांचा उपयोग जगांत होत असतो तैलबुध्दिपेक्षां, काष्ट, चर्मबुध्दि नव्हे पाषाणबुध्दि यांची वृध्दि जगांत भारीच होत असते.

बरें तर, काश्यप ! विचार, तुला पाहिजे ते विचार.

कोत्सा ! त्वां सांगितलें, दधीचि मुनीच्या आश्रमांत, त्याच्या सारस्वत नामक पुत्राचा उपनयन[3] संस्कार आहे म्हणून; तेव्हा सहजच असा प्रश्न निघतो की दधीचिमुनि हा कोठला? कोण?

या प्रश्नाला उत्तर देण्यास बृहस्पतीचा चुलताच भेटला पाहिजे. काश्यप ! सूर्य कोंठे असतो, चंद्र म्हणतात तो कसा? अशा प्रश्नाला कोण उत्तर देईल ! त्याला सर्व जग ओळखत आहे, आपल्या पातंजल[4] मुनीच्या तोडांत ज्याचे नांव नित्यशः घोळत असते, तो दधीचिमुनि कोठला कोण म्हणून विचारणे म्हणजे, सरस्वती नदी ही स्वर्गावर वहाते का पाताळांत असते, अशाच प्रकारचे आहे.

कोत्सा ! तूं पडला नैय्यायिक आणि बोलणे अन्यायिक; सरस्वती नदीच्या तीरावर वास करणारा दधीचिमुनि, मला ऐकून माहीत आहे; त्यांचे अत्युत्तम गुरुकुल,त्याचे उग्र तपाचरण, त्याचे स्मरण पातंजल मुनि नित्यश; करित आहेत, तो जात्या हठयोगी, जवळ जवळ ऊर्ध्वरिता[5] हेहि मी ऐकले आहे. त्यांच्याच पुत्राचा

ाततबंध का म्हणून विचारल्यास तू मला पाषाणबुध्दि म्हणून हांसणार होता. माझ्या मते दधीचि नांवांचा आणखी एखादा ऋषि असेल, आणि त्याचा सारस्वत नावाचा पुत्र असेल, विशेषनामाला का समास पाहिजे?

काश्यप ! यात तुला आश्चर्य असे काय दिसले? सरस्वती तीरावर वास करणारा दधीचिमुनि याचा पुत्र सारस्वत, याचा व्रतबंध उद्या मीन लग्नावर, तेव्हां तुम्हा सर्वांसि बरोबर घेऊन येण्यास पातंजलमुनीस आमंत्रण पत्रिका आली आहे. हे पहा त्यांचे पत्र.

कोत्सा ! आमंत्रणपत्रिकेबद्दल[६] का माझा प्रश्न आहे? आणि आम्हां ब्राह्मणांस का आमंत्रण पाहिजे? आम्हांस सर्वत्र मुक्तद्वार, ब्राह्मणांचे सहज दर्शन झाल्यास लोक वंदन करून पावन होतात; ब्राह्मणांचे चरणांत सर्व तीर्थें वेंगाळून असतात. हें सर्व लोक मानतात, ''सागरे सर्व तीर्थानि पदे विप्रस्य दक्षणे'' हा शुध्द शास्त्रार्थ. मला काय, मीन लग्न, मेष,मास, सिंहराशी, आश्विनि नक्षत्र, समजण्याचे कारण आहे? व्यतिपात योग असो वा तिथि क्षय असो; त्या दधीचि मुनीचा पुत्र आणि त्याचा व्रतबंध हे ऐकून जरा आश्चर्य वाटले.

कश्यप ! कसचे आश्चर्य? दधीचि मुनीला का पुत्र होऊच नये, आणि त्याला काय सारस्वत हे नाव असूच नये, काय तरी आश्चर्य[७]?

कोत्सा ! आश्चर्य नाही, ब्रह्मचर्यासंबंधी प्रश्न आहे, उद्यां कपिल महामुनीच्या पौत्राचे उपनयन आणि गार्गेयीच्या कन्येचे लग्न म्हणून आमंत्रण आल्यास आमचे नियंत्रण लागणारच. ''ब्राह्मणो भोजन प्रिय: याला निमंत्रण कोठेच नाही. पण एकं सांग, दधीचि मुनीच्या विवाहास आम्हांस नेल्यास, पातंजल मुनीस काय, मोठेच सायास पडणार होते? दुसऱ्याची थट्टा केल्यास आपल्या विद्वत्तेस बट्टा लागत नाही?

काश्यप ! मी, थट्टा करणाऱ्यांचा कट्टा शत्रू आहे. दधीचि मुनीला सरस्वती नदीपासून पुत्र झाला. हे वृत्त तुला माहीत नाही म्हणून मी मानीत नव्हतो.

कोत्सा ! दधीचि मुनीला सरस्वती नदीपासून पुत्र झाला उत्तम सूत्र जुळवलेस. पण एक सांग, सरस्वती नदी ही, त्या मुनीची धर्मपत्नि का पण्यांगना[८]? नदीला तसा कांही प्रतिबंध नाही असा शास्त्रसिध्दांत आहे; ब्राह्मण, शूद्र, अतिशूद्र यानी कोणीहि स्नान केले तरी, नदीहि पावन आणि तेहि परमपावन. आणि एक सांग,

सरस्वती, गरोदर कधी झाली? गर्भवतीस स्पर्श करू नये असा शास्त्रार्थ, तर तिच्या तीरावर राहणाऱ्या ऋषींनी स्नानपान कोठे केले? एकावर एक प्रश्न वाढणार आणि उत्तरे देण्यास आपण चिडणार. लग्नहोमानंतर गर्भाधान[९] होम झालाच पाहिजे.

काश्यप ! सरस्वती गर्भवती झाली म्हणणाऱ्यांची मति, अतिशयच मंदगति म्हटली पाहिजे.

कोत्स! पवनगतीचे मतिमंत विद्वान असे प्रतिपादन करतात की, सृष्टिजीवनाचा नियम, यमधर्माच्यानेही उल्लंघन करवत नाही, तर सरस्वती गर्भवती झाल्यावाचून पुत्रवती झाल्याची उपपत्ति[१०] कशी लागेल.

काश्यप आपण वेदपाठांतच थाटत आहां, पुराणग्रंथांवर नजर फेकल्यास या गोष्टीचा सारांश काढण्यास थोडाच आयास पडणार होता.

कोत्सा ! पुराणग्रंथाची थोडीशी माहिती मला आहे; समुद्रांतून लक्ष्मीचे आणि पर्वतापासून पार्वतीचे जनन झाले, हे कथन करण्यास नको आहे, पण अमक्या ऋषीपासून हे नेमक्या शब्दांनी सांगणे हे जरा आश्चर्यवाणे दिसते खरे.

काश्यप ! दधीचि ऋषीचे वीर्य सरस्वती नदीत पतन पावले आणि त्यापासून सारस्वत नामक पुत्राचे जनन[११] झाले, यांत मोठेसे मनन करण्यासारखें काहीच नाही.

हं ! अगदी मनन करण्यासारखे कांहीच नाही. केवळ वीर्य पतनापासून पुत्र जनन होते. येथे निसर्गदेवतेचे अध:पतन[१२] होते. हे मात्र निजध्यासन करण्यासारखें आहे. महादेव शंकराचे नंदन त्याच्या वदनांपेक्षां नव्हे त्याच्या नयनांपेक्षा अधिकच झाले असतील तर, मानवांची कल्पनासृष्टी, परमेष्टीच्या अदृष्टीं नाहीं, असें म्हणतात, हे दृष्टीभूत आहे.

काश्यप ! मी अमृत भाषण कधीच करणार नाही.

कोत्स ! अमृत आणि असंगत, असें भाषण करण्याचें नव्हे म्हणण्याचेहि कारण नाही. सृष्टीचा नियमभंग, आणि निसर्गाचा अधोरंग यांत व्यंग तर अगदीच नाही.

काश्यप ! सृष्टिनियमाविरूध्द गोष्टींचा, पुराणांत पुरावा आहे.

कोत्स ! पुराणांत पुरावे आणि आकाशांत देखावे, जितके पहावे तितके मिळतील. पुंकेंसर आणि स्त्रीकेंसर याचे संमेलन झाल्यावाचून फळपुष्पांचेहि जनन होत नसते असे म्हणतात.

काश्यप ! ब्राह्मणांनी पुराणग्रंथांवर अविश्वास ठेवल्यास विश्वाचे श्वासोच्छ्वासच बंद पडतील. अमोघ वियाचे[१३] प्रभाव आश्चर्यभावच असतात. नासिकेत ऋषीचा जन्मवृत्तांत आपल्या लक्षांत नाही असे म्हटल्यास आपल्या डोळ्यास लाली येणार.

कोत्स ! नासिकेत ऋषीची साधारण माहिती मला आहे,त्याच्या यमलोकचा प्रवास सर्वांस ठाऊक आहे; परंतु या गोष्टीत त्याचा संबंध लावणे असंबध्दच होणार. नासिकेत ऋषीची जननी, मानवपत्नीच होती. ती गर्भवती झाली मग प्रसूति झाली, सृष्टिनियमाची च्युति यांत दिसली नाही. अंतर इतकेच, एका ऋषीचे वीर्य पुष्पसुवासासर से तिच्या नाकांत शिरले, गर्भाशयांत त्याचा प्रवेश झाला. आतां.....

काश्यप ! तुझे म्हणणे बरोबर आहे.

कोत्स ! तुझेहि सांगणे खरोखर आहे. आतां येथे सत्यसरोवर निर्माण झाले पाहिजे. बरे ते असो. आपल्या त्या सरस्वतीच्या पुत्रोत्पत्तीची सरळ व्युत्पत्ति लावून सांग पाहू !

बरें तर. काश्यप ! सत्य साद्यन्त सांगतो. सरस्वती नदीच्या तीरावर, उग्र तपोनिधि दधीचि मुनि.....

कोत्सा ! पुनः पुनः एकच. दधीचि मुनि म्हटला की समजले, स्वर्गावर वास करणारा इंद्र आणि त्याची पत्नी शची असे सांगणे म्हणजे आपले वक्तृत्व दाखवणे असेच आहे.

काश्यप ! कोणतेहिं वृत्त कथन करण्यास आरंभापासूनच निवेदन करावे लागते. साद्यंत, सविस्तर वृत्तांत[१४], चित्तांत सारखा भरला पाहिजे की नाही?

हो, बरे तर, कोत्स ! साद्यंत, सविस्तर, सुसंगत कथन कर.

काश्यप ! सुसंगत म्हणजे ? माझ्या सांगण्यात विसंगतपणा असणार नाही.

चालू दे तर, कोत्स ! सरस्वती तीरावर दधीचि मुनि, मग पुढे.....

काश्यप ! त्या दधीचि मुनीच्या उग्र तपोतेजाने इंद्राचे सिंहासन डळमळू लागले.

कोत्स ! शाबास, उग्र तपाचे तेज स्वर्गावर उसळलें. भारी सरस; म्हणजे ग्रहमंडळ भेदून, सूर्यमंडळ ओलांडून वरती गेले, बरें पुढे.....

वक्त्याच्या सांगण्यावर विश्वास[१५] न धरणारा श्रोता, पातकाचा भोक्ताच म्हणावा लागतो. काश्यप ! मग देवेंद्राने.....

हं, हं, आले लक्षांत, महेंद्राने, त्याचा तपोभंग करण्यास, मेनका अप्सरा....

काश्यप ! उतावळेपणा शहाणपणाला दूषणास्पद आहे; मग त्याने अलंबुषेला भूलोकावर पाठवली.....

कोत्स ! नवीनच नटी आली तर रंगभूमीवर, नवनवलात, नयनोत्साह असतोच; मेनका, उर्वशी झाल्या वाटतें वृध्दानारी पतिव्रता, बरें चालू दे, महेंद्राचे सिंहासन डळमळूं लागले म्हणजे इंद्रपद हालूं लागले; पुढे चालू दे....अप्सरांचे नृत्य बंद उरलें ना?

काश्यप ! श्रेष्ठांचे गुणवर्णन कनिष्टांनी करावें हा स्पष्ट शास्त्रार्थ आहे.

हो, हो, कोत्स ! श्रेष्ठ शब्दाचा विग्रह कसा लावतात? श्री म्हणजे लक्ष्मी, हिचे इष्ट, ते श्रेष्ठ, असेंच ना? बरें चालूं दे पुढे.

काश्यप ! मग त्या अलंबुषेच्या स्वरूप लावण्यास भुलून.....

काय, कोत्स ! दधीचि मुनीनें पाणिग्रहण[१६] केले? गंधर्व विधिने का ब्राह्मविधीने? पण यांत सरस्वतीचा काय संबंध ?

काश्यप ! श्रोता सावधान नसला म्हणजे वक्त्यांचे अवधान चुकत असते; मग सांगण्यांत समाधान तरी उरतें कसें? स्वस्थ ऐक. त्या अलंबुषेचे रूपलावण्य पाहून दधीचि मुनीचे वीर्य, सरस्वती नदीत पतन पावले. आणि त्यापासून सारस्वत नामक पुत्राचा प्रसव झाला.

कोत्सा ! भारी सरस, अलंबुषेच्या रूपयौवनास[१७] पाहून दधीचि मुनीचे वीर्यपतन, आणि सरस्वती नदीत पुत्राचे जनन, हें कथन तर सुज्ञ लोकांचे मनरंजनच करील; पण एक सांग, आपली ती अलंबुषा, आणि सरस्वती नदी यांचा संबंध कोठे?

काश्यप ! अलंबुषा अप्सरा सरस्वती नदींत जलक्रीडा[१८] करताना दधीची मुनीच्या दृष्टीत पडल्या.

कोत्स ! आतां मात्र जुळलें खरें. सरस्वती नदींत पुत्र जन्मास आला म्हणून सारस्वत नाम पावला; बरे, एक सांग, मोहिनी देवीस पाहून महादेव शंकराचे वीर्यपतन झाले, अशी कथा आहे ना, मग त्याचे पुत्र का कन्या निपजल्या? तसे नाहीं असणार, त्याचें वीर्य पृथ्वीवर पतन पावलें तें जर भागीरथींत पडलें असतें तर भागीरथ नावांचे पुत्र जन्मास आले असते. जल वीर्य संमीलन यांत गर्भोत्पादन शक्तीचे चालन असते. मनुष्याच्या रक्तांतहि जलतत्वच असते, यांत निसर्गाचा वादविवाद बंद झाला.....मग पुढे.

काश्यप जरा स्वस्थ ऐक. मग सरस्वतींने त्या पुत्रास आणून दधीचि मुनीस भेटवला.....

हं,हं, कोत्स ! अलंबुषेच्या अंगसंगावाचून मुनीचा तपोभंग, यांत कांहीच व्यंग नाही, केवळ वीर्यपतनापासून नदीत पुत्राचे जनन, हेहि मनन करण्याचेंच, आणि त्यावर प्रत्यक्ष सरस्वतीचे दर्शन, मग..... बरें एक सांग, ती सरस्वती मनुष्यरूपाने आली ती मयुरावर बसून आली, का भरजरी पीतांबर[१९] नेसून आली; काय सारखें तरी लावून सांग; सुज्ञाचे सांगणे, अज्ञ लोकांचे ऐकणे, यांत आश्चर्य मानणे, मूर्खांत गणणे, आणखी काय?

काश्यप ! इतका वाद[२०] कशाला, सर्वांत चक्षूर्वै सत्यं असे आहे की नाही, प्रत्यक्ष गोष्टीला प्रमाणाची गरज नाही, उद्यां त्या पुत्राचा उपनयन संस्कार, सर्व ऋषींचा सत्कार होणार आहे, आम्ही तो चमत्कार पाहूं, यांत वादविस्तार तो कशाकरतां ?

कोत्स ! भारीच चमत्कार, पण हें वृत्त तुला कसे कळले?

काश्यप ! प्रसिध्द गोष्टी, सृष्टीवर सहजच प्रगट होतात. सारस्वताचे मस्तक, दधीचि मुनीनीं अवघ्राण[२१] केलें तेव्हा गगनांतून पुष्पवृष्टि झाली, स्वर्गावर दुंदुभी वाजू लागल्या, या गोष्टी सर्वश्रुत आहेत, यांत अद्भुत असे काहीच नाही.

कोत्स ! सर्वश्रुत गोष्टींत अद्भुत, असंगत असें काहींच असत नसते; केवळ वीर्यपतनापासून नदींत पुत्राची उत्पत्ति, सरस्वती मनुष्य रूपवती, या कीर्ति दुंदुभी[२२] स्वर्गावर वाजतीलंच, निसर्गदेवी मात्र अधोगति पावणार, इतकेच.

काश्यप ! निसर्गाच्या नियमाविरूध्द घडलेल्या कथा आपल्या श्रवण-पथांत गेल्या नसतील. इंद्राचें आणि सूर्याचें वीर्य एका वानरीच्या मस्तकावर पडल्याने वाली आणि सुग्रीव या नावांचे बलाढ्य वानर जन्मास आले. या गोष्टीस थोडेच तप गेले आहेत.

कोत्स ! थोडेच तप नाहीत. तपस्वी ऋषींनी जप करतांना या गोष्टी लक्षांत आणल्या पाहिजेत. पुराणांवर[२३] विश्वास न ठेवल्यास विश्वच विराम पावेल हें खरें. सागर मनुष्यरूपाने येऊन भार्गवरामास आश्रमास स्थान देतो; पृथ्वी गाईच्या रूपाने स्वर्गावर गमन करते, हिमालय पर्वताचा पुत्र, मैनाक धनुष्य घेऊन रंणांगण नाचवतो, पण नदी मात्र पुत्रवती झाल्याची कीर्ति श्रुतींत आली नव्हती. पुराणें ! पुराणे !

काश्यप ! पुराणग्रंथांवर मात्र आपला कटाक्ष, वेदग्रंथात सारें निसर्ग नियमबध्द? पृथ्वी, उषा, या देवता, सूर्यनारायणाबरोबर सोमरसाच्या[२४] मेजवानींत भाग घेतात. हे सुसंबध्द-स्त्रियांची मर्यादा, वेदांनी बरीच रक्षण केली आहे -

''दिवा पृथिव्या: उषसा सूर्येणच सोमं पिबंतम।'' ऋ.मं.८-३५

कोत्सा ! वेदग्रंथातील काव्यवाङ्मयाचा अर्थ, आपल्यासारखे ज्ञानी पुरूष असाच करतात ना? काव्यग्रंथ[२५] आणि इतिहासग्रंथ[२६] यांचे पंथ निराळेच असतात. काय निसर्ग ! काय स्वर्ग ! आणि काय परमेश्वर !

काश्यप ! आता वादविवाद कशाला, हे पहा आपले सहाध्यायी येऊ लागले. पण काश्यप, निसर्ग हाच परमेश्वर हे मात्र पूर्ण लक्षांत ठेव.

हो! बरें तर -

साकी

शान्त किरण तम हरण तप न हा उतरे सागर जिवनी ।
उग्र तपा तापुनी जाहली, श्रमिता, शुचिता अवनी ॥
आतां चल जाऊं । मुनीचे सुत कौतुक पाहू ॥१॥

१. अंतगूढ क्षितिरिव नभोवीजसूष्टि दधानां । - रघुवंश
२. किं लक्ष्य सुसमुत परमार्थं सुसमिदं द्वयन । - मृच्छकटिक.
३. आसमावर्तनाकुर्यात् कृतोपनयनोद्विज । - मनुस्मृति
४. पातंजले महाभाष्ये कृतः भूरि परिश्रम । - योगसुत्र.
५. त्वत्तात ऊर्ध्वरेता, झाली कन्या तया कशी सांग । - मोरोपंत
६. अन्योन्यामन्त्रणेयस्याञ्जनांते तञ्जनांतिकम् । - साहित्यदर्पण.
७. किमाश्चर्य क्षारदेशे प्राणदा यम दूतिकः। - उध्दवदूत.
८. पण्य स्त्रीषु विवेक कल्प लतिका शस्त्रीषुरज्येतकः - मेघदूत
९. गर्भाधानक्षण परिचया न्नूनमा बद्धमाला - मेघदूत
१०. उपपत्तिरुद्धाहृदा बलात - किरातार्जुनीय
११. यदैव पूर्वं जनने शरीरं सादक्षरोषात सुदती सर्सज - कुमारसंभव
१२. निसर्ग भिन्नास्पदमेक संस्थम् । - रघुवंश
१३. अतिवीर्यवतीव भेषजे बहुरल्पियसि दृश्यते गुणः। - किरातार्जुनीय
१४. वृत्तांतेन श्रवणविषय प्रापिणांतेन । - रघुवंश
१५. विश्वासोपगमादभिन्नगतयाः शब्दं सहंते मृगाः। - शाकुंतल
१६. वाल्ये पितुर्वशेतिष्टेत् पाणिग्रा हस्य यौवने । - मालविकाग्निमित्र.
१७. निवेशयन्ते प्रमदाः सयौवनाः। - ऋतुसंहार.
१८. तोयक्रीडा निरय युवति स्नान तिक्तैर्मरूम्भिः। - मेघदूत.
१९. पश्यति पित्तोपिहताशशि शुभ्रं शंखमपिपीतं । - काव्यप्रकाश
२०. अवाच्य वादांश्च बहूत्वदिष्यंति तवाहिताः। - भगवद्गीता.
२१. अथप्रोष्या ऽ ऽ यन्पुत्रस्य मूर्धानमभि भृशेत् । - कौषितक् उषनिषद.
२२. दुंदुभिस्ताडितोऽयम् । - रघुवंश
२३. सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशोमन्वंतराणिच।
वंशानुचरितं चैव पुराणं पंच लक्षणम् । - महाभारत.
२४. तत्रकेचित्सोमपीथिन् उदुंबर नामानौ। - मालतिमाधव.
२५. रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम् । - जगन्नाथ पंडित.
२६. पूर्ववृत्तं कथायुक्त मितिहासं प्रचक्षते । - काव्यप्रकाश

■■

सर्ग १० वा

आर्या (भीति)

अंधारी दीप तसा दावी जगतास चालण्या धर्म ।
विश्वेश्वर तो देओ, सकलां सद् बुध्दिमार्ग सत्कर्म ॥१॥

महातपोनिधि[1] दधीचि मुनींचे अमोघ वीर्य, सरस्वती नदींत पतन पावले, त्यापासून तेजोमान् सारस्वत नामक पुत्राचा प्रसव झाला सरस्वतीने त्यास आणून त्या मुनीच्या पायावर घातला, सर्व वृत्त श्रवण करून दधीचि मुनीचें मन प्रसन्न झाले, त्यांनी सारस्वताचे मस्तक अवघ्राण केले, त्या वेळी साऱ्या तपोवनांत, आनंदाचे नंदनवन भासूं लागले. पशु, पक्षी, मच्छ,कच्छ याचे तर मनमोहन करणारें प्रदर्शन शोभूं लागलें, उपनयन संस्कार झाला, तेव्हा स्वाहा स्वधाकार, साकार रूपाने घोळू लागले, सरस्वतीच्या तीरावर ऋषींचा प्रचंड समुदाय लोटला, त्यांच्या आशीर्वादाने दाही दिशा दुमदुमून गेल्या, स्वर्गस्थ देवतांनी पुष्पवृष्टि केली, तेव्हा सृष्टीचा भाग आनंदसागरांत ओथंबू लागला ! गगनप्रदेश विमानानी[2] भरलेला तारकापुंजच भासूं लागला; दधीचि मुनीच्या उपदेशांत श्रुति, स्मृति, मूर्तिमंत खेळू लागल्या,सरस्वती नदीला आनंदाची भरती चढतीच होऊं लागली. झाले -

साकी

दधीचि मुनिनें देवऋषींच्या विनयाला लक्ष्योनी ।
स्वर्गारोहण केलें नियमें ऋणत्रया फेडोनी ।
गाती जन कीर्ती । रमली आनंदे जगती ॥१॥

परंतु -

दिंडी

रवीमागुनि पसरतो अंधकार । सुखामागुनि[3] करि दुःख जगिं प्रसार ॥
जना येते वार्धक्य यौवनान्तीं । विश्वकर्त्याची ही सतत रीती ॥१॥

सरस्वतीच्या भूप्रदेशात, मेघराजाची दृष्टि उग्र होऊन अनावृष्टि झाल्याने सृष्टिदेवी महान् कष्टी भासूं लागली. दुष्काळ कालाचें विक्राळ स्वरूप पाहून

लोकांचा हुरूप होरपळून गेला; धान्योत्पत्तीचा नाश झाल्याने जनमनोवृत्तीचा आशातंतु तुटून गेला; जलाशय कोरडे पडले, मच्छकच्छ फडफडले, लतावल्लरी[४] कोमेजून गेल्या, दाहीदिशा भयंकर भासूं लागल्या धर्मकर्म लोपून गेले, श्रूतिस्मृतीची विस्मृति पडली. अशा वेळी, सरस्वती तीरावर महान् तेजोमान् एक ऋषिपुत्र संध्यावदनास बसलेला दिंसू लागला; तो आपल्याशीच बोलूं लागला; - आतां कसे करावे, परमेष्टीच्या क्रूर दृष्टीने अनावृष्टि होऊन, सृष्टिदेवि महान् कष्टी भासू लागली, दुष्काळ कालाने घाला घालून जगताचा घात केला; जीवजंतूंचे जीवन तर जलाशयानी सोडून दिले, लतावेलींना अंतसमयाच्या अक्षता मिळाल्या, वातावरण क्षुब्ध झाल्याने, प्रबुध्द शास्त्रवेत्ते क्षुधाबध्द झाले, धर्ममार्गाने चालणारा ब्राह्मणवर्ग स्वर्गवासाची इच्छा करू लागला. स्नानसंध्याचरण तर संध्याकाळच्या अंधाराप्रमाणे अंधुक अंध भासूं लागले, आर्यधर्माचे देहावसान झाल्यावर कर्ममार्गाने सहगमन करणे सहजच भाग पडले, श्रूतिस्मृतिची विस्मृति पडत गेली, नीतिची भीति सुटली, भक्तीची आसक्ति फिटली, आतां कसे करावे -

पद (मम सुत भरत)

बाळें उपवासें रडती । माता शोकें गहिवरती ॥
पर्तीना नारी शिणवीती । घेरी येउनि किति पडती ॥
आधिव्याधि जडलि चित्तीं । न सुचे मुळींच सद्युक्ती ॥
सुज्ञहि झाले भ्रंशमती ॥१॥

हाय ! हाय ! वेदवेत्ते ब्राह्मण, देवधर्म सोडून देशांतर करू लागले, यज्ञ[५] यागादि क्रिया बंद पडून देहविक्रयाची इच्छा प्रादुर्भूत झाली; भूदेव म्हणणारे ब्राह्मण, सेवा करण्यास सरसावले. आहाराचे साधन नसल्याने संसाराचे व्यवहार निराधार होऊन बसले. प्रपंचाची वंचना झाल्याने याचनेची[६] यातना अनावर झाली, गाईना चारा न मिळाल्याने दुधाच्या धारा बुझून गेल्या, तान्ही पाडसे घसे कोरडे पडून, उसासे टाकून पटापट प्राण सोडूं लागली, हाय ! दात्यांची घरे दारिद्र्याने भरून गेली, वाण्याच्या घरांत दाणा नसल्याने प्राण हैराण होऊ लागले. आतां कसे करावे? परमेश्वरा! हलाहाल[७] विषाचे दाह सहन करवतील पण माझ्या देशबांधवांचे हाल माझ्याने सहन करवणार नाहीत. आता, एकच उपाय, माते जननी !

पद (धाव धाव पीव)

देई तव उदरिं ठाव श्रीसरस्वती ।
दुष्काळें जन पिडती । उपवासें हळहळती।
प्राणाची नच प्रीती। किमपी मजप्रती ॥१॥
बंधुजनांं[८] बघुनि त्रास। शांतीचा होय ऱ्हास।
दिसतो कीं जिव उदास । भ्रमत मन्मती ॥२॥

हं ! हं ! हं ! बाळा ! काय हे साहस[९] आरंभलेस, मानव जन्म भारी दुर्लभ, त्यांत ब्राह्मण; लोकवंद्य दधीचि मुनीपासून तुझा जन्म; तुझ्या पासून वेदरक्षण, धर्मशिक्षण होणार हे ऋषींचे भाकित, आणि तू प्राणत्यागासारखे महापातक पदरी बांधतोस का?

माते जननी ! आत्महत्या[१०] महापातक, मोक्षाला विघातक, हे मला पूर्ण ज्ञान आहे; पण काय करू? माझ्या देशबांधवांचे, धर्मबांधवांचे हाल, मला हालाहल विषाप्रमाणे हाय हाय करण्यासं लावीत आहेत. देवी ! तूंच ना पाहतेस -

साकी

मेघ न वर्षे उग्र जाहला जनक यमाचा तरणी ।
काळासम हा दुष्काळचि का दुर्घट ईश्वर करणी ॥
हळहळ ही वाटे । दुःखानल हा मनि पेटे ॥१॥

मातोश्री ! काय सांगू ? ही पर्वताची ओळ फळपुष्पांनी मंडित, लता-वृक्षांनी विभूषित, हिरवी शालजोडी पांघरलेल्या ऋषीप्रमाणे शोभाव याची, ती दावाग्नीने होरपळलेल्या स्मशानभूमिप्रमाणे रखरखीत भासत आहे; आणि पहा :-

साकी

अभंग जीवनमंडित असती तलाव सुंदर कमलें ।
गुंजारव भ्रमरांचे झाले अस्तंगत हे सगळे ॥
मुंग्या ह्या चलती । दुर्बल, मकर मीन तडफडती ॥१॥

आणि पहा :-

साकी

दीन दशा ही होय जनांची ठाव न धर्मा उरला ।
कर्ममार्ग तो लुप्त पाहुनी मदिय जीव हुरहुरला ॥
आशा जीवाची । नुरली पूर्ण मला साची ॥१॥

बाळा ! सारें खरे, जगन्नियंत्याच्या इच्छेप्रमाणे अशा गोष्टी कधीं कधीं घडत असतात, त्याबद्दल खेद मानणे, हताश होणे हें पुरुषार्थाचें[११] लक्षण नाहीं ! तुझ्यासारखे स्थितप्रज्ञ[१२], अशा परमेश्वरी आपत्तीचें दुःख मानीत नाहींत, सुज्ञ लोक पुढल्या आशेवर संकटावस्थेत धीर धरतात;

जननी ! पृथ्वीवर असे दुष्काळ पडत असतातच तर, मग याला कांही उपाय, शोध नाहींच काय?

बाळा !

दिंडी

अश्वमेधासम[१३] यज्ञ करुनि पाहीं । पृथ्विपति ते पाडिती मेघ कांही ॥
म्हणति यज्ञा पासोनि घनोत्पत्ती । जलापासुनिं हे अवनि धान्यदाती ॥१॥

बाळा ! आतां धीर धरून, लोककल्याणाकरतां पर्जन्योत्पादक यज्ञ कर.

जननी ! माझ्या हातून यज्ञ कसा होईल? यज्ञयाग पृथ्वीपतीच्या आश्रयानेंच व्हावयाचे.

बाळा ! सर्व यज्ञांत जपयज्ञ श्रेष्ठ आहे, म्हणून जपयज्ञात्द्विजातयः' असे श्रेष्ठ स्मृतिकारांचे मत आहे.

मातोश्री ! तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे. पण, जननी ! अन्नावाचून माझे प्राण कसे वाचतील?

बाळा ! भिऊ नकोस:

साकी

आणुनि देतें एक एक तुज मच्छ[१४] नित्य भक्षाया ।
यज्ञकर्म तूं आचरी नियमें विहित धर्म रक्षाया ॥१॥
जननी ! काय, काय तुझा हा मला उपदेश !

पद (मज बोध करी)

ब्राह्मण मी ऋषिकुमार लोक वानिती ।
धर्मविहित कर्म कसें आचरूं क्षिति ।
पाप महा जिवहिंसा[१५] बोलती श्रुती ।
प्राणान्ती नच सोडिन शास्त्रसंगती ॥१॥

बाळ ! धर्माची गति भारी सूक्ष्म आहे, हिंसा अहिंसा यांचे ज्ञान वृध्दोपासना स्वानुभव यापासून प्राप्त झाले पाहिजे, जीवांचे जीवन जीवांवरच अवलंबून आहे. ''जीवोजीवस्य जीवन:'' असे सुज्ञ शास्त्र कारांचे मत आहे.....

मातोश्री ! तू कांही माझे मन पाहण्याकरतांच असा उपदेश[१६] करीत आहेस. तूं कितीही सांगितले तरी माझ्याकडून हिंसाकर्म प्राणान्तीहि घडणार नाही; ब्राह्मणधर्म म्हणजे मुख्य अहिंसा[१७] तो सोडल्यास पतित ब्राह्मणांच्या पंक्तीस तरी मी बसेन का ग? जननी ! सत्य सांगतों. मला देहाची मुळींच माया नाही. जीविताची आशा नाही. मरणाची पर्वा नाहीं; पण तुझ्या आज्ञेप्रमाणे, केवळ लोककल्याणाकरतां, धर्म संभाळण्याकरतां, देहरक्षणाकरतां, यज्ञकर्म करीत राहीन; पण हिंसेसारखे महत्पाप माझे श्रवणदेखील ऐकणार नाहींत मातोश्री ! मरणापेक्षा अपकीर्ति मला भारीच जाचक आहे.

बाळ ! शाबास, अपकीर्तिपेक्षा, संभावित लोकांस मरणच पुरवते, हे तुझे वाक्य मला भारीच आवडत आहे,

''संभावितस्यचा कीर्तिर्मरणादतरिच्यते''

असें सुज्ञ जनाचें मत आहे, पण या गोष्टींत तुझी अपकीर्ती होणार नसून सत्कीर्तीच गाजून राहिल.

'जननी ! अधर्माचरणांत सत्कीर्ति कशी ग राहील?'

'बाळा ! तसे नाही, धर्मशास्त्रांत आपध्दर्म, विपध्दर्म यांची बरीच व्याख्या केलेली आहे, आणि सर्व शास्त्रांत':-

''जीवितं मरणात्श्रेयो जीवन्धर्म मवाप्नुयात् !''

असा सिध्दांत प्रतिपादन केला आहे.

जननी ! त्वां कितीहि सांगितले तरी, खरे ब्राह्मण प्राणान्तीहि हिंसा कर्म करणार नाहींत.

बाळ ! अशाच दुष्काळासारख्या घोर प्रसंगी, विश्वामित्र, अजिगर्त, वामदेव या महानुभाव ऋषींनी पशुमांस भक्षण करून वेदरक्षण केलेले पुराणग्रंथांत आहे, माझा उपदेश, तुझ्या देशबंधूच्या हिताकरिता आहे, केवळ रसनेच्या[१८] गोडीकरतां तू मच्छ भक्षण करणार नाहीस, धर्मरक्षणार्थ हिंसाकर्म केल्यास तुला किमपीच दोष लागणार नाही, आणि ''सर्व लोक हितेरत:[१९]'' अशी तुझी अखंड कीर्ति साऱ्या भारत खंडात गाजून राहील.

मातोश्री ! अशा यज्ञकर्माने दुष्काळाचा नाश होईल ना?

बाळ ! अगदी यथार्थ, थोड्याच काळांत, यथाकाल मेघवृष्टि होऊन सर्व सृष्टि पूर्वस्मृतिपद होईल.

जननी ! आपल्या आज्ञेबाहेर माझ्याने जाववत नाही. पण.....हाय ! भयंकर संकट माझ्याने सांगवलेच नाही.

बाळ ! आणखी काय संकट ? आपल्या जपयज्ञाने पुनश्च धर्माचे संस्थापन होईल, सृष्टि समृध्द होईल, यज्ञकर्मे चालू होतील, आणखी काय पाहिजे ?

जननी ! या भयंकर दुष्काळाच्या काळांत, दस्यु[२०], यवन, म्लेंच्छ[२१], या लोकांनी पुष्कळ लोकांस आपल्या धर्मांत ओढले; केवळ प्राणाच्या आशेने, जिव्हेच्या लालसेने आपल्या आर्य लोकांनी धर्मांतर केलं, आणि असाच क्रम चालल्यास, सनातन धर्माचे नावच या जगात राहणार नाही. मग वेदांचे स्मरण तरी कोणास होईल?

बाळ ! यवन लोक भारी पापिष्ट आणि मूर्खच तर.....

मातोश्री ! या म्लेंच्छ, यवन लोकांनी, किती ग आर्य स्त्रियांवर बलात्कार केला, आर्य देवालयांचा विध्वंस केला, मूर्तिभंग केला, अभक्ष भक्षण करण्यास लावले ? आणि आतां या दुष्काळाच्या काळांत त्यांना भारीच फावले जननी ! काय सांगू, हेच आर्य ब्राह्मण, धर्मांतर केल्यावर म्लेंच्छ धर्माभिमानी होतात, आणि आर्य लोकांचा आपल्या बांधवांचा छळ करतात. आपण होऊन इतर लोकांस धर्मांतर करण्यास लावतात. याला काहींच उपाय असणार नाही?

बाळा ! अगदी भिऊ नकोस, सर्व स्थिरस्थावर झाल्यावर, परधर्मात गेलेले लोक पुन: आर्यधर्मात मीलन होतील, धर्मवृध्दि करतील.

जननी ! परधर्मात गेलेले परत आर्य धर्मात कसे ग येतील? मेलेला मनुष्य अमृत संजिवनीने जिवंत होईल, पण धर्मबाह्य झालेला अभक्ष भक्षण केलेला, आर्य धर्मात परत येणे म्हणजे गंगेचा ओघ फिरून शंकराच्या जटेत[२२] वर चढण्याइतके आहे, असें म्हणतात ना?

बाळ ! अगदी चिंता करू नकोस, पतितपरावर्तन, धर्मशास्त्र शुध्द आहे, आर्य लोक बुध्दिमान आहेत, प्रत्येक दोषास प्राय:श्चित हे आहेच, याबद्दल पुराणांत पुष्कळ पुरावे आहेत, याचा उलगडा मी यथाकाळी करून देईन.

जननी ! पतित परावर्तनाबद्दल पुराणांना पुरावा आहे ना?

बाळ ! अगदी यथार्थ[२३] आतां तू माझ्या उपदेशाप्रमाणे वागलास म्हणजे सर्व देशांत शांतता नांदून तू आनंदात राहशील, हा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.

अहाहा ! जननी सरस्वतीच्या पुण्यकारक दर्शनाने माझा आत्मा किती प्रसन्न झाला हे सांगता येइना - आतां -

पद (झंपा)

नमो भास्करा शुभकरा विप्राणा । दैन्यतमनाशना पाप शमना ॥१॥
वर्षुनी मेघजल[२४]। शित करिं भूमितल।
धर्मरक्षण जनीं वेद विहिता। आधि व्याधितती ।
नाशुनी संप्रती । निति भक्तीरती । देइं सुजना ॥२॥

---

१. तपोधनाभ्यागमसंभवा मुद:। - शिशुपालवध
२. नेत्रानीता: सततगतिना यद्विमानाग्रभूमी:। - मेघदूत.
३. सुखेवा दु:खेवा क्वनु खलु तदैक्यं हृदययो:। - उत्तररामचरित्र.
४. अनपायिनि संशयद्रुमे गजभग्ने पतन्ताय वल्लरी । - कुमारसंभव.
५. यज्ञांगयोनित्वमवेक्ष यस्य । - कुमारसंभव
६. बध्यतामभय याचनांजलि:। - रघुवंश
७. अहमेवगुरु: सुदारुणा नामिति हालाहल तातमास्म दृश्य:। - काव्यप्रकाश
८. बंधुप्रीत्यासम रविमुखो लांगलीया: सिषे वे । - मेघदूत.

९. किमपरमतोनिर्व्यूढं यत्करार्पण साहसम्। - मालतीमाधव
१०. आत्मत्यागिन्योनाक्षी चोदक भाजना । - याज्ञवल्क्यस्मृति.
११. पुरुषकेसरिणश्च पुरानस्वैः। - शाकुंतल.
१२. आत्मन्येवात्मनातुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते । - भगवद्गीता.
१३. यथाधमेधाक्रतुराट सर्वपापापनोदन : । - मनुस्मृति
१४. सह्याद्री कच्छिपेभागेघत्साहारेनदोषः - सह्याद्रिखंड
१५. अनुबंधक्षयंहिंसा मेनपेक्ष्यच पौरूषम्:। - भगवद्गीता
१६. प्राक्तनजन्मविद्याः। - कुमारसंभव
१७. अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः
एतंसामातिकधर्मम्। - मनुस्मृति
१८. रसतु रसनापि तवघन जघमनमण्डलें। - गीतगोविंद
१९. हितान्नयः संशृणुतेसंकिंप्रभु । - किरातार्जुनीय .
२०. प्राबीकृतो दस्युरिवासियेन्। - शाकुंतल
२१. गोमांसखादकोयस्तु विरूध्दबहुभाषते ।
सर्वाचारविहीनस्य म्लैच्छइत्यभिधियते - बौध्दायन.
२२. जटाजूटग्रंथौ वदसिविनिबध्दापुरभिदा । - गंगालहरी
२३. सौम्येति चामाच्य यथार्थ भाषी स्थितंविदेशे पृथगादिदेशाः। - रघुवंश.
२४. मेघालोके भवतिसुखिनोऽप्यन्यथा वृत्तिचेतः। - मेघदूत.

■■

सर्ग ११ वा

आर्या (गीति)

अव्यक्त व्यक्त तैसा निर्गुण सगुणा रूपास जो धरितो ।
सद्गति जगता देओ विश्वभंर विश्वपालिता हरि तो ॥१॥
सृष्टिकर्त्याची काय ही लीला !

पद (सिंहासनी बैसेल० या चालीवर)

वसंत ऋतुच्या उदयें व्हावी भूदेवी तुष्टती । नवनव दावी नवलाकृती ॥ विविध फलांनी मंडित तरूवर पुष्पलता शोभती । भ्रमरहि गुंजारव सेविति ॥ पूर्ण जलाशय तडाग विलसति गाती कोकिळतती । निर्मळ रजनी चंद्र द्युती ॥१॥

वसंतऋतु जावा आणि ग्रीष्मऋतु यावा.

पद (चालू)

चंडकिरण तमहरण तापवी भास्कर अवनीतला शोषिती तत्कर
अखिला जला॥ अभ्राच्छादित दिसे चंद्रमा, तारांगण लाजती ।
सरिता दीनागति भासती ॥२॥
(इतक्यात वर्षाऋतुचा प्रवेश)

पद (चालू)

दक्षिण मारूत झंझावाते कंपित भासे धरा।
चमकती वीजा' गगनोदरा ॥ मेघजलाने प्रबल
वाहती सरिता सुखसभरी । देती आलिंगन सागरा ॥३॥
आणि तसेच

पद (चालू)

बालरवीच्या उदयें तल्लिन होती जान संभ्रमे ।
उग्रचि माध्यान्हीं तो गमे ॥ सायंकाळा अस्त पावतां।
मंद किरण चालती । गगनीं शशि-तारा हांसती ॥
पूर्ण शशीचा क्षय होतां त्या अंधकार आवरी ।
प्रीती खद्योतो आदरी ॥४॥

त्याच प्रमाणे

साकी

नवतारूण्यीं लाजविती ज्या निजवदनें चंद्राला ।
नयनें कमला हिणवितात ज्या, गमने मयुरा करिला ॥
वृध्दत्वा ललना[२] । लपविती दंगभग्न वदना ॥१॥

यांत सृष्टिनियंत्याचा काय हेतु असावा ! सर्वांगपरिपूर्ण, श्रांत लोकांना विश्रांतिदायक, आनंदाचा, जनक, सुखाचा मालक, वसंतऋतु सदासर्वकाळ निश्चळ ठेवल्यास, सृष्टिदेवी, परमेष्टीला इष्ट कामेष्टि नवस पुरविणार नव्हती काय? पर्जन्याची सर समसारखी सर्व पृथ्वीवर झडल्यास, दुष्काळास आळा पडणार नव्हता काय? कोठे पाण्याचे लोट अलोट वाहतात. तर कोठे पाण्याचा घोट घेण्यास मिळत नसतो, हें काय म्हणून ? तसेंच पहा, पौर्णिमेचा चंद्रमा, निरभ्र आकाश, असा शरदऋतु सदोदित असल्यास परमेश्वरास कोणी दोष दिला असता काय? तारूण्यातील ललनांचे लावण्य[३] अभंग ठेवल्यास निसर्गदिवीस कोणी अव्यंग म्हणणार नव्हते काय? बालरवीचा कोमल प्रकाश दिवसरात्र दिसल्यास अंधकारास त्रास झाला असता का?....तसेच हे सारे सृष्टिचक्र -

पद (चाल-मम सुत भरत०)

होतां उदयचि देशाचा । निपजे नृपति सुमति साचा ॥
सचिवहि सुज्ञ तया मिळती । विद्वज्जन लोकीं भरती ॥
सेना शूर वीर म्हणती । धरणी विपुल धान्यदाती ॥
कौशल्याच्या कला वाढुनी, धर्म नीति रमती ।
व्याधी चौर्य न जगीं वसती ॥१॥

तेंच उलट झाल्यावर --

पद (चालू)

मत्सर खलबल जनिं राहे । राजा लोक भीति वाहे ॥
प्रजेचा[४] कोप जगी वसतां । शांती सोडी भूकांता ॥
व्याधी दुष्काळा[५] भरती । अवनति दुष्कर्मे वरती ॥
धर्मनीतिच्या आपत्तीने, कीर्ती नच राहे । अवनी
चिंतानल वाहे ॥१॥

काय पहा, पृथ्वीचा मालक, लोकांचा-पालक, म्हणून महाराजाला विष्णुस्वरूप मानतात, सन्मान देतात, पूजन करतात, तोच काळ फिरला म्हणजे लोकांस उग्र काळाप्रमाणे भासतो आहे. पदवंदन करणारे शिरच्छेद करण्यास उपुक्त होतात, आज्ञेची वाट पाहणारे अवज्ञा करण्यास सरसावतात.....या गोष्टीचा उकळ मानवबुध्दीला लागणे महत्कठीण. तेव्हां असेच म्हणावे लागते.

पद (चालू)

प्रभूची अगम्य हे लीला। लागे थांग न कवणांला ॥
कोठे होय अनावृष्टी । प्रलयें बुडत कुठे सृष्टी ॥
कोठें धान्य समृध्दी । कोठें होय क्षुधावृध्दी ॥
कोठे धड ना लंगोटी । कोठें खेळति नव कोटी ॥
उच्च मंदिरें, नाच चालती, कोठें गायनकला ।
कोठे भोगवि भिक्षाच्छला ॥६॥

बरें, एकीकडे सुख तर एकीकडे दुःख, असें म्हणावें तर --

पद (चालू)

लक्ष्मी भरजरी बहु भरला । व्याधि न सोडी देहाला ॥
वसती अष्टभोग सदनीं । ओढिती रोग अन्नवदनीं ॥
लोटे अपार संपत्ती । संततिनाशें [५] हळहळती ॥
जेथें दरिद्र वीस विसवे । अगणित संतति तै प्रसवे ॥
राजयौविता पुत्र कामिका, नवसिति देवाला ॥
होई शक्य न परि त्याला॥ प्रभुची ॥४॥

हें तरी काय थोडेच -

पद (चालू)

दुर्मिळ ज्यांस धान्य दाणा । अवचित होई तो राणा ॥
मिरवति बैसुनि गजयानीं । घटिंतची चालति अनवाणी ॥
हिणविती मूर्ख म्हणूनि ज्याला । सहजीं नमिति सुज्ञ त्याला ॥
दासदासिंचे कलप भोंवती राखित जो गाई ।
हांसे इतर जना पाहा ॥ प्रभुचि॥५॥

याहीपेक्षा

पद (चालू)

राजा श्रेष्ठ चक्रवर्ती[७]। सैन्या शौर्या ना गणती ॥
सचिवहि बुध्दिमान मोठे । चिंता भीति नाहिं कोठें ॥
कांपति चळचळ रिपु भारी । इच्छा स्वर्गावर स्वारी ॥
अवचित होतां क्षोभ प्रजेचा, ठाव न बसण्याला ।
भोगवी भोग बंदिशाळा। प्रभूची ॥६॥

आतां ही सर्व परमेश्वराची लीला म्हणावी, कुतुहल म्हणावें, ग्रहयोग म्हणावा का कर्मयोग म्हणावा? मानवाच्या शान्त बुध्दीस याचा अंत लागणे म्हणजे अनन्ताचे अनन्तत्वच नाही असें होईल. असें वाटते, जग ही एक रंगभूमि २ आहे, नैपथ्याच्या आड राहून कोणी तरी सूत्रधार या पात्रांची गुप्त रीतीने सजवणी करीत असतो; एकाला राजाचा वेष देतो तर दुसऱ्याला करतो हुजऱ्या, एकाला दासीची भूमिका देतो तर त्यालाच राणीचा पोशाख चढवतो, घटकेत सिंहासन तर क्षणांत बंदिशाळेत अशन, शयन ! लोकांचें मनरंजन करण्याकरतां हा नाटकाचा चटका लावून देत असतो; म्हणूनच महाज्ञानी लोक परमेश्वराच्या कृपेचेंच हें सारे फळ आहे, असे सिध्दांतपूर्वक प्रतिपादन करतात -

मूकंकरोति वाचालं, पंगु लंघयते गिरिम्।
यत्कृपात्वमहं वंदे परमानंद माधवम् ॥

असो, सांप्रत अमरावतीला मिवविणाऱ्या सरस्वती तीरावर दुष्काळाचा वणवा भडकूं लागला खरा.....परंतु.....

साकी

सरस्वतीचा प्रसाद अंकुर सारस्वत तरू फळला ।
जपयज्ञाने प्रमुदित भास्कर भूभागा करि सजला ॥
झाली घनवृष्टी । दिसली पुनर्नवि सृष्टी ॥१॥

हळुहळू सरस्वतीच्या तीरावर लोकांची चाहूल होऊं लागली, वृक्षलतांना पालवी फुटली, धरणीदेवी आदरणीय भासूं लागली,राहूच्या[८] वेधांतून सुटलेल्या

चंद्रबिंबाप्रमाणे सरस्वती नदीचा प्रदेश पूर्वीपेक्षांहि अधिक रम्य भासू लागला, तेव्हां.

नमस्कार, नमस्कार कोत्समुनी ! भारी भाग्योदय[९] पुष्कळ वर्षांनी भेट, आनंदाची समेट; क्षेमकुशल, आयुरारोग्य, यथायोग्य चालले आहे ना?

साष्टांग नमस्कार, वत्समुनीचे दर्शन म्हणजे आनंदाचे प्रदर्शन. पण आपलें आगमन इकडे कोणीकडे ?

कोत्समुनी ! आपण आपल्या आनंदातच आहांत, अलीकडे येथें लोकांची कशी काय स्थिती झाली ती आपल्या स्मृतींतच नाहीं, असे वाटते.....

काय, वत्समुनी ! मला काय लोकांच्या बाहेर टांकता, जी इतरांची गति, तीच आपली स्थिती आणि काय --

पद (चाल - अर्ध तनु वारूळी बुडाली)

अवर्षणाने लोक गांजले निर्जिव झाली धरा ! करी तै
लोकसमुह घाबरा ॥ दुष्काळाचा घाला पडला, आळा
यज्ञावरी। झाला कर्ममार्ग[१०] बहु दुरी ॥ श्रुतिस्मृतीची
स्मृती बुडाली, धर्म होय बावरा । कांपती भक्ति नीति थरथरा ॥१॥

कोत्समुनी ! खरोखर या दुष्काळाच्या काळांत लोकांची भारीच कालवाकालव झाली. या अखंड तप अवर्षणात तपश्चर्येची[११] चर्याच लोपून गेली! जिकडेतिकडे उदरभरणाचाच भरणा भारी जाचक झाला; महान् महान् ऋषींना स्वर्गवासाचाच हव्यास वाटूं लागला.....

वत्समुनी ! गुरुमहाराज, दधीचि मुनीची स्मृति आली म्हणजे मात्र मतीची गति चालत नाही ; हाय !

कोत्समुनी ! गुरुमहाराजांचा स्वर्गावर सत्कारच झाला, त्यांच्या अस्थीचें वज्र[१२] बनले आणि देवेंद्रास ते प्रचंड शस्त्रच लाभले.

हं, वत्समुनी ! देवेंद्राचा हेतु सफल झाला, आमचा जन्म मात्र निष्फळ बनला.

बरे, पण कोत्समुनी ! आपलें आगमन कोठे ?

वत्समुनी ! मनुष्याची दिशाभूल झाली म्हणजे कुठें आणि काय वेदमंत्राचा ध्वनि कोठेतरी कानी पडेल, म्हणून हिंडावयाचे. पण आपले गमन कुठे ?

फार उत्तम, कोत्समुनी ! ''समान शीले व्यसनेषु सख्यं'' माझाहि पण तोच हेतु, अंतर इतकेंच, माझा शोधान्त झाला आणि आपण शोधांत आहांत....

काय, वत्समुनी! आपणास, का वेदमूर्तीचा लाभ झाला, सांगा कोठे झाला, कसा झाला, सांगा त्याचें नांव काय, गांव कोण.....

कोत्समुनी ! भराभर प्रश्नाची[१३] सर.....

वत्समुनी ! तसे नाही हो, एकदां त्या वेदमूर्तीचे दर्शन होऊं द्या, सांगा, कोण, कोठील.....?

कोत्समुनी ! इतका उतावळेपणा नको आहे, या आतां माझ्याबरोबर हा पहा सरस्वतीच्या पूर्वभागावर अपूर्व समारंभ होत आहे, हजारों ऋषींचा समुदाय जमलेला आहे, हा पहा वेदघोष आकाशांत दुमदुमतो आहे, पतितपरावर्तन होमाचा धुम्र आकाशावर अग्नि आणीत आहे.....

वत्समुनी ! अलक्ष्यलाभ, खराच माझा आज उजवा[१४] बाहु स्फुरत होता ! पण , सांगाहो, साद्यन्त सांगा, ते वेदमूर्ति कोण, कोठील,.....

कोत्समुनी ! ते आपलेच हो गुरुपुत्र, दधीचि मुनीचा पुत्र सारस्वत.

काय, वत्समुनी ! आपला सारस्वत इकडेच आहे, आणि तो कसा हो राहिला?

कोत्समुनी ! त्या आपल्या सारस्वतापासूनच दुष्काळाचे निवारण झाले, पर्जन्यवृष्टी[१५], त्याच्याच यज्ञाने झाली.

वत्समुनी ! मला घोटाळ्यांत घालू नका. सारस्वतानें कोणता यज्ञ केला, अश्वमेध का राजसूय[१६] यज्ञ ?

कोत्समुनी ! जपयज्ञापेक्षां अश्वमेध, राजसूययज्ञ हे श्रेष्ठ मानतां का आपण?

वत्समुनी ! हो , हो, जपयज्ञाचे महत्व भारीच आहे. अश्वमेध, राजसूय वगैरे यज्ञांत द्रव्याचा पापांश आहे, हिंसा आहे असाच श्रेष्ठ समंजस लोकांचा समज झालेला आहे. पण आपण काय म्हटले? पतितपरावर्तन होम म्हणजे काय ?

कोत्समुनी ! आपणांस गूढ पडण्याचे कारण नाही; आपल्या सनातन आर्यधर्मापासून भ्रष्ट झालेले पतित यांस परत आर्यधर्मात आणणे, यास पतितपरावर्तन म्हणतात, हे का आपणास सांगितलें पाहिजे?

वत्समुनी ! भलतेंच का सांगतां आपण, आर्यधर्मापासून च्युत झालेले, धर्मांतर केलेले, परत आर्यधर्मात घेतां येतील? अभक्ष्य भक्षण केलेले, ज्ञातिभ्रष्ट , कर्मभ्रष्ट यांस फिरून आर्यधर्म ? यास काय प्राय:श्चित आहे?

कोत्समुनी ! आपल्या काश्यप मुनीनीं, अंबु पर्वतावर महायज्ञ करून, हजारो म्लेच्छांस आर्य चातुर्वर्ण्यात घेतलें, हें आपणांस अज्ञात असेल असें मला वाटत नाही. पंचमहापातकांत धर्मभ्रष्टतेचे नांव नाही. आणि इच्छेविरूध्द झालेल्या कर्मास पाप तरी आपण कसे मानतां ?

वत्समुनी ! अभक्ष्य भक्षण, म्लेच्छांचा संग ही धर्मबाह्य कर्मे पातकें होत नाहीत का? यास प्राय:श्चित[१७] असेल असें मला दिसत नाही, धर्मशास्त्रांत आहे का असे प्राय:श्चित? आधार सांगा !

कोत्समुनी ! हें पहा प्राय:श्चित प्रकरण; श्रीसरस्वतीच्या संदेशाने आपल्या सारस्वताने हें स्वत: लिहून हजारों प्रती जिकडेतिकडे पाठविल्या आहेत. आणि याकरतां मला हा पूर्वप्रदेशप्रवास प्राप्त आहे.

वत्समुनी ! दाखवा हो मला वाचून, आपले प्रकरण?

कोत्समुनी ! ऐका -

"बलाद्दासिकृतायेतु म्लेच्छ चांडाल दस्युभि: ।
अशुभं कारिता: कर्मगवादि प्राणि हिंसनम् ॥
उच्छिष्टं मार्जनं चैव तथोच्छिष्टस्य भोजनम् ।
खरोष्टविड वराहाणा मामी पस्यच भक्षणम् ॥
तत्स्त्रीणाच तथा सांग स्ताभिश्च सहभोजनम् ।

(परिग्रहा भोज्यभोजने प्रायश्चित प्रकरणम्)

वत्समुनी ! आपल्या सारस्वतानें भारीच नामी प्रकरण शोधून काढले तर. पण याचा अर्थ सर्व लोकांस कसा कळणार ?

कोत्समुनी ! ऐका तरी पुढे, हा पहा भावार्थ :-

"जे बलात्काराने म्लेंच्छ, चांडाळ, दस्यूकडून भ्रष्टविले गेले; ज्यांनी गवादि प्राणहिंसेचे अशुभ कर्म केलें, त्यांचे उच्छिष्टमार्जन, उच्छिष्ट भोजन घडले, गाढव, डुकर, या पशूंचे मांस जरी भक्षण केले, त्यांच्या स्त्रियांशी संग झाला, त्यांच्याशी सहभोजन झाले, तरी त्यांना प्राय:श्चिताने पावन करतां येते".

शाबास ! वत्समुनी ! पण मला वाटतें हा तात्कालिक, चुकून घडलेल्या पापासंबंधी, विधि[१८] असेल.

कोत्समुनी ! ऐका तरी पुढे

"शत संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
भोजनासनशय्यादि कुर्वाणः सार्वकालिकम् ॥

अर्थ पहा, आपणास अर्थाची गरज नाही. तरी पण पहा -

"शंभर वर्ष जरी पतित झाला असला, पतितासह जरी मिळाला मिसळला असला, नित्य निजणे उठणे, भोजन करणे, इत्यादि व्यवहार जरी त्याचे होत असेल तथापि प्रायःश्चित्ताने पावन होतात."

धन्य, धन्य, सारस्वत धन्य ! पण वत्समुनी ! याला पौराणिक आधार आहे का?

कोत्समुनी ! आपणास का मी सांगितले पाहिजे ? वैदिक लोक पुराणावर अल्पदृष्टि करतात, हा पहा पौराणिक आधार --

"म्लेच्छैर्गतानां चोरैर्वा कान्तारेवा प्रवासिनाम। भक्ष्याभक्ष्य
विशुध्यर्थं तेषां वक्ष्यामि निष्कृतिम् । पुनः प्राप्यस्वदेशेच वर्णाना
मनु पूर्वशः। कृच्छस्यान्ते ब्राह्मणस्तु पुनःसंस्कार नर्हति ॥

पहा,

"म्लेच्छ देशांत गेलेला, अरण्यांत फिरलेला, प्रवास केलेला, आणि पुनः स्वदेशात आल्यावर भक्ष्याभक्ष्याच्या शुध्दी करतां फिरून संस्कार करून घ्यावे.

शाबास, वत्समुनी ! धन्य सारस्वत, खरा स्मार्त[१९], पण हे प्रायःश्चित प्रकरण इतका काळ गुप्त कसे हो उरले ? याचा शोध कोणीच धर्मगुरूनी कसा हो केला नाही? त्या दुष्ट म्लेच्छ, यवनास जर हें कळलें असतें, तर ते कार्यात पडलेच नसते; किती हो त्यांनी अत्याचार केला ! बलात्काराने कपटाने, फसवून, भुलवून, किती तरी आर्य लोकांस अनार्यधर्माची दीक्षा दिली, आणि या दुष्काळाच्या काळांत त्या काळयवनांस किती हो भाग्योदय दिसला.

कोत्समुनी ! त्यांकडेसच नाही हो सारा अन्याय, आपलेच आर्य परधर्मात गेल्यावर आम्हांस त्रास करू लागतात, यवनधर्माचे अभिमानी बनतात, आणि आमचा पिच्छा पुरवतात, प्रखर सूर्याचे ताप सहन करवतील पण त्याच्या तापाने तापलेल्या वाळूचे ताप भारीच संताप[२०] देत असतात.

वत्समुनी ! आतां तरी परोपरी परिश्रम करून पतितपरावर्तन अंमलांत आणले पाहिजे, नपेक्षा साऱ्या आर्यावर्तात आर्य धर्माचे नांवच घेणे भीतीप्रद होईल.

कोत्समुनी ! आपल्या ह्या परावर्तन कार्यास ते दुष्ट भारीच अडथळे आणतात, अपमान करतात, इतकेच नाही तर प्राणावरहि संकटें आणतात आणि आपलेच पतित आर्य त्यास सहाय्य करतात आणि या शुध्दीच्या कामीं प्रबुध्द म्हणणारे आर्य महाजन मन:शुध्द त्यांच्या विरूध्द जात नाहीत.....

काय, वत्समुनी ! आपलेच पतित आर्य, पतितपरावर्तनास आळा घालतात? यवन धर्माचा अभिमान[२१] बाळगतात?

कोत्समुनी ! काय सांगावे, या परावर्तनास, ते पतित आर्य, जनवक्र वदन, लाल नयन करून पाहतात; अवमान, अपमान तर सोडाच; या शुध्दिकृतांस कृतान्ताप्रमाणे परोपरीने दंड न करण्यास सर सावतात;.....

वत्समुनी ! खरें सांगा, ज्या आपल्या बांधवांस, त्या म्लेच्छ यवनांनी धर्मभ्रष्ट केले, बलात्काराने अभक्ष्य भक्षण करण्यास लावलें, त्या वेळीं आपल्या ह्या आर्यबंधूनी त्यांचा त्याग कसा केला, त्यांस अस्पर्श, अपंक्त काय म्हणून ठेवले, त्यांस त्याच वेळी हेंच प्राय:श्चित देऊन आपल्यात कां मिळवलें नाही; मनाच्या इच्छेविरूध्द घडलेल्या दोषास[२२] प्राय:श्चित्ताचीदेखील गरज नव्हती. असा नाही का उत्तर पक्ष येत? आईनं ढकलले, शेजारणीस फावले.

कोत्समुनी ! ''गतं गोष्टि न कर्तव्य'' हेंच; आता शक्य तो प्रयत्न करून हे परावर्तनाचे कार्य सिध्दीस नेलें पाहिजें; आर्यधर्माचें सारें जीवन याच पतितपरावर्तनावर अवलंबून आहे.

बरें, पण, वत्समुनी ! आपल्या सारस्वतानें जपयज्ञ[२३] कसा केला, त्याचा आहारव्यवहार कसा झाला, हे कांही समजलेंच नाही.

कोत्समुनी ! या, हा पहा माध्यान्ह उलटूं लागला, प्रत्यक्ष सारस्वताची भेट झाल्यावर सारे विदित होईल, आतां महान् महान् ऋषींच्या समुदायांत सारस्वताचे, आर्य सनातन धर्मावर प्रवचन होणार आहे; चला.....

वत्समुनी ! फार उत्तम, खरेंच वेळ कधी गेला हेंच कळले नाही हा पहा --

साकी

माध्यान्हीचा चंडकिरण हा उत्तरे पश्चिम[१] भागीं ।
उच्चस्थान अधोगती हे निश्चल सर्वालागी ॥
प्रभुवर तो दावी । सृष्टि कौतुक हे कळवी ॥१॥

१.	वीज्यतेसहिंसंसुप्त श्वाससाधारणानिल :।	कुमारसंभव
२.	ललनालक्षैर्नसंलक्षिता ।	गीतगोविंद
३.	पुपोषलावण्यमयान्विशेषान् ।	कुमारसंभव
४.	नव्यतीयुः प्रजास्तस्यनियते नेमिवृत्तयः।	रघुवंश
५.	कुवृपती राष्ट्रांस जसे दुष्काळ व्याधि चोर तुडवीती ।	मोरोपंत
६.	चिंतासंतति तंतुजालनिबिडस्यूतेव लग्नप्रिया ॥	मालतीमाधव.
७.	पुत्रमेवंगुणोपेतंचक्रवर्तिनमाप्नुहि ।	शाकुंतल.
	नवतन्विकुचावेतोनियतंचक्रवर्तिनो ।	मेघदूत
८.	राहोश्चंद्र कलामिवाननचरी दैवात्समासाद्यमे ।	मालतीमाधव.
९.	भाग्यक्रपेणहि धनानि भविन्त यांति ।	मृच्छकटिक.
१०.	क्रियमाणंतुयत्कर्मस्वयंमेच प्रसिध्यति ।	कर्मकांड.
११.	तपाल्पये वारिभिरूक्षिता नवै।	कुमारसंभव
१२.	वज्रांशुगर्भागुलिरंध्रमेकं, व्यापार यामास करं किरीटे ।	रघुवंश.
१३.	अविज्ञात प्रवचनं प्रश्नइत्यभिधीयते ।	काव्यप्रकाश.
१४.	बाहुत्क्षेपं क्रंदितुच प्रवृत्ता।	शाकुंतल.
१५.	प्रवृध्द इवपर्जन्यः सारंगैराभिनंदितः।	रघुवंश.
१६.	येनेष्टराजसुयेनसम्राट।	रसगंगाधर.
१७.	मातुः पापस्यभरतः प्रायश्चित भिवाकरोत् ।	रघुवंश.
१८.	कल्याणी विधिषु विचित्रता विधातु ।	किरातार्जुनीय.
१९.	आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एवच ।	महाभारत
२०.	संतापसन्ततिमहाव्यासनाय ।	मालतीमाधव.
२१.	अभिमान धनस्य गत्वरैरसुभिः।	किरातार्जुनीय
२२.	तत्किमयमातपदोषः स्यात् ।	शाकुंतल
२३.	यज्ञानां जपयज्ञोऽस्मि।	भगवद्गीता
२४.	पश्चिमाद्यामिनीयामात्प्रसादमिव चेतना ।	रघुवंश

सर्ग १२ वा

साकी

सर्ग[1] स्थिति लय कारण जगता अगाध ज्याची शक्ती ।
भक्ति नीतिच्या आभरणें जो देई सुजना मूक्ति ॥
कलिमल नाशुनियां । देओ भक्तां निजठाया ॥१॥

संध्याकाळचा समय, शांत किरण, तमोहरण भास्कर, नभोभाग उतरत उतरत प्राच्वधूला चुंबन देण्यास सरसावलेला आहे, संध्यारागाने विभूषित झालेली पश्चिम दिशा कनक प्रांशन केलेल्या रसपतीप्रमाणे[2] पिंगटवर्णीय भासत आहे, सरस्वतीच्या निर्मल सलिलांत सहस्त्रकिरणाचे कण खेळत आहेत, मंदपवन, मनशांत, तिला आंदोलन देत आहे. अशा वेळी सरस्वतीच्या पूर्वभागावर, प्रचंड ऋषींचा अपूर्व समुदाय एकत्र झालेला दिसू लागला; उदयाचलावर आरूढ झालेल्या दिनकरा[4] प्रमाणे व्यासपीठावर सारस्वतमुनि शोभू लागला; दिव्य ऋषींच्या मुखचंद्रास पहात पहात सारस्वतमुनीच्या वक्तृत्वसागरास भरती येऊं लागली, तेव्हा ---

सन्मान्य मुनिजन हो ! आपल्या आकांक्षेप्रमाणे आर्यधर्म म्हणजे काय, हें मी अल्प अधिकारी असून, स्वल्पच शब्दव्याख्येने सांगणार आहे;.... धर्म हा शब्द धृ म्हणजे धारण करणे या धातूपासून उत्पन्न झालेला आहे. सर्व प्रजा धर्माने बध्द झालेली आहे, हे प्रबुध्द शास्त्रवेत्याचे शुध्द मत आहे; जेणेकरून सर्व प्रजेचे धारण होते, त्यास धर्म ही श्रूतीची उक्ति आहे; आणि मीमांसाशास्त्राच्या मताने ''चोदनालक्षणोऽर्था धर्मः'' असे जैमिनी महामुनीचे मत आहे. चोदना म्हणजे प्रेरणा, अर्थात् कोणीतरी अधिकारी पुरुषाची आज्ञा, हिलाच धर्म ही संज्ञा आहे; धर्म ही संसारसागरातील महान् नौका आहे; आकाशांतील ग्रहमालेला जसे आकर्षण बंधन आहे, तसेच मानव जातीला धर्म हे एक बंधन आहे, ऋग्वेदांत ''सुप्रिणितिश्चिकितुपो न शासुः'' म्हणजे विद्वान् चिकित्सक यांच्या शासनाप्रमाणे प्रियकर अशा अर्थाच्या ऋचा आहेत, अर्थात् धर्माचे शासन हे लोकांस भारी हितकर आहे;..... आता कांही स्मृतिकारांच्या मताप्रमाणे, धर्मधिर्माची व्याख्या, धर्मशास्त्राबरोबर प्रत्यक्ष आणि अनुमान यांच्या विचाराने सारासार पाहून केली पाहिजे. ''प्रत्यक्षंचानुमानंच शास्त्रंच विविधागमम् । त्रयं सुविदितं कार्यं धर्मशुध्दी मभिप्सता''.....तसेंच धर्मशास्त्राचा, विचारपूर्वक, अर्थनिर्णय करण्याविषयी वेदवेत्त्या ऋषींनी भारीच तत्परता दाखविलेली आहे. ''तदेव वेदवादीना विचार

पूर्वकेऽर्थ निर्णये तात्पर्यातिशय दर्शनात् सर्वापि वेदार्थ विचारनिर्णयेत व्याख्यायमन्यते'' अर्थात् सदसद्विवेक बुध्दीस अनुसरून ''सर्वभूत हितेरतः'' ज्यांत सर्व लोकांचे कल्याण आहे तोच आर्यधर्म म्हणजे श्रेष्ठ धर्म होय.....(टाळ्या)

मत्पूज्य सभाजनहो ! आर्यधर्माची संपूर्ण व्याख्या वर्णन करण्यास, बराच वेळ थोडाच होणार आहे. तर स्वल्पांतच धर्माची लक्षणे आणि अंगे सांगून आपला निरोप घेतो.

धृति[५] क्षमा दमोऽस्तेयंह[६] शौचमिन्द्रिय निग्रहः।
धोर्विध्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥

या प्रकारची महान् धर्माची मुख्य दहा लक्षणे आहेत, तसेच

अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः।
एत सामासिकं धर्म प्राहू मनुस्मृति

अशी धर्माची पंचांगे आहेत. मानसिक धैर्य, क्षमा, इंद्रियदमन, अचौर्य, शुचिर्भूतत्व, शुध्दबुध्दि, अध्ययन, सत्य, अक्रोध, यावर सर्व आर्यधर्माचा पाया आहे. तात्पर्य, ऐहिक आणि पारमार्थिक अभ्युदय करणारा, ज्याच्या योगाने संसारांत सुखाचा उपभोग मिळून मरणोत्तर स्वर्गसुखाची प्राप्ति करून देणारा, हा आर्यधर्म होय. ''इहलोके सुखं भुक्त्वाचान्तेसत्यपुरं व्रजेत्.....

सारस्वत मुनीच्या मुखांतून निघत असलेला वाग्विहार म्हणजे अमृत मेघाची धार, की भोगावतीचा शीतल तुषार अथवा वेदरत्नाकरांतील शब्दमौक्तिकांचे हार यांचीहि उपमा निरूपमाच होणार आहे, तेव्हा -

साकी

सज्जन मुनिंची सभा भासली निश्चल चित्रासम ती ॥
वचनसुधा प्राशाया मिळले प्रेक्षकगण नच गणती ॥
सुरवर तै गगनीं । करिती दाटी नभयानी ॥१॥

इतक्यात -

साकी

विपुलेखेसम तैं प्रगटे मूर्तिमंत वाग्देवी ।
मुनिजन नयनज्योति भ्रमवी विश्वताप जे शमवी ॥
पदरज वंदाया । सुरमुनि इच्छिति शुभ समय ॥१॥

तेव्हा, सरस्वतीतीरावर आनंदाचें नंदनवन भासूं लागलें, पशुपक्ष्यांचें प्रदर्शनिच भरलें, मच्छकच्छ विहरूं लागले, लतावल्लरी कुसुमाग्रज पसरूं लागल्या, सुफलान्वित वृक्ष फळाहार अर्पूं लागले, कोकिळा पंचम स्वरांत मंजूळ गायन करूं लागल्या. मूर्तिमंत वेदं स्तवनगुंज झाले, दाहीदिशा नादब्रह्ममय भासूं लागल्या, त्यावेळी -

पद (चाल - देवस्त्री मेनका)

श्रीजगदंबा विश्वकदंबा सारस्वत जननी ।
प्रसन्नवदना तोषित सुमना सुरवर मुनि नमनी ॥
वरदहस्त शुभकारक सादर सत्वर वर करूनी ।
पवन सुधाकर वसुधामरपद वंदित मृदु वचना ॥१॥

मत्प्रिय मुनिजन हो !
सरस्वती जल नदीतटाकीं तपती मद्भजनीं ।
प्रसन्न त्यांना सदा असे मी तत्पर वरदानी ॥
धर्मनीति बल मान्य सदा पुण्यप्रभावे सुजनी ।
सारस्वत[९] श्रुतिमार्ग प्रकाशक पावन अभिधानी ॥२॥

इतक्यांत -

आर्या (गीति)

अमर कुसुम घन वर्षति झाली सारस्वतीं सुमनवृष्टी ।
सज्ञान पर्वणी ते दिसली आनंदमम्बिका सृष्टी ॥१॥

ॐ तत्सत्

स्तवन

पद (चाल - सुंदर मुख०)

आदिमाय प्रणवरूपिणी श्रीसरस्वती ।
विश्वजननि सौख्यखनी वर्णिती श्रुति ॥

सद्विद्या ज्ञान वसो विमल सज्जनीं ।
स्वातंत्र्यों प्रीति असो आर्यजनमनां ॥
धर्मनीति भक्ति सदा शिवउपासना ।
रामकृष्ण चरितिं असो पूर्ण कामना ॥१॥

तथास्तु : तथास्तुः

---

१. अस्याः सर्ग विधौप्रजापतिरभूच्चद्रोनुकांतिप्रदः। — विक्रमोर्वशीय.
२. रसपतिरिव प्राश्य कनकं । — शार्ङ्गधर.
४. तुल्योद्योगस्तवदिनकृतश्चधिकारा मतोनः। — विक्रमोर्वशीय.
५. येजाः क्षमा वा नैकांतं कालज्ञस्य महीपते । — शिशुपालवध.
६. निग्रहो बाह्य वृत्तीना दमइत्यभिधीयते । — भगवद्गीता
७. सुधासौंदर्यते सलिल मशिवंनः शमयतु । — गंगालहरी.
८. गंभीरायाः पयसिसरित श्वेतसीव प्रसन्ने । — मेघदूत.
९. कृत्वा सामभिगममपी सौम्य सारस्वतानाम् । — मेघदूत

सारस्वत - Reating to the goddes Sarasvati.
संस्कृत इंग्लिश कोश — लक्ष्मण रामचंद्र वैद्य.
यन्नूनं समजीजनत्सूमधुरं सारस्वतो मारसः। — सुश्लोकलाधव.
२. यातत्रस्याद्युवति विषये सृष्टिराद्ये वधातुः। — मेघदूत.

■■

..... हंस थिएटर्सने जेव्हा या नाटकाचा प्रथम प्रयोग रंगमंचावर आणला तेव्हा नाटकातील पात्रानी आपल्या अप्रतीम अभिनयाने एकएक प्रसंग असा जीवंत केला की आम्ही सर्व आश्चर्यचकीत होउन गेलो. त्या दिवशी साहित्यिक आजोबा नजरेसमोर उलगडत गेले.....

ISBN No. 81901163-3-9